म. ग्रं. सं. ठाणे.
विषय मु. प्रवास
सं. क्र. ७२९

REFBK-0026220
REFBK-0026220

# नर्मदा परिकम्मा
## (प्रदक्षिणा)

लेखक : दा० वि० जोगळेकर


REFBK-0026220
REFBK-0026220

केशव भिकाजी ढवळे
श्रीसमर्थ-सदन
गिरगांव, मुंबई

आवृत्ती पहिली : १९९०

❋ ❋ ❋ ❋ ❋ ❋ ❋ ❋ ❋ ❋ ❋ ❋ ❋

किंमत २५ रुपये



अहिल्यादेवींचा घाट–महेश्वर

© सौ. विमल दा. जोगळेकर

मुद्रक
दे. रा. देशप्रभु
मल्टिप्रिंट
भायखळा, मुंबई ८

प्रकाशक
धनंजय बाळकृष्ण ढवळे
केशव भिकाजी ढवळे
श्रीसमर्थ सदन, पहिली भटवाडी,
गिरगाव, मुंबई ४

# थोडे प्रास्ताविक

❊ ❊ ❊ ❊ ❊ ❊ ❊ ❊ ❊ ❊ ❊ ❊ ❊

'प्रवास कुणी करावा ?'

'हा काय प्रश्न आहे! प्रवास कुणीही ज्याची इच्छा असेल, त्या कुणीही करावा. एवढ्या यात्रा नि सहल कंपन्या आहेत. त्या पूर्व, पश्चिम, दक्षिण नि उत्तर, चारी दिशांना सप्तखंडांतून अधर नि ऊर्ध्व मार्गाने फिरवून आणतात. लोकांजवळ पैसे असतात. शिवाय हल्ली ऑफिसांतून एल्. टी. सी वगैरे भत्त्यांचे पैसे मिळतात; तेव्हा प्रवास काय, मजेत होतो. "आम्ही गेल्या वर्षी त्या ××× ××× यात्रा कंपनी तर्फे गेलो होतो. त्यांच्याकडे 'फीस्ट' असतेच, पण शिवाय उपासाला सुद्धा इतके सुंदर सुंदर (?) पदार्थ असतात की, आमचे 'हे' घरी कध्धी सुद्धा उपास करीत नाहीत; परंतु प्रवासाला गेले म्हणजे करतात, अहो!" असे कौतुक अनेक वपुश्रीमान महिलांकडून ऐकायला मिळते. पुढे बोलण्याच्या ओघांत आपल्या असे लक्षात येते की, यांनी जी सौंदर्यस्थळे पाहिलेली असतात त्यांतील महत्त्व अगर वैशिष्ट्ये, पाहून सुद्धा त्यांच्या लक्षांतच आलेली नसतात अगर पाहायचीच राहिलेली असतात. आपण त्यांचे ते अज्ञानांतील सुख तसेच राहू द्यावे. त्याला धक्का लावलेला त्यांना आवडत नाही. या मंडळींनी व त्यांच्या 'ह्यांनी' खुशाल आरामात प्रवास करावा. आमचे काही म्हणणे नाही. (असले म्हणून तुम्हाला विचारतो कोण!)

सेवानिवृत्त, वयस्कर, ज्यांना सध्याच्या प्रवासाच्या वाढलेल्या कटकटी उरकत नाहीत अशी रेल्वेचा पास असणारी मंडळी, प्रवासाच्या बाबतीत अगदीच अननुभवी आणि पवित्र तीर्थयात्रा करण्याची तर फार इच्छा आहे अशा मंडळींनी यात्रा कंपनीतर्फे जावे हे ठीक आहे. खूपसा पैसा खर्च करणाऱ्यांना अति आरामात जगभर फिरवून आणणाऱ्या यात्रा कंपन्या सुद्धा आहेत; परंतु ही काही खरी शौकिन, प्रवासाची खरी आवड असणारी मंडळी नव्हेत. प्रवास हा एक छंद आहे. अत्यंत निरोगी छंद! जीवन समृद्ध करणारा! जाणीवा विशाल करणारा! अनुभव या खात्यात सतत भर टाकणारा! हा खरा, तरुण अगर बाल्यपणापासून जोपासायला हवा. मुळांत प्रत्येकाला तो असतोच. अगदी लहान तान्हे

मूल सुद्धां कुणाबरोबर तरी 'भूर' जायला हपापलेले असते. तेव्हा भटकण्याची मूळ प्रवृत्ती माणसामध्ये असतेच. तिचीच पद्धतशीर जोपासना पुढे सुद्धा व्हायला हवी सर्वांनाच हे शक्य होईल असे नाही; परंतु ज्याला ज्याला हे शक्य होईल त्याने जेव्हा जेव्हा शक्य होईल तेव्हा तेव्हा जाणीवपूर्वक ही संधी सोडता उपयोगी नाही.

म्हातारपणीच केवळ तीर्थ-यात्रा करायच्या हा समजसुद्धा चुकीचा आहे. त्या तरुणपणीच झाल्या पाहिजेत. धार्मिक प्रवृत्ती असतील त्यांना ते केल्याचे समाधान मिळेलच; पण शिवाय वरील परिच्छेदांत लिहिलेल्या गोष्टी व फायदे प्रत्यक्ष प्रत्ययाला येतील. मात्र तरुणपणाचा प्रवास स्वकष्टार्जित म्हणजे ज्याचे आयोजन स्वतः केलेले, शक्य तितकी माहिती मिळवून केलेले आहे असा असावा. परभृत, ऐता नसावा. प्रवासाचा छंद ज्याला लागला तो हे करतोच.

प्रवास म्हटला म्हणजे त्यांत हाल झालेच पाहिजेत असे नाही. थोडीशी साधन-सामुग्री व बरेचसे नियोजन यांनी ते टाळता येतात. साधनांची कमतरता असल्यास थोड्याशा गैरसोई सोसण्याची तयारी हे साधनही पुरते; पण छंद पुरा करता येतो. खऱ्या हौशी प्रवाशांमध्येसुद्धा अनेक प्रकार असतात. प्रवासाच्या शौकाबरोबर काहींना आपला दुसरा कसला तरी शौक पुरा करायचा असतो व त्याकरता प्रवासच करावा लागतो. काहींना पक्षी निरीक्षण करायचे व त्यांचे तसेच निसर्ग-सौंदर्याचे फोटो घ्यायचे असतात. तर काहींना वनस्पती, दगड, धोंडे, माती, असे कशाचे तरी संशोधन करायचे असते. या शिवाय काहींना पाहिलेले निसर्ग दृश्य कागदावर नैसर्गिक रंगांत हुबेहुब, कुंचल्याने रंगवायचे असते. असे अनेकांचे अनेक छंद ! ऐन थंडीत काहींना बर्फावरून स्कीईंग करून, डोंगर पालथे घालायचे असतात. विशीतली तरुण मंडळी 'ट्रेकिंग'ला जातात. तर यांपैकी काही गिर्यारोहणाचे शिक्षण घ्यायला हिमालयात जातात. ज्यांचे हे शिक्षण पुरे झालेले असते ते कुठले तरी लहानमोठे शिखर पादाक्रांत करायला जातात. यांत कौतुकाची गोष्ट म्हणजे या शौकात थोड्या तरी मुली जायला लागल्या आहेत. तीर्थयात्रेला जाणाऱ्या प्रवाशांत मात्र प्रौढा अगर वृद्धाच जास्त असतात. तरुणीही त्यांत असावयास हव्यात.

हौशी प्रवाशांचा उत्साह नुसता उतू जात असतो. त्यांना प्रवासात थोड्या गैरसोई झालेल्या चालतात. त्याकरता ते शक्यतो प्रवास टाळीत नाहीत; पण त्यांना

प्रवास स्वयंनियोजित हवा असतो. स्वयंनियोजित प्रवासातले स्वातंत्र्य त्यांस हवे असते. मन रमेल त्या ठिकाणी एखादी वेळ जास्त काढण्याचे स्वातंत्र्य त्यांस हवे असते किंवा वाटेत कुठे विशेष महत्त्व असलेले ठिकाण जवळच आहे असे कळल्यास दुसरे एखादे दुय्यम दर्जाचे स्थळ रद्द करून, त्या ठिकाणी जाण्याची मोकळीक हवी असते. या हौशी, शौकिन प्रवाशांचा छंद लहानपणापासूनच जोपासला गेला असल्यास 'केल्याने देशाटन'—त्यास माहीत असते. शिवाय प्रसिद्ध हौशी प्रवासी रामदास स्वामी यांचा 'कुग्रामे अथवा नगरे । पाहावी घरांची घरे ॥ भिक्षामिषे लहान थोरें । परीक्षूनि सोडावी ॥' हा उपदेश पण त्यांच्या स्वानुभवामुळे त्यांस मौलिक वाटत असतो. या हौशी मंडळींना सहज संधी क्वचितच प्राप्त होते. बहुतेक वेळा अशी संधी खटपट करून ते जुळवून आणतात. अनेक वेळा दुसऱ्या सोबत्यांची जबाबदारी त्यांना स्वीकारावी लागते. पुढारीपण घ्यावे लागते. ते जमवून घेतात; पण संधी सोडीत नाहीत.

प्रवासाने माणसाचे अनुभवविश्व वाढते, हे तर खरेच, परंतु सर्व प्रवास संपवून तो दमून भागून परत आला तरी त्यास वाटत असते की, येताना आपण, अनेक दिवस पुरणारा, उदंड तकवा बरोबर घेऊन आलो आहोत. 'बडा मजा आया' अशा समाधानात त्याचा प्रवास संपतो. सर्व ठिकाणी स्वतः खटपट करावी लागत असल्यामुळे माणसांचे अनेक नमुने बघायला मिळतात. त्यांतील काही व्यक्ती तर आपल्या मनावर कायमचा ठसा उमटवून जातात.

हौशी शौकीन प्रवासी एकटाच प्रवासास निघतो असे नाही. अनेक वेळा तो आपल्या मुलाबाळांना व कुटुंबीयांनाही त्यांच्या ताकदी-उमेदी प्रमाणे घेऊन जात असतो. अशा वेळी त्याला पूर्वतयारी जरा जास्तच करावी लागते. जायच्या-यायच्या आरक्षित-रेल्वे तिकिटाशिवाय, पुढील गोष्टी पत्रव्यवहाराने, जास्तीत जास्त माहिती मिळवून तयारी करावी लागते.

'आमचं ना ! सगळं बघून झालय्' असे उद्गार हौशी प्रवाशाच्या तोंडून कधीच निघत नाहीत. 'सगळं बघून कोणाचेही कधीच होत नाही.' या माणसाच्या मनात पाहून झालेल्या ठिकाणांपेक्षा न पाहिलेल्या ठिकाणांचीच मोठी थोरली यादी घोळत असते. त्याला आपला प्रवास प्रत्ययकारी असा व्हायला हवा असतो. प्रत्ययकारी प्रवास म्हणजे काय याची काही उदाहरणे घेऊनच आपण हा मुद्दा स्पष्ट करू

'सिंहगड!' : सिंहगडावर जायच्या आधी, सुभेदार तानाजी मालसुऱ्यांचा पराक्रम आपणास माहित असतो. म्हणून वर गेल्यावर आपण, घोरपडीच्या साहायाने सुभेदार जो चाळीस हात उंचीचा कडा चढून आले तो कडा आपण पाहातो. सुभेदार धारातीर्थी जिथे पडले आणि जिथे त्या पिकलेल्या शेलारमामाने उदेभानू किल्लेदाराला झोपविला ते ठिकाण मुद्दाम माहिती करून घेऊन पाहातो. मग साक्षात तो काळ आपल्या मनःश्चक्षूंपुढे उभा राहातो नि आपण गहिवरतो. हा गहिवरण्याचा प्रत्यय घेण्यासाठीच सिंहगडावर जायचे असते. ज्याचा परिचय अद्याप टिकून आहे असा एक वंग प्रवासी मित्र अनेक वर्षांपूर्वी प्रथम भेटला तेंव्हा सिंहगडाचा विषय निघाला असता तो मला म्हणाला होता, 'हां हां! सिंहगड ना? मी बघितलाय्. तो मवाल्यांच्या सहाय्याने शिवाजीने परत जिंकून घेतला तोच ना? पुण्याहून दिसतो तो.' मावळ्यांना तो मुंबईचे मवाली समजला होता. देशभक्त मावळे (शिवाजी महाराजांचे) कुठे आणि समाजहित विरोधी मुंबईचे मवाली कुठे! मला त्या मित्राचे (हिमांशुकुमार धार) पुरे बौद्धिकच घ्यावे लागले. नाहीतर सिंहगडावरचा भन्नाट वारा आणि 'खंडहर' येवढाच त्याच्या मनावर उमटलेला ठसा घेऊन तो वंगभूमीस परत गेला असता.

दुसरे एक प्रत्ययकारक प्रवासाचे उदाहरण येथे द्यायचा मोह होतो. त्याचा प्रत्यय मात्र मला स्वतःला शारीरिक वेदना सहन करून प्रत्यक्ष घ्यावा लागला. केदारेश्वरला जाताना वाटेत गौरीकुंडाच्या अलीकडे सोनप्रयाग येथे, गढवाल टूरिझमच्या कृपेने त्यांच्याच टेंट-कॉलनींत (घरांच्या ऐवजी तंबू होते) एक दिवस राहाण्याचा योग आला होता. वस्ती ऐन जंगलातील होती. दोन प्रहरी चहा-पाणी उरकल्यावर जंगलातच फिरायला म्हणून बाहेर पडलो. पाय-वाटच होती. वाटेवर एका झुडूपाची फांदी थोडीशीच रस्त्यावर आडवी आली होती. ती बाजूला सारण्यासाठी मी हाताच्या तर्जनीचे बोट तिला लावले मात्र! आणि डझनभर विंचू डसल्यासारख्या वेदना झाल्या. अन् मी पटकन् खालीच बसलो. खाली बसल्यावर काय झाले याची मला नेमकी कल्पना आली. साठ पाऊणशे वर्षांपूर्वी लिहिलेल्या एका पुस्तकात मी एक माहिती वाचली होती. हिमालयातील प्रवासात पायवाटेच्या बाजूला 'बिच्छू' (विंचू) ची झुडपे असतात. त्यांना आपल्या उघड्या अंगाचा स्पर्श झाला तर विंचू डसल्यासारख्या वेदना होतात. त्यावर उपाय तिथेच सांगितला होता. तिथेच शेजारी आढळणाऱ्या बिन विषारी (माहितीच्या) कोणत्याही

झाडाचा पाला चोळून त्यावर लावल्यास वेदना कमी होतात. मला किंवा माझ्या बरोबर असलेल्या सहप्रवाश्यांना तसा दुसरा कोणत्या ओळखीच्या झाडाचा पाला तिथे सहज उपब्ध झाला नाही. थोड्या वेळाने वेदना कमी झाल्या. परंतु ती ठुसठुस मात्र दुसरे दिवशी सकाळ पर्यंत राहिली. नंतर आमचा फिरण्याचा कार्यक्रमही ठरल्याप्रमाणे पार पडला. बरोबरच्या एका प्रवाशाने–श्री. अवस्थी याने–मला आलेला अनुभव स्वतः घ्यायचे ठरविले. दुसरे दिवशी घेतलाही; परंतु विव्हळला मात्र माझ्यापेक्षाही जास्त; आणि अशा रितीने माझा तो प्रवास शब्दशः प्रत्ययकारी ठरला.

प्रत्ययकारी प्रवासाचा आणखी एक तिसरा नमुना येथे देत आहे. हकीगत हिमालयातील प्रवासाचीच आहे. प्रसिद्ध तीर्थक्षेत्र बद्रीनाथापासून तीन-चार मैलावर भारताची 'माना' सरहद्द लागते. पलीकडे तिबेट. सरहद्दीवर थोडे-फार सैनिक आहेत. पलीकडे महर्षी व्यासांची तपोभूमी आहे. आणखी काही ऐतिहासिक व पौराणिक स्थळेही आहेत. तिकडे प्रवासाला जायचे असल्यास सैनिक अधिकाऱ्यांना नुसते तोंडी सांगून गेले तरी चालते. तेथील एकच अनुभव मी सांगणार आहे. प्रत्यक्ष व्यास-गुहेत मी उभा होतो आणि त्या दगडी, थोड्याफार अंधाऱ्या गुहेने मला त्या ऐतिहासिक महाभारतीय कालांत–सुमारे पाच हजार वर्षांपूर्वीच्या त्या व्यासपित्याच्या पाराशर्याश्रमात नेले. वेद व्यासांची, महर्षी-व्यासांची, दुसऱ्याच्या मनाचा दृष्टीने वेध घेणारी मूर्ती दिसू लागली. चारी वेदांच्या नुसत्या एकत्र असलेल्या पोथ्यांच्या पानांच्या ढीगामधून, त्याचे चार वेदात वर्गीकरण करीत बसलेले भगवान व्यास दिसू लागले. तिरकस समोर असलेल्या गणेश गुहेकडे बघून, टाळी वाजवीत, जयनावाचा इतिहास लिहिण्या-साठी सल्लागार व लेखक अशा त्या बुद्धिविनायकाला 'क्यूं गणेशजी, आइये! साथही जलपान करके बादमे लिखना जारी रखेंगे, आइये!' म्हणून साद घालीत असलेली शुचिर्भूत व्यासांची मूर्ती दिसू लागली. त्यानंतर वेदान्तसूत्रे-ब्रह्मसूत्रे, लिहिणाऱ्या बादरायणाचार्यांची म्हणजेच व्यासांची मूर्ती दिसू लागली. 'व्यासोच्छिष्टं जगत् सर्वं' असे म्हटले जाते. जवळ जवळ संपूर्ण प्रस्थान-त्रयीच्या निर्मितीचे श्रेय ज्यांना द्यावयास हवे, अशा या वेदव्यास, महर्षी, भगवान व्यासांच्या मूर्तीचे ध्यान कसे असेल!" अशा विचारात त्या पाराशर्याश्रमात मी रंगून गेलो असताना पत्नीने माझ्या खांद्याला स्पर्श करून म्हटले 'अहो चला, ती देशपांडे

मंडळी भीमशीळेकडे गेली सुद्धां.' काही क्षणानंतरच मी त्या पाराशर्याश्रमातून त्या ओसाडीत परत आलो. तो परिसर म्हणजे अक्षरशः ओसाडी होती. उंची अकरा हजार फूट असल्यामुळे झाडा-झुडपाचे नाव नाही. ज्यावर दृष्टी अडकेल असे हे दोन दगडी गुहांचे खंडहर होते. सामान्य प्रवासी त्यावर नुसता दृष्टिक्षेप टाकून पुढे झटकतो. काही प्रवाशांनाच फक्त व्यास महर्षी साद घालतात. ज्यांच्याशी त्यांची वेव्हलेंथ जमेल त्यांनाच फक्त! आपण थोडेसे बहुश्रुत जरी असलो तरी असे प्रत्यकारी प्रवास घडतात. आणखी लिहायचे म्हटले तर त्याचेच एक पुस्तक होईल.

हौशीने केलेले सर्वच प्रवास काही प्रत्यकारी अगर साक्षात्कारी भासतात असे नव्हे. अनेक ठिकाणांच्या हकीगती वर्णने आपण वाचतो, ऐकतो आणि मग मनात अशी ऊर्मी येते की, एकदा हे ठिकाण आपण पाहिलेच पाहिजे. त्या सहलीची भूक लागते. कित्येक दिवस मध्ये गेले तरी ती शमत नाही. आणि मग आपण त्या सहलीस निघतो. असे प्रवास बहुधा प्रत्ययकारी ठरतात. यालाही अपवाद होतातच. ज्याची तहान लागलेली असा प्रवास फुसका बार निघतो. उलट मनात नसलेली सहलही अकस्मात जमून येते आणि ती आकस्मिक सहलच साक्षात्कारी ठरते. ती घडल्याबद्दल धन्य धन्य वाटते. तेव्हा हौशी प्रवाशाने आधी खूपशी माहिती गोळा करून व शिवाय त्या त्या ठिकाणी मिळणारे मार्गदर्शकाचे मार्गदर्शन न चुकता घेऊन केलेली सहल, लहान अगर मोठी, सफल झाल्याशिवाय राहाणार नाही. प्रवास वर्णने काही वेळा रोजनिशीच्या स्वरूपात वाचावयास रोचक वाटतात म्हणून 'नर्मदा परिकम्मा' रोजनिशीच्या स्वरूपात लिहिली आहे. आपणास जे उत्कटतेने भावते, ते दुसऱ्यास सांगावेसे वाटते. म्हणून 'नर्मदा परिकम्मा' लिहिण्याच प्रपंच केला आहे.

भारतात, पंधराशे मैल पसरलेल्या हिमालयाच्या सहलींना फक्त हिवाळा वर्ज्य आहे. यालाही बर्फावरचे स्कीइंग, स्केटिंगसारखे खेळ हे अपवाद आहेतच; परंतु भारतात इतर सर्वत्र हिवाळ्याचा हंगाम सहलींना योग्य असतो. थोडे अलीकडे पलीकडे झाले तरी चालू शकते. प्रवासाचा मुख्य उद्देश ईश्वराने सृष्टीचा हा जो महान ग्रंथ लिहिला आहे तो वाचायची संधी प्रत्येकाने साधावी हा आहे.

३७७ वि. प. रोड, मुंबई ४००००४
Tel. 356357

दा. वि. जोगळेकर

# प्रत्ययकारी प्रवास

❋ ❋ ❋ ❋ ❋ ❋ ❋ ❋ ❋ ❋ ❋ ❋ ❋

ओव्हरसीज पेपर ट्रेडिंग कंपनीचे मालक आणि एक दर्जेदार पेपरविक्रेते यासंबंधात श्री. दा. वि. जोगळेकर यांच्याशी माझा परिचय सुमारे पंचवीस वर्षांपासूनचा आहे.

१९४२ च्या स्वातंत्र्य लढ्यांतील एक सैनिक व पुढे अनेक वर्षे अनेक काँग्रेस कमिट्यांचे पदाधिकारी असे जुने काँग्रेसचे एक कार्यकर्ते म्हणून आम्हास ते माहित होते. पुढे संयुक्त महाराष्ट्राच्या आंदोलनातही काँग्रेसजन परिषदेचे ते एक हुद्देदार आणि मुंबई महानगरपालिकेचे नगरसेवक होते. महापालिकेच्या अनेक कमेट्यांचे ते चेअरमनही होते; परंतु एक हौशी प्रवासी म्हणून त्यांची ओळख त्यानंतर, तरीही बऱ्याच वर्षांपूर्वी काही निमित्ताने झाली. प्रवास या विषयावरचे त्यांचे हे तिसरे पुस्तक आहे. शिवाय आणखीही काही पुस्तके त्यांनी लिहिलेली आहेत.

आज साठ वर्षे जोगळेकर हौसेने प्रवास करीत आहेत. अगदी तरुणपणी पायी व सायकलवरून त्यांनी लांबलांबच्या सहली केलेल्या आहेत. पुढे सभा-सम्मेलनांच्या निमित्ताने, घरातील कुटुंबीयांसह अशा यात्रा–सहली भारतांत चहूकडे त्यांनी केलेल्या आहेत. वयाच्या पंचाहत्तरीपर्यंत त्यांच्या सहलींचे आयोजन त्यांचे त्यांनीच केले होते. त्यानंतरच्या दोन सहली मात्र त्यांनी यात्रा कंपनीमार्फत केलेल्या आहेत. ही 'नर्मदा परिकम्मा' त्यापैकीच एक. त्यापूर्वी ते कोणाबरोबर तरी जाण्याऐवजी त्यांच्या बरोबर त्यांचे आप्त व इष्टमित्र जात असत.:

आपण नर्मदा प्रदक्षिणा करावी हा विचार गेली कित्येक वर्षे माझ्या मनात आहे. फार वर्षांपूर्वी गो. नि. दांडेकरांचे 'कुणा एकाची भ्रमणगाथा' हे पुस्तक मी वाचले होते. त्यानंतर इंदूरचे प. पू. नानामहाराज तराणेकर यांनी केलेल्या नर्मदा प्रदक्षिणेतील काही अनुभव ऐकायला मिळाले. ३/४ वर्षांपूर्वी श्री. प्रकाशबुवा मुळे या ओळखीच्या गृहस्थांनी नर्मदा प्रदक्षिणा पायी चालत पूर्ण केली. अशा अनेकांचे अद्‌भुत अनुभव, रोमांचकारी प्रसंग ऐकून नेहमी वाटत राहाते की

आपणही एकदा जायला हवे. चालत वर्षभर हे शक्यच नाही; परंतु मोटारीने २०/२५ दिवसांत ही प्रदक्षिणा करायला हवीच. आणि योगायोग असा की श्री. जोगळेकर यांनी अलीकडेच मोटारीने प्रदक्षिणा पूर्ण केली. या प्रवासातले आपले अनेक अनुभव आणि गोष्टी ते आल्यावर सांगत असत. एकदा असा विचार केला की, जोगळेकरांनी जी नर्मदा प्रदक्षिणा केलेली आहे, ती आजच्या नव्या जमान्यात नव्या पिढीला आवडेल अशीच आहे. जोगळेकर नुसते फिरत नाहीत; ते हौशी प्रवासी आहेत. माऊत्सेतुंग ह्याने लिहिलेल्या प्रवासवर्णनांचा आज ऐतिहासिक पुरावा म्हणून उपयोग केला जातो. जोगळेकर इतरांपेक्षा काहीतरी जास्त व निराळे पाहातात. प्रवासाला जाण्यापूर्वी ते तेथील प्रदेशाची माहिती काढतात. शिवाय अनेक वर्षे आणि असंख्य ठिकाणी त्यांनी दौरे केलेले आहेत, यामुळे त्यांचा बहुश्रुतपणा, त्यांची निरीक्षणाची वृत्ती आणि अलौकिक स्मरणशक्ती यामुळे ते दर्जेदार प्रवासी बनले आहेत.

ज्यांना नर्मदा प्रदक्षिणेला जायचे असेल त्यांना जाण्यासाठी मार्गदर्शक आणि ज्यांना जाणे शक्य नाही त्यांनी हे पुस्तक नुसते वाचले तरी जाऊन आल्यासारखे वाटेल. जाऊन आल्याचा आनंद लुटता येईल. जोगळेकर ज्याला 'प्रत्ययकारी प्रवास' म्हणतात तसा तो सगळ्यांनाच होतो असे नाही, म्हणून त्यांच्या अशाच एका प्रत्ययकारी प्रवासाचे हे पुस्तक प्रसिद्ध करताना विशेष आनंद वाटत आहे.

—प्रकाशक

# नर्मदाष्टकम् ।

❋ ❋ ❋ ❋ ❋ ❋ ❋ ❋ ❋ ❋ ❋ ❋ ❋

सबिंदु सिंधु सुस्खलत्तरंग भंग रंजितम् ।
द्विषत्सुपाप जात-जात कारि वारि संयुतम् ॥
कृतांत्त दूत काल भूत भीतिहारि नर्मदे ।
त्वदीय पादपंकजं नमामि देवि नर्मदे ॥ ॥ १ ॥

त्वदम्बुलीन दीन मीन दिव्य संप्रदायकम् ।
कलौ मलौघभारहारि सर्व तीर्थ नायकम् ॥
सुमत्स्य कच्छ नक्र चक्र चक्रवाक शर्मदे ।
त्वदीय पादपंकजं नमामि देवि नर्मदे ॥ ॥ २ ॥

महा गभीर नीर पूर पाप धूत भूतलम् ।
ध्वनत् समस्त पातकारि दारिता पदाचलम् ॥
जगल्लये महाभये मृकण्डुसूनु हर्म्यदे ।
त्वदीय पादपंकजं नमामि देवि नर्मदे ॥ ॥ ३ ॥

गतं तदैव मे भयं त्वदम्बु वीक्षितं यदा ।
मृकण्डुसूनु शौनकासुरारिसेवि सर्वदा ॥
पुनर्भवाब्धि जन्मजं भवाब्धि दुःख वर्मदे ।
त्वदीय पादपंकजं नमामि देवि नर्मदे ॥ ॥ ४ ॥

अलक्षलक्ष किन्नरामरासुरादि पूजितम् ।
सुलक्ष नीर तीर धीर पक्षि लक्ष कूजितम् ॥
वसिष्ठ शिष्ट पिप्पलादि कर्दमादि शर्मदे ।
त्वदीय पादपंकजं नमामि देवि नर्मदे ॥ ॥ ५ ॥

सनत्कुमार नाचिकेत कश्यपादिषट्पदैः ।
धृतं स्वकीयमानसेषु नारदादि षट्पदै ॥
रवीन्दु रन्तिदेव देवराज कर्म शर्मदे ।
त्वदीय पादपंकजं नमामि देवि नर्मदे ॥ ॥ ६ ॥

अलक्ष लक्ष लक्ष पाप लक्ष सार सायुधम् ।
ततस्तु जीव जन्तु तंतुमुक्ति मुक्ति दायकम् ॥
विरञ्चि विष्णु शंकर स्वकीयधाम वर्मदे ।
त्वदीय पादपंकजं नमामि देवि नर्मदे ॥ ॥ ७ ॥

अहोऽमृतं स्वनश्रुतं महेशकेशजा तटे ।
किरात सूत वाडवेषु पण्डिते शते नटे ॥
दुरन्त पाप ताप हारि सर्व जन्तु शर्मदे ।
त्वदीय पादपंकजं नमामि देवि नर्मदे ॥ ॥ ८ ॥

इदन्तु नर्मदाष्टकं त्रिकालमेव ये सदा ।
पठन्ति ते निरन्तरं न यान्ति दुर्गतिं कदा ॥
सुलभ्य देह दुर्लभं महेश धाम गौरवम् ।
पुनर्भवा नरा न पै विलोकयन्ति रौरवम् ॥ ॥ ९ ॥

**इति श्रीमत् शंकराचार्य विरचितम् श्रीनर्मदा स्तोत्रम् ।**

# श्री नर्मदाजी की स्तुति

जय जय जगदंब मात, नर्मदा भवानी ।

निकली जल धार जोर, पर्वत पाषाण फोड,
दुष्टन को करत नाश, प्रगटी महारानी ॥ १ ॥

घाट घाट छवि अनंत वरणत मुनि फणि फणीन्द्र,
काट देत दंद फंद, देत राजधानी ॥ २ ॥

ओंकार-भृगुक्षेत्र और संगम मानी,
अमरकंठ अमरनाथ मोक्ष की निशानी ॥ ३ ॥

अमरकंठ जम्मभूमि अति अनूप मानी,
पश्चिम को बहत मात सिन्धु मे समानी ॥ ४ ॥

बड़े बड़े योगि यति, तपी मुनि ध्यानी,
दर्शन देत पाप हरत शंकरी भवानी ॥ ५ ॥

बड़े बड़े पर्वत पाहाड़ तोड़ति राजधानी,
शंकर चैतन्य मौन भये प्रसन्न शूलपानी ॥ ६ ॥

जय जय जगदंब मात, नर्मदा भवानी ।

# श्री नर्मदाजी की आरती

❊ ❊ ❊ ❊ ❊ ❊ ❊ ❊ ❊ ❊ ❊ ❊ ❊

ॐ जय जगदानन्दी, मैया जय आनन्द कन्दी
ब्रह्मा हरिहर शंकर, रेवा शिवहर शंकर रुद्री पालन्ती ।
॥ ॐ जय १ ॥

देवी नारद शारद तुम वरदायक, अभिनव पदचन्डी ।
हो रेवा अभिनव.... ।
सुरनर मुनिजन सेवत, सुरनर मुनिजन सेवत, शारद पदवन्ती ।
॥ ॐ जय २ ॥

देवि धूम्रक वाहन राजत वीणा वादयन्ती ।
हो रेवा वीणा....।
झुमकत झुमकत झुमकत, झननन झननन झननन रमती राजन्ती ।
॥ ॐ जय ३ ॥

देवि वाजत ताल मृदंगा, सुरमंडल रमती,
हो रेवा सुरमंडल....।
तोड़ितान् तोड़ितान् तोड़ितान्, तुड़ड़ड़ तुड़ड़ड़ तुड़ड़ड़ रमती सुरवन्ती ।
॥ ॐ जय ४ ॥

देवि सकल भुवनपर आप विराजत निसदिन आनन्दी ।
हो रेवा निसदिन.... ।
गावत गंगा शंकर सेवत रेवा शंकर तुम भव मेटन्ती ।
॥ ॐ जय ५ ॥

मैयाजी को कंचन थाल, विराजत अगर कपुर वाती ।
हो रेवा अगर....।
अमरकण्ठ मे विराजत, धवलागिरी मे विराजत,
घाटन घाट विराजत कोटि रतन ज्योती । ॐ जय ६ ॥
मैयाजी की आरती निश दिनपढ़गावे, हो रेवा जुग जुग नर गावे
भजत शिवानन्द स्वामी जपत हरीहर स्वामी मन वांच्छित फल पावे ।
॥ ॐ जय ७ ॥

# नर्मदा खोरे प्रकल्प

नर्मदा खोरे प्रकल्प, या नावाचा एक अति महत्त्वाकांक्षी प्रकल्प या नर्मदा नदीवर होणार असल्याचे, गेली अनेक वर्षे ऐकू येत आहे. यात ३० मोठी धरणे, १३५ मध्यम आकाराची धरणे आणि ३,००० लहान धरणे (बंधारे) बांधावयाची आहेत. मोठ्यामध्ये सरदार सरोवर, विद्युत्पादन १४५० मे. वा. शक्तीचे व नर्मदा सागर, विद्युत्पादन १००० मे. वा. शक्तीचे असे दोन मोठे जलाशय आहेत. या सर्वांचा एकूण खर्च किती येईल याचा अंदाज करतांना त्यापासून मिळणारा लाभ व होणारी हानी याचा विचार प्रथम करायला हवा. तसा तो चोखपणे झाला आहे असे वाटत नाही. नुसत्या विस्थापितांची संख्या प्रथम होणाऱ्या सरदार सरोवराच्या बाबतीतच एक लाख आहे. हे विस्थापित म्हणजे, गुजराथ, मध्यप्रदेश व महाराष्ट्रांतील आदिवासी आहेत. भूसंपादन वनसंपत्तीचा नाश, विस्थापितांचे पुनर्वसन वगैरेच्या खर्चाचा फक्त सरदार सरोवराचा अंदाज आताच साडेतेरा हजार कोटीपर्यंत गेला आहे. प्रत्यक्ष काम पुरे होईल तेव्हा तो किती वाढेल हे कोण सांगू शकेल ? या सरदार सरोवरामुळे कच्छ-काठेवाडची भूमी सुजलाम सुफलाम होणार आहे. या धरणाला सध्या कडाडून विरोध होत आहे. विरोधकांत गुजराथी व महाराष्ट्रीय अशा दोघांनी चालविलेल्या संस्थांचे कार्यकर्ते आहेत. या धरणाची उंची ४५-५० फुटांनी कमी केल्यास एकूण होणारे नुकसान (पर्यावरणाची हानी व विस्थापितांची संख्या वगैरे) सत्तर ते ८० टक्यांनी कमी होईल असे सुविख्यात प्रशासक एम्. एन्. बूच यांनी एका लेखांत म्हटले आहे. परंतु केंद्रीय सरकारला तेही मान्य नाही. काय व्हायचे ते मूर्त स्वरूपात प्रथम येत्या काही वर्षांत दिसूं द्या तरी! तोपर्यंत आपण सामान्य माणसांनी सर्व प्रकल्पाचा अंदाज, त्यापासून होणाऱ्या लाभ, हानी आणि खर्च यांच्या नऊ-दहा आकडी संख्यांच्या बेरजा आणि वजाबाक्या करा कशाला ? या ८२० मैल म्हणजे १३१२ किलो मीटर लांबीच्या नदीची महा-प्रदक्षिणा कशी पार पाडता येईल याचाच विचार करू.

# नर्मदा प्रदक्षिणा—एक पर्यायी प्रायोगिक सूचना

❋ ❋ ❋ ❋ ❋ ❋ ❋ ❋ ❋ ❋ ❋ ❋ ❋

भारतात नर्मदा किंवा रेवामैय्या ही अशी एकच महानदी आहे की जिची प्रदक्षिणा करतात. स्थानिक भाषेत प्रदक्षिणेला 'परिकम्मा' आणि ती करणाऱ्याला 'परिकम्मावाले' म्हणतात. पूर्वी ही प्रदक्षिणा पायीच करीत. अद्यापही क्वचित कुणी करणारा निघतो; परंतु अलीकडे कोणी पर्यटन-सहलींचे व्यावसायिकही बसमधून ही सहल आयोजित करताना आढळतात. यांनाही पूर्वतयारी खूपच करावी लागते व बसमधून ही यात्रा करणाऱ्या यात्रीसाठी सुद्धा ती काही आरामशीर यात्रा ठरत नाही. कष्टप्रदच आहे; परंतु पायी करणे शक्य नाही, अशा यात्रींसाठी हा एक बऱ्यापैकी पर्याय आहे. आठदहा माणसांनी आपल्यापैकीच मालकीच्या दोन ॲम्बेसडर गाड्या काढल्या तर प्रवास यापेक्षा सुखावह होईल. व दोन जास्त ठिकाणेही बघून होतील. तरीपण त्यालाही पूर्वतयारी भरपूर करावी लागेल आणि फुरसतही तीन-चार आठवड्यांची हवी.

लेखकाने स्वतः जरी ही नर्मदा प्रदक्षिणा ॲम्बेसेडर अगर तत्सम खाजगी गाडींतून प्रत्यक्ष केली नसली तरी दुसऱ्या अशा सहली बारा-पंधरा माणसे घेऊन खाजगी स्टेशन वॅगनमधून आयोजित केलेल्या आहेत. व त्या सुखासमाधानाने पारही पडल्या आहेत. वेस्टर्न इन्डिया ऑटोमोबाईल असोसिएशन आपल्या सभासदांना मैलांच्या अंतरासह वळणांचा तपशील देऊन सोयीस्कर असा मार्ग तपशीलवार काढून देते. शिवाय त्या त्या प्रदेशाचे पर्यटन खाते (मध्यप्रदेश–पत्ता, वर्ल्ड ट्रेड सेन्टर, कफ परेड, मुंबई) नकाशे व माहिती पत्रके पुरविते. या दोन्ही कडील माहिती आपल्या प्रवासाचा कार्यक्रम ठरविण्यास चांगली उपयोगी पडते. आपल्या बरोबरच्या मंडळींत काही खटपट्ये स्वयंसेवकही हवेत. अगर सर्वांनी मिळून आलटून पालटून ती कामे करावयास हवीत. पूर्वतयारी प्रमाणे, उद्यांची व परवांची आपल्या प्रवासांतील व्यवस्था आज तपासून खात्रीकरून घेणारे एक खाते. तसेच पूर्वतयारी प्रमाणेच जेवणा-खाण्याची प्रत्यक्षात व्यवस्था पाहणारे दुसरे खाते. ही खाती महत्त्वाची खाती आहेत.

# गुरुवार दि. ५ फेब्रुवारी

※ ※ ※ ※ ※ ※ ※ ※ ※ ※ ※ ※ ※

श्री : पहिला दिवस पुणे

'या, या, जोगळेकर ?' समोरच्या गृहस्थांकडून स्वागत.

'जोगळेकर ? तुम्हाला कसं माझं नाव समजलं ?'—मी.

'अहो ! मगाशीच आपल्या यात्राकंपनीचे मॅनेजर सांगून गेले की बाहेरगावाहून येणाऱ्यांपैकी फक्त जोगळेकर यायचे राहिलेयत.'—

'हं ! मग बरोबर. आपलं नाव ?'—

'माझे नाव भातखंडे. कुर्ल्याचा मी. ही माझी पत्नी. या दुसऱ्या पाठारेबाई मुंबईच्याच; आणि ते तिकडे कॉटवर आहेत ते ओरपे, अहमदाबादचे.' भातखंड्यांनी तिथे असलेल्या चारीजणांची ओळख करून दिली.

'आम्ही नेहमी त्या ××× यात्राकंपनीमार्फत प्रवासाला जातो. चांगली व्यवस्था असते त्यांची, पण या नर्मदा प्रदक्षिणेला ही एकच कंपनी जाते म्हणतात.'

'अहो दुसऱ्या दोघांनी पण जाहिराती दिल्या होत्या पेपरांत ! जाहिराती दिल्या होत्या, पण जमले नाहीत यात्रेकरू. मग आमच्या मालकांनीच जेवढे जमतील तेव्हढे त्यांचे, जागा होती तेव्हढे घेतले. बाकीचे बसले बोंबलत म्हणतात.' वरील माहिती मागून माझ्यासाठी त्या खोलीत एक गादी घेऊन आलेल्या पोऱ्याने दिली.

या 'बसेरा' हॉटेलमध्ये आजची रात्र, पहिली रात्र, तरी चांगली जाणार. उद्यापासून मिळेल तसल्या धर्मशाळेत आमचा मुक्काम असणार आहे. बरोबरची चार माणसे रात्रीच्या भोजनासाठी खाली गेली आहेत. माझी आजच्यापुरती शिधोरी माझ्या जवळच आहे. त्यामुळे मी त्यांच्याबरोबर गेलो नाही. यात्राकंपनीवाल्याचे भोजनगृह उद्यापासून सुरू होईल.

भोजनोत्तर पुन्हा एकमेकांची ओळख, माहितीही गप्पांच्या ओघात आणखी झाली. आम्ही पाच माणसे तरी एकमेकांना बरे सह-प्रवासी आहोत असे मानू लागलो. राहिलेले २५ प्रवासी उद्या सहा वाजता या पुण्यातूनच बसच्या वेळेवर येणार आहेत असे दिसते. पावणेअकरा वाजल्यावर आम्ही बैठक संपविली. माझ्या उशागतीच्या दिव्याखाली मीच एकटा ही 'वासरी' लिहितो आहे.

गेल्या पंचावन्न वर्षांत प्रवासाच्या सहली अशा पस्तीस-चाळीस तरी झाल्या असतील. काही सभा-सम्मेलनांच्या निमित्ताने तर काही हौस म्हणून. परंतु एक सोडून बाकी सर्व माझ्या मीच आयोजित केलेल्या होत्या. मी कुणाबरोबर जाण्या-ऐवजी माझ्या बरोबरच आप्त व इष्टमित्र येत असत. पण आता या वयात (सत्त्याहत्तर) ते कठीण आहे. आणि त्यातून ही नर्मदा प्रदक्षिणा तर फारच कठीण! म्हणून ही पुण्याच्या यात्राकंपनीची, मोटर-बस यात्रा पत्करली. नर्मदेची एकूण लांबी १३१२ कि. मी. आहे.* परंतु ही मोटर-बस पुण्यापासून पुन्हा पुण्याला येईपर्यंत चार हजार किलोमीटरच्या वर चालणार आहे. पुणे ते नर्मदा नदी आणि परत. या अंतराशिवाय वडोदरा, इंदौर, उज्जैन वगैरे शहरीही ती शहरे पाहाण्यासाठी बस प्रवाशांना घेऊन जाते. म्हणून अंतर थोडेसे वाढते.

प्रदक्षिणेच्या मार्गावरची नर्मदातीरावरची आम्ही जाणार आहोत ती गावे बहुतेक सर्व तीर्थक्षेत्रे आहेत. मग मी जो या प्रदक्षिणेला निघालो आहे तो मी, धार्मिक अगर भक्तिमार्गी भाविक आहे का? तसा श्रद्धावान आहे का? तसा नाही. पण मी सर्वस्वी श्रद्धाहीन नाही. सर्वशक्तिमान् जगच्चालकाला मी मानतो. प्रार्थनेने माझ्या मनाला आत्मिक बळ मिळते. परंतु काम्य कर्मे मी मानत नाही. गर्दीत घामाघूम होऊनही दर्शन झालेच पाहिजे असा माझा अट्टाहास नाही. ते चुकल्यास हळहळ वाटत नाही. सहज होण्यासारखे दर्शन असल्यास टाळीत नाही. बहुतेक तीर्थस्थळे ही सौंदर्यस्थळेही आहेत. म्हणून इतर सौंदर्यस्थळांप्रमाणे ती पहावीशी वाटतात. पंचवीस-सव्वीस दिवसांची ही प्रदक्षिणा रानावनांतून, मैदानांतून तसेच डोंगरी चढउतारावरून, गर्द जंगलांतून अशी व्हायची आहे. भरपूर दमायला होईपर्यंत अमर्याद भटकायला मिळणार आहे. ह्या सर्वांचे आकर्षण तरुण वया-पासून आतापर्यंत टिकून आहे. या सर्व गोष्टींच्या मोहामुळे मी या 'परिकम्मेला' निघालो आहे. कोणत्याही मोठ्या सहलीहून परतल्यावर जीवन समृद्ध झाल्यासारखे वाटते. तसे यावेळीही वाटेल अशी खात्री आहे.

---

* **टीप :** नर्मदा प्रदक्षिणेचा लेखकाने स्वतः तयार केलेला नकाशा. तसेच सरकारच्या संकलित नर्मदा प्रकल्पाची माहिती या पुस्तकात इतरत्र दिली आहे. तसेच नर्मदेची व उगमस्थानाची पौराणिक व ऐतिहासिक माहिती लेखकाने पुढे जरूर त्या त्या ठिकाणी दिली आहे

# शुक्रवार दि. ६ फेब्रुवारी

* * * * * * * * * * * * *

**श्री :** **दुसरा दिवस** **धुळे**

पुण्यास आज ब्राह्ममुहूर्तावर उठून सर्व आटोपून सहा वाजताच सामानासह खाली आलो. आमच्या मुक्कामाच्या खाली, समोरच पुण्याचा दक्षिणाभिमुखी मारुती आहे. तिथूनच बस साडेसहाला सुटायची होती. सर्व मंडळी अगदी वेळेवर आली. कोणीच राहिले अगर उशीरा आले असे झाले नाही. यात्राकंपनीवाल्यांनीच समोरच्या हॉटेलवाल्याला उठवून चहाची व्यवस्था केली. बहुतेकांनी चहा अगर कॉफी दोन-दोन कप घेतली. व्यवस्थापकांनी प्रवासी गाडीत बसवताना प्रत्येकाचे नाव पुकारून आसनाचे क्रमांकही सांगितले. ३ × २ अशी सेमी-लक्झरी बस आहे. तिहेरी बाकावर माझा क्रमांक खिडकीजवळ आला होता. तो मी कुर्ल्याच्या भातखंडे वहिनींना दिला. शेवट पर्यंत ! आज प्रवासी जिथे बसले होते तिथून उद्या ते पुढच्या बाकावर त्याच अनुक्रमाने पुढे सरकायचे व एकदम पुढच्या बाकावर आज बसलेल्यांनी उद्या एकदम मागच्या बाकावर, त्याच अनुक्रमाने जाऊन बसायचे. अशी व्यवस्था अनेक दिवसांच्या सहलींत नेहमीच असते असे म्हणतात. ही व्यवस्था सर्वांना समान संधी देणार म्हणून बरी वाटली. बस जवळ जवळ वेळेवर सुटली आणि पुण्याबाहेर पडून पुणे-नाशिक रस्त्याला लागली. नऊ वाजता नारायणगावला बऱ्याशा हॉटेलात न्याहारी व चहा झाला. गाडी पुढे चालू लागली. हरिश्चंद्रगड दिसल्याबरोबर, तेथील कोकण कड्यावरून, ठाण्याच्या एका (बर्वे) गिर्यारोहक तरुणाने केलेली आत्महत्त्या व पुढे, त्याचे प्रेत, दिसत असले तरी ते प्रत्यक्ष काढावयाला लागलेले पंधरा दिवस व प्रयास आठवले. फार बेचैन करणारा प्रकार होता तो ! गाडी सिन्नरवरून नाशिकरोडच्या मार्गास लागली. नाशिक शहरातून पंचवटीला आली आणि थांबली. जिथे जेवण झाले ती एक सुमार अस्वच्छ धर्मशाळा होती. पुण्याहून तयार करून आणलेले जेवण इथे गरम करून वाढले. गोड पक्वान्नाचे जेवण असूनही सभोवतीच्या प्रदूषणामुळे प्रसन्नता वाटली नाही. शिवाय यापुढेही अशाच जागा मिळणार आहेत की काय म्हणून

मन आशंकू लागले. काही सहप्रवासी जेवायच्या आधीच्या अर्ध्या-पाऊण तासात राम-दर्शन उरकून आले. विशेषतः महिला !

दोन वाजता गाडी आग्रारोडने पुढे चालू लागली. चार वाजता मालेगावच्या सरहद्दीवर 'शिल्पा' नावाच्या हॉटेलात चांगला चहा झाला. सहाच्या सुमारास गाडी धुळ्यात आली. दिवस थंडीचे होते. तेव्हा सहा वाजता दिवस मावळायला येतोच. धुळ्याला, धुळीतच हा हॉल ऐन गावाच्या आधीच येतो. हॉलमधील धूळ झाडून होईस्तोवर सामानासह बाजूला उभे राहाणे भाग होते. बैठकी घातल्यावर त्यावर सामान लावून ठेवून आम्ही गावात फिरायला निघालो. जेवण रात्री नऊ वाजता होते. बाहेर जायला दुसरे एक निमित्त होते. गाडीतील शेजारी भातखंडे यांनी परतताना गाडी धुळ्याला आली की त्या दिवशीची मुंबईची रेल्वे तिकिटे (आरक्षित) काढायचे ठरविले होते. धुळ्याहून रात्री रोज दोन डबे आरक्षित जागांचे चाळीसगावला अमृतसर एक्स्प्रेसला जोडून थेट मुंबईला जातात. तेव्हा मुंबईला जायला ही व्यवस्था सोयीची वाटली. म्हणून मीही रेल्वेचे तिकीट काढायचे ठरविले. येताना दुधाची कढई दिसली. धुळ्याला दूध मुबलक ! ते घेतले.

जेवणाच्या आधी भरपूर वेळ असल्यामुळे (कारण जेवण सगळेच पहिल्यापासून तयार व्हायचे असल्यामुळे) एक एक ओळखी वाढू लागल्या. गाडीमध्ये सबंध दिवस गेल्यावर, गाडीत केवळ डाव्या-उजव्या बाजूस बसलेल्या मंडळींच्या तेवढ्या ओळखी, त्यासुद्धा अक्षरशः नावापुरत्या झाल्या होत्या. आता हॉलमध्ये असलेल्या चाळीस प्रवाशांना आणखी चोवीस दिवस एकत्र काढायचे होते. तेव्हा कोण कुठला हे जाणण्याची उत्सुकता अनेकांना होती. वास्तविक 'यथा काष्ठं च काष्ठं च....' सारख्या या गाठी पडलेल्या होत्या. पण मनुष्य हा कळप करून राहाणारा प्राणी आहे. या आमच्या कळपाची वर्गवारी अशी असल्याचे थोड्या वेळाने आढळून आले. आठ पुरुष सपत्नीक होते आणि आम्ही आठ जण सडे पुरुष होतो. बाकीच्या सोळा सड्या बायका होत्या. म्हणजे सोळा पुरुष व चोवीस बायका अशी गोळाबेरीज होती. सर्व जण पांढरपेशे होते. बहुतेक मंडळी उच्चवर्णीय होती. एक तरुण पुरुष व एक तरुण स्त्री बाजूला काढली तर बाकीच्यांची वयाची सरासरी एकूणसाठ एवढी पडावी असा माझा अंदाज झाला. निवृत्त अगर निवृत्तीला आलेली अशीच मंडळी बहुसंख्य होती. स्त्रियांमध्ये तर आजी अगर माजी मुख्याध्यापिका, उपमुख्याध्यापिका अगर अध्यापिका ही जमात जास्त होती. तेव्हा बडबडणे हा नुसता स्वभावच नव्हे तर धर्मही होता. रोजचे कर्म होते.

पुण्याच्या 'बसेरा'मध्ये मुक्कामाला असलेल्या आम्हा पांचजणांशिवाय बाकीची पस्तीस माणसे जरी आज पहाटे पुण्याहूनच बस-गाडीत बसली असली तरी ती सर्व पुणेकर मण्डळी नव्हती. दोन महिला होत्या सातार कऱ्हाड कडल्या. तर चारजण होती ठाण्याची. एक इनामदार पति-पत्नी व दुसरे जोडपे होते सोमणांचे. आणखीही तीनचार बाहेरगावची माणसे असावीत. तरीपण बहुसंख्या पुणेकरांची होती यांत शंका नाही. एकेकाची स्वभाव वैशिष्ट्ये इतक्यात कळणार नाहीतच. सध्या फक्त रंगरूपच जाणता आले. या चाळीस मंडळींत आम्हा आठ सड्या पुरुषांचा काही गट नव्हता. बाकी सर्वजणांचे आपापले गट होते. गट नसलेले परंतु गट करण्याची आवश्यकता असलेले आम्ही आठजण आहोत.

आम्हा आठ सड्या पुरुषांपैकी दोन पुरोहित होते. एक प्रेमाभाई पुरोहित हे गुजराथी निवृत्त शिक्षक तर दुसरे भाऊसाहेब पुरोहित हे मराठी, सेवानिवृत्त सरकारी अभियंते. तिसरे तरुण अभ्यंकर, एम्. एस्. ई. बी. तले; अजून नोकरीत असलेले. इथे आल्यावर त्यांनी कपडे बदलून लुंगी (मुंडू) पेहेनली. म्हणून त्यांना आम्ही स्वामी म्हणू लागलो. चौथे शेटये! निवृत्त! हे आडनावावरून वैश्य वाटत असले तरी ते देशस्थ ब्राह्मण आहेत. वेळ सापडला की ते पोथी वाचीत. बहुतेक गुरुचरित्राची! यांच्या बाबतीत आमचे नाव अवधूत! पाचवे श्री. ओरपे, अहमदाबादचे. सहावे सहस्रबुद्धे. हे पूर्वी परदेशात (नायजेरिया का अल्जेरिया?) राहात होते. हे आपल्या वृद्ध भगिनी व त्यांचे यजमान यांच्याबरोबर असलेले एक अभियंते. सातवे अनंत शास्त्री देवासकर. नाव देवासकर असले तरी राहाणारे इंदौरचे. यात्राकंपनीच्या मालकांचे गुरुजी. पढीक याज्ञिक. बोलण्यात अस्सल इंदौरीबाज! त्यातून भरपूर बोलका! आणि आठवा, प्रथम पुरुषी एकवचनी मी.

आत्ताचे जेवण बरेच समाधानकारक होते. शिवाय ताजे, गरमागरम! आवारात धूळ असली तरी इथे आत घाणेरडेपणा वाटत नाही. यापुढे जरी इतपत राहाण्या-जेवण्याचे जमले तरी पुष्कळ! आज पुण्याहून निघण्यापूर्वी प्रत्येकजण आपापल्या मुक्कामावर बऱ्याच पहाटे उठलेला आहे. आता रात्रीचे साडेदहा वाजून गेले आहेत. हॉलमधला एकेक दिवा मालविला जात आहे. तेव्हा हे लिखाणही थांबवणे भाग आहे.

# शनिवार दि. ७ फेब्रुवारी

❊ ❊ ❊ ❊ ❊ ❊ ❊ ❊ ❊ ❊ ❊ ❊ ❊

श्री : तिसरा दिवस ओंकारेश्वर

आज धुळ्याला भल्या पहाटे उठावे लागले. पहिला चहा चार वाजता व दुसरा स्नानोत्तर, न्याहारीबरोबर साडेपाच वाजता. साडेसहा वाजता गाडी, आग्रारोडने ओंकारेश्वरला जाण्यासाठी चालूसुद्धा लागली. दीड तासात शिरपूर आले. आणखी अर्ध्यातासात महाराष्ट्र-मध्यप्रदेशाच्या सरहद्दीवर आलो. गाडी घाट चढत होती. एकूण चढ बेताचाच होता, चांगली 'टयून' केलेली 'कार' टॉप गिअर न बदलता सहज चढली असती. गेल्या महिन्यातसुद्धा मला जवळचा तसाच लांबचा प्रवास घडला होता. आणि मी एक नवल पाहात होतो. जानेवारी-फेब्रुवारीचा आरंभ, हा खरे म्हणजे पानगळीचाच हंगाम; परंतु वड, पिंपळ, आंबा, करंज, जांभूळ वगैरे नागरी वृक्षांना पालवी फुटलेली होती. मार्च-एप्रिलच्या वसंत ऋतूंत जे व्हायचे, तो वसंताचा पालवीचा हंगाम आताच सुरू झाला होता. म्हणजे ऋतूचक्र बदलत तर नाही ना ! साग, ऐन वगैरे जंगली झाडे मात्र वसंतऋतूसाठी थांबली होती. घाटाचा उतारही संपला होता. प्रांतांतर संपूर्ण होऊन आम्ही आता मध्यप्रदेशात प्रवेश केला होता. दोन्ही बाजूंना भिलाव्या (भिलवाड्या) होत्या. त्यामुळे फरक काहीच वाटला नाही. सेंधवा जवळ आले तसा फरक दिसू लागला. घागरा-ओढणीवाल्या कामकरी बायका दिसू लागल्या. सेंधवा गावाच्या (आधी) सरहद्दीवर 'बीजावांसी माता' देवीच्या मंदिरापाशी गाडी उभी राहिली. सकाळपासून शंभर कि. मि. गाडी आली होती. फक्त साडेअकरा वाजले होते. पुढे सोईस्कर असे स्थान नसल्यामुळे व्यवस्थापकाने इथे जेवणाचा कार्यक्रम उरकायचे ठरविले. म. प्र. आग्रा रोडवरचे हे पहिलेच मोठे गाव. या आवारात तीन मंदिरे होती. देवळाच्या सावलीत बैठका घातल्याबरोबर काही मंडळी त्यावर आडवीसुद्धा झाली. वडाच्या वृक्षाला बांधलेल्या पारावर पंगत बसण्यास चांगली जागा होती. बहुसंख्य महिला मात्र देवदर्शनात गुंतल्या. त्यांपैकी काही जाता जाता आपल्या पतीराजांना ऐकू जाईल अशा आवाजात म्हणत होत्या, 'बैठक पाहिली की ताणून

द्यायची ? जसे काही चालतच आलेयत धापा टाकीत !' पतिराजांनी आपल्याला जणू काही ऐकू आलेच नाही असा सोईस्कर आव आणला होता.

धुळ्यात पहाटे शिजवून आणलेले अन्न इथे गरम केले होते. बसायला पारावर चटयांचे पट्टे टाकून, पुढे मांडलेली ताटे वाढायला सुरुवात झाली. मंडळी पानावर येऊन बसली. 'वदनी कवळ' म्हणून झाले. नंतर तावडतोबच मी 'यन्तु नदयो वर्षन्तु पर्जन्याः–' सुरू केले. याला देवासकरांनी आपला याज्ञिकीत कमावलेला खर्जातला आवाज लावला. इतर दोघांनी पण साथ दिली. 'हरहर महादेव' होऊन मंडळींचे आरामात भोजन झाले. यात्राकंपनीच्या कर्मचाऱ्यांची जेवणे व मागील आवराआवर होईपर्यंत आणखी पन्नास मिनिटे गेली. बसगाडीने निघण्याचा इशारा दिल्यावर आडवारलेल्या मंडळींना उठावेच लागले. यात्रीमंडळी गाडीत येऊन बसल्यावर गाडी चालू लागली. परंतु दहा मिनिटांनीच थांबली. जकात नाके व मध्यप्रदेशाचा परवाना वगैरे सोपस्कारात आणखी अर्धातास गेला. आग्रा रोडवरचे पुढचे गाव जुलवानिया. या गावानंतर गाडी आग्रारोड सोडून उजवीकडे वळून खरगोन-खांडवा या रस्त्यावर धावू लागली. सगळा रखरखीत प्रांत. सावली म्हणून कुठे दिसेना. उलट या थंडीच्या दिवसांत, भर दुपारच्या, बाहेरच्या उन्हाच्या झळा गाडीत जाणवू लागल्या. या पुढील प्रवासासाठी आता गाडीचा शिरस्ता असा ठरला की, चहासारखा काही कार्यक्रम नसला तरी 'करंगळीवर' कार्यक्रमासाठी दर तीन तासांनी गाडी थांबवावी. तोही कार्यक्रम झाला. वाटेत खरगोन, अंदाड, बेहेडा, सनावत इत्यादि मोठी मोठी गावे विशेषतः तेथील चांगली चांगली उपहारगृहे, आली आणि गेली तरी चहाचा पत्ता नाही. पाच वाजून गेले आणि मोरटक्का (ओंकारेश्वर रोड) हे मुक्कामाच्या पंधराच मिनिटे आधीचे गाव आले आणि प्रवासी बंधूंनी गाडी थांबवणे भाग पाडले. नाखुषीने जेमतेम एकएक कप चहा मिळाला. ओंकार मांधाता गाव आले. अड्ड्यावर गाडी थांबली. आम्ही खाली उतरून व्यवस्थापकाबरोबर या 'राजपूत क्षत्रिय धर्मशाळेत' दुसऱ्या मजल्यावरच्या एका खोलीत आमचा मुक्काम टाकला आहे. आम्हा सात सख्या प्रवाशांसाठी ही खोली आहे. जेमतेम सात अंथरुणे इथे राहातील. पैकी दोन वाटेत. सर्व खोल्या अशाच सिंगल आहेत. परंतु दर एक खोलीच्या मापांत-क्षेत्रफळांत-थोडे थोडे अंतर आहे. प्रत्येक खोलीच्या देणगीदारानेही देणगीमध्ये पाच-सातशे रुपयांचा फरक ठेवला आहे. त्याचा हा परिणाम. सर्वांनाच गचडी झाली आहे. विशेषतः आठ सपत्निकांना. आणखी दोन खोल्यातरी राखून ठेवायला हव्या होत्या. मंडळी

कुजबुजत होती. कडक तक्रार करण्यात काही अर्थ नव्हता असे अनुभवी प्रवाशांकडून समजले.

सामान ठिकाणी लागल्यावर, भाऊसाहेब पुरोहित (निवृत्त अभियंते) स्वामी आणि मी बाहेर पडलो. दुसऱ्या मजल्यावरून नदीवरचा पूल व पुलाच्या पलीकडे, डोंगरात ओंकारेश्वराचे मंदिरही दिसले होते. सबंध जेवण तयार व्हायचे होते. म्हणजे उशीर होणारच होता. हे ओळखून आम्ही बरोबर धुण्याचे कपडेही घेतले. पलीकडे जाऊन कपडे धुतले. सावकाशपणे दर्शन घेतले. तपशील टिपता आला. गर्भगृह अगदी लहान आहे. आमच्यापैकी 'अवधूत' तिथे भेटले. आमची चार जणांचीसुद्धां त्या गर्भगृहाला गर्दीच झाली. आधी दोघेजण तिथे होते. बारा ज्योतिर्लिंगाच्या श्लोकामधील हे चौथे ज्योतिर्लिंग. कळसापर्यंत या देवळाला लहान लहान असे पाच मजले आहेत. वर वर मजले लहान होत गेले आहेत. पहिल्या मजल्यावर, खालच्या ज्योतिर्लिंगाच्या बरोबर वर, महांकाळेश्वराची स्थापना केलेली आहे. उज्जैनीला महांकाळेश्वर मंदिराच्या बांधकामात म्हणतात नेमके याच्या उलट आहे. म्हणजे उज्जैनीच्या महांकाळेश्वर देवळाच्या पहिल्या मजल्यावर ओंकारेश्वर आहे. खोलीवर परतल्यावर पाहिले तर दुसऱ्या मजल्यावर (आम्ही याच मजल्यावर उतरलो आहोत) व्हरांड्यात जेवणाची पाने मांडली आहेत. मंडळी आपापल्या गटांनी पाने धरू लागली आहेत.

जेवायच्या आधी आम्ही दर्शन करून आलो हे फार बरे झाले. उद्या प्रदक्षिणेचा संकल्प सोडल्यावर प्रदक्षिणा पुरी होईपर्यंत नदी ओलांडायची नाही! पुलावरून नाही नि अगदी पोहूनसुद्धा नाही. तसा दंडकच आहे म्हणतात परिकम्मावाल्यांसाठी!

दुपारी खरगोन सोडले आणि मला आठवण झाली की या बाजूलाच, जुन्या, उत्तरेस जाण्याच्या रस्त्यावर नर्मदेच्या काठी आमच्या थोरल्या बाजीरावसाहेबांची समाधी आहे आणि नर्मदेच्या होणाऱ्या मोठ्या प्रकल्पांत ती बुडून जाणार आहे. गाडीवाले गाडी तिकडे नेतील काय? माझी ही कल्पना शेजारच्या चार जणांना सांगितली. त्यांना ती पटली. चार जणांनी मिळून यात्रा-व्यवस्थापकांना वाटेत गाडी उभी राहिली तेव्हा ती सांगितली. 'परतताना आपण नक्की जाऊ' असे व्यवस्थापकांनी पुन्हा पुन्हा आश्वासन दिले. समाधान वाटले.

# रविवार दि. ८ फेब्रुवारी

❊ ❊ ❊ ❊ ❊ ❊ ❊ ❊ ❊ ❊ ❊ ❊ ❊ ❊

श्री : चौथा दिवस बडवानी

पहाटे ओंकारेश्वरला जाग आल्याबरोबर सर्वच सहप्रवाशांची आज प्राथमिक विधी आटोपून घेण्याची धांदल दिसत होती. आज संकल्पाचा दिवस! यात्रेच्या प्रारंभाचा दिवस हे भान सगळ्यांनाच होते.

'आज नाष्टा घाटावरून संकल्प सोडून आल्यावर घ्यायचा असेल ना?' अवधूत पहिला चहा घेतां घेतां विचारीत होते.

'काय तुम्ही अवधूत! आपण आता उत्तरेंत आलो आहोत. इथला रिवाज म्हणजे पहिला नाष्टा! मग 'अस्नान' वगैरे.'—मी.

'म्हणजे तुम्ही संकल्पाआधी नाष्टा घेणार?'—

'देश तसा वेश! मग नकोका घ्यायला?'—

'मी काही घेणार नाही बुवा!'

'अवधूत तुम्ही नकाच घेऊ! खाल्लेले तुम्हाला 'खात' राहील.' 'परंतु आम्ही मात्र खाणार आहोत. आणि संकल्पाआधी पवित्र रेवा मैय्याचं स्नान होणारच आहे. पाप राहाणार कुठे शिल्लक?'—मी.

'तुम्ही आबा, शास्त्रीय आधार मात्र चांगला सांगितलात. पण मी मात्र खाणार नाही आहे काही.' अवधूतांनी नक्की ठरविले.

चाळीसच्या चाळीस 'परिकम्मा'वाले स्नान करून घाटावर साडेआठ वाजतां सांगितल्याप्रमाणे हजर होते. रांगेतल्या चाळीस जणांना स्थानिक नियोजित भटजी संकल्प सांगू लागले. मधल्या भागात देवासकर गुरुजी सांगत होते. चाळीसाव्या माणसाच्या टोकाला मी होतो. इकडे मंत्र ऐकू येत नव्हते. कर्म समजत नव्हते. तेव्हा इकडे मंत्र मी म्हणू लागलो व क्रियाही सांगू लागलो. आजूबाजूच्या आमच्या सह-प्रवाशांना आश्चर्य वाटत होते. परंतु कोकणात ज्या ब्राह्मण मुलांचे लहानपण गेले आहे त्यांना प्राथमिक 'ब्रह्मकर्मे' शिकविली जात असत. पासष्ट-सत्तर वर्षांपूर्वीची गोष्ट आहे ही. आणि अनेक कारणांनी माझे हे 'म्हणणे' तरते राहिले होते. माझे हे 'म्हणणे' माझ्या आजोबांनी (वडिलांचे वडील) पढविले होते.

तसा मी ईश्वरावर श्रद्धा असणारा आहे. परंतु धार्मिक खुळे मला मुळीच पसंत नाहीत. देवाला अमुक काही दिले म्हणजे तुम्हाला तो तमुक फळ देतो असे समजणे हे झाले खूळ. ही खुळे मी आचरीत नाही. त्यापेक्षा चारित्र्यवान राहून अत्यंत निस्पृहपणे दुसऱ्याला जास्तीतजास्त मदत करीत राहाणे अगर तशा संस्थांतून सेवाकार्य करणे हे मी जास्त पुण्यप्रद समजतो. ईश्वर म्हणजे काही एकदा सरकारी लांचखाऊ ऑफीसर नव्हे, की त्याला टेबलाखाळून (हल्ली वरूनच घेतात) बंद पाकीट दिले की तो तुमचे टेंडर पास करील किंवा तुमचा चेक काढील. होणारे जे आहे तेच व्हायचे, 'ब्रह्मा तया आडवा आला' तरी ते चुकायचे नाही. मग प्रार्थना, उपासना या गोष्टींचा काही उपयोग नाही का ? आहे ! मन संतुलित राखण्यासाठी किंवा मनाला (संकटकाळी विशेषतः) बळकटी येण्यासाठी निश्चित उपयोग होतो. आणखीही बरेच सांगता येईल.

सहप्रवासी जे जे करीत त्यांत मी सहभागी झालो आहे. आणि पुढेही, पूजाअर्चा, मंत्रपुष्प देवे व आरती यांत सक्रीय सहभागी होणार आहे. परंतु ते एक सामूहिक कर्म म्हणून. त्यामुळे माझी भक्तीही उठून दिसणार आहे कदाचित. परंतु मनाचे भांडे इतर काहीजणांप्रमाणे श्रद्धेने भरलेले नसेल. माझी भूमिका, बाजूने अथवा विरुद्ध अशा प्रचारकाची नसल्यामुळे समूहाबरोबर राहायचे म्हणजे सामुहिक कार्यातही भाग घ्यावयास हवा, ही आहे.

आता जेवणाची वेळ होईपर्यंत मंडळी गटागटाने या तीरावरच्या भागात हिंडणार होती. प्रथम बहुतेक सर्वच सह-प्रवासी-ममलेश्वराच्या मंदिराकडे निघाले. ओंकार-ममलेश्वरापैकी हा ममलेश्वर आहे. माझ्या पुढ्यात चालणाऱ्या चार बायकांच्या घोळक्यात ठसक्यांत बोलणारी एक वृद्धा पण चालत होती. कालपासून तिला मी बघत होतो. ज्या तऱ्हेने ती बोलत होती त्यावरून ती 'आमच्या तिकडली' म्हणजे अष्टागरांतील असावी असे मला वाटत होते. परंतु आता ती आपल्याबरोबर असलेल्या दुसऱ्या वृद्धेला काहीतरी सांगत होती. :—

'अहो ती विष्णूची मूर्ती चांगली हातभर उंचीची आहे. आमच्या नानांनीच ती मुळात घडविली होती. आमच्या आत्याच्या प्रभाकरनी ती आता चांदीचा मुलामा देण्यासाठी नेली आहे.' हे शब्द माझ्या कानी पडतांच एक नवल वर्तले ! माझ्या डोक्यातली ट्यूब पेटली. लख्ख प्रकाश पडला. ती मूर्ती आणि तो प्रभाकर मला पंधराच दिवसांपूर्वी भेटला होता. मी झटदिशी जरा पुढे झालो आणि त्या सत्तर वर्षीय वृद्धेला सरळ विचारले :—

'तूं ×× ताईच ना?'

'? ? ? ?' ती क्षणभरच माझ्या चेहऱ्याकडे पाहातच राहिली आणि तिच्याही डोक्यांतली ट्यूब पेटली.

'तू धोंडू आत्याचा भाचा ×× च ना?' तिने मला उलट विचारले. मला माझ्या त्या आजोळच्या नावाने अलीकडे फारसे कुणी ओळखीत नाही. तिला जसं तिच्या माहेरचे लहानपणी, लग्नापूर्वी असलेले नाव ऐकून बरे वाटले तसेच ते माझे पूर्वीचे नाव ऐकून मनात कुठेतरी मी सुखावलो. एक्कावन वर्षांनंतर आम्ही एकमेकांना पाहात होतो. ही वृद्धा म्हणजे आंतरराष्ट्रीय कीर्तीचे ख्यातनाम शिल्पकार पद्मभूषण वि. पां. तथा नानासाहेब करमरकर यांची पुतणी. प्रख्यात समाजवादी विधायक कार्यकर्ते व शेतीतज्ञ आबासाहेब करमरकर यांची बहीण आहे. आणि तात्यासाहेब करमरकरांची मुलगी आहे. एकावन्न वर्षांपूर्वी या मुलीचे लग्न ठरले पुण्यांत. ती आपल्या आत्याकडे (वडिलांची मामेबहीण) म्हणजेच माझ्या मावशीकडे (आईची मावस बहीण) जिथे मी उतरलो होतो तिथेच मुक्कामाला होती व उपरोक्त प्रभाकर म्हणजे तिचा आतेभाऊ जो माझाही मावसभाऊ होता.

प्रवासाचे आणखी वीस दिवस बाकी आहेत. या वीस दिवसांत जुन्या आठवणी रवंथ करायला दोघांनाही एक मनुष्य मिळाले. आतां हिचे नाव साने-मावशी आहे. हिची मुलेबाळे सगळी सुस्थितीत आहेत. आता या पद्मजा साने (साने मावशी) पुण्यासच असतात.

ममलेश्वराचे देवस्थान हे अहिल्याबाई होळकरांच्या ट्रस्टपैकी देवस्थान! इथे कोटिलिंगे (मातीची) तयार करून त्यांची पूजा रोज होत असते. संख्येचा प्रश्न दुय्यम आहे. परंतु काही फळ्यांवर-असंख्य भोके असलेल्या फळ्यांवर-मातीची हजारो लिंगे केलेली दिसत होती खरी. शिवाय गर्भगृहात ममलेश्वर महादेव होतेच. देवळाच्या वरच्या पाचव्या मजल्यावरून नदीकडे पाहिले तर ती येथे 'ओंकारा'त वाहाते असे जे म्हणतात ते थोडेसे खरे वाटू लागते. नदीचे वळण तसे दिसते. नदीचा एक प्रवाह, ओंकारेश्वर मंदिर ज्या समोरच्या डोंगरावर आहे, त्या डोंगराच्या मागून गेला आहे, दुसरा हा आमच्या समोरून वाहातोय.

मुक्कामावर परत जाण्यासाठी पन्नास-पाऊणशे पायरी उतरायची होती व तेवढी पुन्हा चढायची होती. दमून-भागून आलेल्या यात्रींसाठी आज संकल्पाचे म्हणून खीरपुरीचे जेवण होते. सकाळी आज येथे अनेकांनी नदी-जल बरोबरच्या बाटलीत भरून घेतले आहे. ते अमरकंटकला सोडायचे व तिथून भरून घेऊन शेवटल्या

६२९
२६२२०

दिवशी पुन्हा इथे येऊ, तेव्हा इथे वाहायचे आहे. नदी ओलांडायची नाही. रोज शक्य तो नदीचे स्नान करावयाचे आहे. मांसाहार करायचा नाही, व्रतस्थ राहायचे असे नियम आहेत. नर्मदा ही कुमारिका आहे असे म्हणतात. दुसरी कोणतीच मोठीशी नाव घेण्यासारखी नदी या नदीला येऊन मिळत नाही. म्हणून हिला कुमारी समजतात अशी एक शक्यता आहे. हिच्या कांठीच्या तीर्थक्षेत्री जो दानधर्म करतात त्यात कुमारिकांना भोजन, कपडे व इतर वापरण्याच्या वस्तू यांचा हमखास समावेश असतो. आजपासून या रेवामय्याच्या बाबतीत अनेक पुराणकथा ऐकू येणार आहेत असे दिसते. अमरकंटक या उगमस्थानाकडे गेल्यावर बुद्धीला काही पटेल असा काही निष्कर्ष काढता येतो का पाहू ! तेव्हा पुन्हा टिपणे होतीलच.

प्रदक्षिणा ही आपण नेहमी ज्याला प्रदक्षिणा घालायची त्या दैवताला, आपल्या डाव्या हाताकडून वळसा घालून, आपल्या उजवीकडून परत येणे, अशीच समजतो. आमची आजपासून तशीच सुरुवात झाली आहे. ही नदी भडोचच्या आखातात समुद्रास मिळते तिथपर्यंत जाऊन तिथे खाऱ्या पाण्याचा समुद्र आम्ही ओलांडणार आहोत आणि तिथून अमरकंटकला उगमापर्यंत जाऊन उगमालाही वळसा घालून पुन्हा परत ओंकारेश्वरला येणार आहोत. अमरकंटकला सुरुवात करून याच्या उलटही प्रदक्षिणा करतात असे येथे समजले. परंतु ही म्हणजे 'प्रदक्षिणा' या शब्दाची थट्टा झाली. प्रदक्षिणा जर कुणी उलट्या घातल्या तर त्या माणसाला भोवळ येईल असे वाटते. आणखी एक आन्हिक आजपासून सुरू झाले आहे. ते म्हणजे जेवणाआधी दोन्ही वेळा नर्मदेची आरती, स्तोत्र व मंत्रपुष्प. ठाण्याचे नानासाहेब इनामदार यजमान आणि देवासकर हे गुरुजी अशी जोडी जमली आहे.

दुपारी वामकुक्षीनंतर बडवानी या दुसऱ्या मुक्कामाकडे जाण्यासाठी बस निघाली. आग्रारोडवरील जुलवानियापर्यंत कालच्याच रस्त्याने परत जायचे होते. त्याच मोरटक्का (ओंकारेश्वर रोड), सनावद, बेहेडा, अंदाड, खरगोन या गावां-वरून. जुलवानियाला चहा घेऊन बस आतां आग्रारोडच्या पश्चिमेकडे गुजराथच्या रस्त्याकडे निघाली आणि अंजाड आणि राजपूर या मोठ्या गावांवरून बडवानी या पूर्वीच्या जहागिरीच्या गावी, या जुन्या राजवाडा-कम-धर्मशाळा अशा इमारतीत मुक्कामाला आलो. रात्री जेवणे उरकल्यावर राजवाडा चौकातच फिरण्यास आलो. इथे दुधाची कढई दिसली. निजण्यापूर्वी दूध चांगले मिळाले.

# सोमवार दि. ९ फेब्रुवारी

❋ ❋ ❋ ❋ ❋ ❋ ❋ ❋ ❋ ❋ ❋ ❋ ❋

श्री : पाचवा दिवस राजपिपळा

'जोगळेकर! आज मात्र ही खरीखुरी 'धर्मशाळा' मिळाली आहे आपल्याला.' आमचे भाऊ पुरोहित, खाकेतली पिशवी खाली ठेवीत म्हणत होते. 'खोल्या नाहीत नी खाटा नाहीत.'

'पलीकडे कुणा फक्कडांची धुमी पेटलेली पण दिसत आहे. त्या सोप्यात तर काही हंडीबाग पण दिसत आहेत. तुम्ही खरीखुरी धर्मशाळा म्हणालात तेच बरोबर आहे.'—मी.

'आतां साडेदहा वाजून गेले आहेत. जेवायला बारा वाजणार! तोपर्यंत एक झोप होईल छानशी. धर्मशाळा खरी कशी आहे ते उद्या सकाळी उजाडल्यावर दिसणारच आहे.' असे म्हणत स्वामींनी आडवे पडून अंगावर चक्क पांघरूण घेतले. इतर अनेकांनी पण तोच मार्ग अवलंबिलेला दिसत आहे. मी मात्र विचार केला आणि ही डायरी काढून लिहायला घेतली आहे. हे आमचे आन्हिकच आहे. चुकवून चालणार नाही.

बडवानीला, आज पहाटे पाच वाजता जाग आली ती छानशी झोप झाल्यावर. पहिला चहा वगैरे आटोपून मी काल रात्रीच व्हरांड्यात एका पार्टिशनच्या अर्धवट आडोशाला सोईस्कर अशी जागा पाहून ठेवली होती. सकाळी उठल्यावर आसने वगैरे व्यायाम करण्यासाठी. चार दिवसांत पहिल्यांदाच ही संधी मिळत होती. मोठ्या हॉलमध्ये इतरांच्या देखत या गोष्टी करायच्या म्हणजे उगाच आपण स्वतःला मिरविण्यासारखे वाटते. म्हणून मी त्या टाळतो. नदीवर स्नानासाठी बसनेच जायचे होते. बसनेही दहा मिनिटांच्या रस्त्यावर नदी होती. नदीच्या वाळवंटात अर्ध्यावर लहानसा घाट बांधलेला होता. त्याच्यापासूनही पाणी दूरच होते; परंतु कपडे काढून ठेवण्यास त्याचा उपयोग चांगला झाला. पाणी फारसे नव्हते. ढोपरभर पाण्यातच आंघोळ करावी लागली. कपडे धुता आले नाहीतच. पलीकडल्या तीरावर जाण्यासाठी नवीनच पूल बांधलेला दिसत होता. आज इथे व उद्या राज-पिपळयाला या दोनच ठिकाणी नदीच्या पात्रांत, नर्मदे–गणपती, रंगीत दगड,

गारगोट्या व स्फटिक मिळतात असे समजले होते. म्हणून मी इथे आल्यापासून खाली बघून चालत होतो. पाण्यात जास्त वेळ डुंबत न बसता कोरडे कपडे करून त्याच शोधांत होतो. मी काहीतरी शोधतोय व वेचतोय असे बघून दुसऱ्या दोन आजी अगर माजी मुख्याध्यापिका किंवा उपमुख्याध्यापिका पण तसलेच दगड वेचून घेण्यासाठी माझ्याबरोबर धुंडू लागल्या. मधूनमधून 'हा चांगला आहे काहो?' अगर 'हा खरा आहे काहो?' म्हणून सल्लाही विचारीत होत्या. वरचेवर माझा हा रत्नपारखीपणा (का गाजर पारखीपणा) पणाला लागू लागला. मोटरवालाही हॉर्न वाजवू लागला तेव्हा अखेर मी त्यांना सल्ला दिला की, 'चांगले वाटतील ते दगड आता घेऊन तर ठेवा. मुक्कामावर गेल्यावर मग निवडू चांगले वाईट.' तिथून निघालो तेव्हा प्रत्येकाकडे दोन दोन किलो दगड पिशव्यांतून गोळा झाले होते. मोटरबसपर्यंत तर न्यायचे होते. मला माझ्या वास्तु-स्थापत्यकला शिकणाऱ्या नातीने ते आणण्याबद्दल बजावून ठेवले होते. नदीघाटावरची देवळे राऊळे (एक शंकर व एक देवी) व दर्शने आटोपून मुक्कामावर येतोय तो न्याहारीची जय्यत तयारी झाली होती. आज केवळ न्याहारी घेऊन निघायचे होते. राजपिपळा म्हणजे नऊ दहा तासांचा प्रवास होता. निघालो वेळेवर. पण पाच मिनिटांतच गाडी थांबली. आज पुन्हा प्रांतांतर होते. त्याचा परवाना घ्यायचा होता. त्याला तास दीड तास लागला. दहा वाजता पुन्हा बस निघाली. रस्ता एकुलता एक होता. कालच्या राजपूर अंजाडवरून गाडी महाराष्ट्रातल्या शहाद्याकडे निघाली. हा मध्यप्रदेशाचा भाग इतका कंटाळवाणा होता! वाटेत गावे नाहीत. एके ठिकाणी मोट चालताना दिसल्याबरोबर गाडी थांबली. मंडळी पाणी पिऊन आली. आता रस्ता इतका एकलकोंडा होता की अर्ध्या अर्ध्या तासाने रस्त्याला एकसुद्धा लहानमोठा फाटा फुटलेला दिसत नव्हता. मग क्वचित रस्त्याच्या बाजूला गावाच्या नावाच्या पाट्या दिसू लागल्या. नुसत्या पाट्याच. त्याही क्वचितच! पण दूरवरही, गावाचा मात्र पत्ता दिसत नव्हता. रस्त्याला अगदी एकटें एकटें वाटायला नको म्हणून सरकारी आश्वासनांप्रमाणे एकट्या रस्त्याला धीर यावा म्हणून त्या लावल्या होत्या किंवा कसे कुणास ठाऊक! अखेर दुपारी साडेबारा वाजल्यावर जेवणाचे ठिकाण आले. झंकार-निवेली! सभोवार बऱ्यापैकी झाडी होती. चावडीच्या पडवीत जेवणे झाली. आरामासाठी शंकराचे देऊळ उंच जोत्याचे होते. दुपारच्या वेळी कोणतीही व्यग्रता नसताना प्रथमच सर्वजण गप्पा मारण्याच्या मूडमध्ये असे बसलो होतो. ओळखी व सलगी वाढत होती. महिलाही समोरच बसल्या होत्या. त्याही भाग घेत

होत्या. उखाणे, कोडी, श्लेषात्मक द्व्यर्थी संस्कृत काव्ये, 'आम्ही त्या 'ह्या' सहलीला गेलो होतो'....तेव्हाच्या गोष्टी वगैरेना रंग आला होता.

गाडी शहाद्याला महाराष्ट्रात आली. इथे चहा झाला. पुढे तळोदा, अक्कलकुवा, नवापाडा करीत सातपुड्याच्या मेरे मेरेनी गाडी चालली होती. दिवस मावळताना गाडी राजघाट या गावी गुजराथेत शिरली. पुढच्या घाटांत जाईतो अंधार पडला. त्याच्या पुढे एका पुलाचे काम चालू असल्यामुळे आडवळणाचा रस्ता (डायव्हर्शन) होता. रात्र पडल्यामुळे तो कुणाच्या (ड्रायव्हरच्या व व्यवस्थापकांच्या) लक्षात आला नाही आणि गाडी पुढे गेल्यावर पुन्हा पुन्हा त्याच ठिकाणी येऊ लागली. 'चकवा' म्हणतात तसे झाले. पुन्हा गाडी मागे घेऊन डायव्हर्शन शोधून काढले. गाडी मार्गाला लागली असे वाटले; परंतु गाडी, पंधरा मिनिटे झाली तरी, पलीकडील बाजूस मोठ्या रस्त्याला लागेना. सभोवताली जंगलच होते. परंतु चांदणी रात्र होती. कच्च्या रस्त्यावरून गाडी चढावावर चढणे सोपे जावे म्हणून दोनचार वृद्ध व दुर्बल प्रवाशांखेरीज बाकी सर्वजण खाली उतरले होते. तरी चढावाच्या पुढे नीटसा रस्ता दिसेना. म्हणून व्यवस्थापक व चालक पायी पायी रस्ता शोधण्याकरता पुढे गेले.

सभोवताली जंगल पाहून काही प्रवासी गडबडून गेले, घाबरले व देवाचे नाव घेऊ लागले. तर काही त्यांच्या बरोबरचे सहकारी त्यांना धीर देऊ लागले. पण खरे म्हणजे बाहेर चांदण्यात बसलेल्या आम्हाला सभोवतालची वनश्री व चंदेरी चांदण्यांची बरसात बघून चांदरात्रीच्या कविता आठवून म्हणाव्याशा वाटत होत्या. सभोवताल इतका अद्भुत रम्य वाटत होता. 'चांदणे शिंपीत जाशी....' अगर 'फुलले नभि चांदणे....' या कविता गुणगुणायला सुरुवातही झाली. भीतीचा लवलेश वाटला नाही. शिवाय एकूण सर्व मिळून आम्ही पंचेचाळीस-पन्नास माणसे होतो. सबंध रात्र त्या जंगलात काढावी लागली असती तरी फार हाल झाले असते असे नाही. रात्र मजेत गेली असती. अखेर अर्ध्या तासाने रस्ता शोधायला गेले होते ते परत आले. रस्ता त्यांना मिळाला होता. गाडी (रिकामी) चढाव चढून गेली आणि सर्वजण यथापूर्व स्थापनापन्न झालो. गाडी पलीकडच्या तीरावर निघून मोठ्या रस्त्याला लागली. राजपिपळा गावातील ठरलेल्या धर्मशाळेत पोचेपर्यंत रात्रीचे साडेदहा वाजले आणि जेवण तयार होऊन जेवणे उरकेपर्यंत पुरे बारा वाजले. तरी पण मोठे हाल झाले असे काही वाटले नाही. धर्मशाळेच्या ज्या सोप्यात आम्ही उतरलो आहोत त्याचे जोते छातीभर उंच आहे.

# मंगळवार दि. १० फेब्रुवारी

❊ ❊ ❊ ❊ ❊ ❊ ❊ ❊ ❊ ❊ ❊ ❊ ❊

श्री : सहावा दिवस कटपोर

राजपिंपळयाला काल निजायला रात्र झाल्यामुळे आज सकाळी उठायलाच उशीर झाला. पहिला चहा होईपर्यंत उजाडले. सभोवताली जुन्या सरदारी वाड्याचाच प्रकार होता. स्वच्छतागृहें घाणेरडी व अत्यंत अपुरी (एकच) होती. साडेसात वाजता नदीवर जाण्यासाठी गाडी निघाली. नदी आठ-दहा किलोमीटर दूर होती. गाडी अर्ध्या वाळवंटात जाऊन थांबली. इतर गाड्याही तिथपर्यंत येतच होत्या. नदीच्या पलीकडे चांदोद हे गुजराथेतील तीर्थक्षेत्राचे मोठे गाव दिसत होते. तर होडी प्रवाशांना इकडून तिकडे नेताना व आणताना दिसत होती. आम्हाला नदी उल्लंघायची नव्हती. त्यामुळे आमचा तिकडे जाऊन येण्याचा प्रश्नच नव्हता. धुण्यासाठी नदीत मोठासा धोंडा मिळाला नाही. नुसते स्नान उरकले आणि रंगीत दगड गोळा करू लागलो. अगदी मनापासून ! कारण याच्यापुढे कोणत्याच ठिकाणी ते मिळण्याचा संभव नसल्याचे समजले. सर्व मंडळी आरतीत रमली होती. मी व दुसरा एकादा एवढेच, 'दगडाचे संशोधन' (?) करीत होतो. ते सोडून आरतीकडे जावे लागले. देवासकरांनी मला आरतीकडे बोलाविले असल्याचा निरोप मिळाला. आरतीकर भक्तांच्या मांदियाळीचा लांबून एक फोटो खेचला आणि त्या मंडळींकडे चालू लागलो. मला बोलाविण्याचे कारण म्हणजे गेल्या चार दिवसांत सर्वांत वयस्कर मीच आहे असे कर्णोपकर्णी झाले होते. तेव्हा साहजिकच वयोवृद्ध म्हटला म्हणजे औपचारिकरित्या त्यालाच ज्ञानवृद्ध (?) तपोवृद्ध (?) अशीही बिरुदें जोडायची पद्धत आहे. तेव्हा माझे मत देवासकरांना एका बाबतीत विचारायचे होते. नर्मदा-जल भरलेल्या काचेच्या बाटलीच्या झांकणावर नर्मदामैयाला म्हणून बायकांनी हळद-कुंकू वाहिले होते. झांकणावरल्या त्या हळद-कुंकवाला, ओलेपणामुळे सुरकुत्या पडल्या होत्या व त्याचे एकूण दृश्य 'मुगुटधारी देवीच्या मुखवट्यासारखे' दिसते किंवा नाही याच्यावर माझे मत पाहिजे होते. मी तुरंत होकार दिला. जळी, स्थळी, काष्ठी, पाषाणी, पुरून शिवाय तो जगदात्मा दशांगुळे उरतो, तर मी नाही कशाला म्हणू ! यानंतर त्या

झाकणावरच्या सुरकुत्यांना पुन्हा एकदा हळद-कुंकू वाहिले गेले. मानला तर देव नाहीतर तो दगडच. शेवटी देव, ईश्वर ही मनाने मानण्याची गोष्ट आहे. आरतीकर भक्तांच्या मनाची झालेली एवढी तयारी मोडून काढणे माझ्याही जिवावर आले.

आता आमची गाडी वाळवंटी जमलेला मेळा घेऊन मुक्कामाकडे निघाली; परंतु वाटेत अनेक देवस्थाने होती. ती दर्शने आमच्यासाठी खोळंबली होती. वाटेत एक आश्रम दिसला. मोकळी ढाकळी जागा होती. स्वच्छता व टापटीप बऱ्यापैकी दिसली. पौराणिक कथा रंगीत चित्ररूपात भिंतींवरून व मूर्तीसह देखाव्याच्या स्वरूपात दिसत होत्या त्या पाहाव्याशा वाटत होत्या. तिथेच आम्ही तीन चार जणं रेंगाळलो. त्यामुळे रस्त्यापलीकडील एखाददुसरे दर्शन आमचे चुकलेही असेल. एका देवळाच्या आवारात एक अष्टवक्रा माड दिसला. त्याचा एक फोटो खेचला. तो अष्टवक्रा कसा झाला, त्याला इतक्या ठिकाणी अजगराच्या विळख्यासारखा पीळ कसा पडला हे कुतूहल काही शमले नाही.

साधारण नऊच्यानंतर मुक्कामावर परतलो. न्याहारी आटोपूनच आजसुद्धा निघावयास पाहिजे होते. राजपिपळा जितक्या लौकर सोडू तितके बरे असे वाटत होते. मुक्कामाची धर्मशाळा अत्यंत अस्वच्छ, स्वच्छतागृह भंगलेले व घाणेरडे त्यामुळे असे वाटत होते. आपण उतरलो त्या मुक्कामाच्या ठिकाणावरून सबंध गावाबद्दल चांगले-वाईट मत बनते. एकच वस्ती आम्ही तिथे केली. पण राजपिपळा गावाविषयी काही आमचे मत चांगले असे झाले नाही. बस सुटली तेव्हा ‘सुटलो एकदाचे’ असे वाटले. जाण्यापूर्वी त्याच आवारात असलेल्या एका मंदिरात जाताना गेलो. मंदिर स्वच्छ व नीटनेटके होते; परंतु आमचे मत बदलण्यास ते पुरेसे नव्हते.

दुपारचे भोजन कालच्याच ठिकाणी झाले. झंकार निवेलीला! पुन्हा कालचेच सर्व प्रवेश झाले. तेच नाटक तेच प्रवेश! शंकराच्या देवळातील गप्पांसह पार पडले. गाडी पुन्हा सुरू झाल्यावर थोड्या वेळाने रस्ता बदलला. आडरस्त्याला लागलो. रस्ता इतका अरुंद होता की दुतर्फा असलेल्या आणि माजलेल्या झुडपांना गाडी दोन्ही बाजूने स्पर्श करीत जात होती. कटपूरच्या आधी तासभर दिवस असतांना गाडी दर्शनार्थ म्हणून समुद्राच्या बाजूला वाळवंटातच असलेल्या एका देवस्थानाकडे वळली. देऊळ लहानसरच; पण परिसर खूप मोकळा होता. फारसे पाहाण्यासारखे देवळात काही विशेष नव्हते. म्हणून आमचे पाहून लवकर झाले. परतत असताना साने मावशींचा घोळका भेटला. साने मावशींनी मला विचारले—

'कुणाचं देऊळ आहे ?'

'माझे.' मी उत्तर दिले.

'म्हणजे काय ?'—साने मावशी.

'देवाचे नाव आहे विमलेश्वर आणि माझ्या बायकोचे नाव आहे विमला !—मी खुलासा केला.

'वा वा ! हे छान आहे आपलं,'—साने मावशी.

साने मावशींनी मग हा 'पाचकळपणा' मागून येणाऱ्या महिला मंडळींनाही ऐकविला.

'अहो माझंपण नाव विमला आहे.' एका बाईंची माझ्या पाचकळपणावर प्रतिक्रिया झाली.

'असू द्या, असू द्या ! इकडे दोन विमलेश्वर आहेत. देवळात जाऊन बघा. एक उजव्या हाताला अन दुसरा डाव्या हाताला.'—मी. आणि इथे खरोखरच दोन गर्भगृहे होती. दोन्ही जमिनीखाली होती, हे दुसरे वैशिष्ट्य. दोन विमला आणि दोन विमलेश्वर !

मंदिराच्या आवारापलीकडे बघतोय तो समुद्र ! समुद्र म्हणजे ऐन दर्या नव्हे. खाडीचे नस्त. त्यामुळे खाडी रुंद झालेली आहे. सूर्य पाण्यावर टेकायला थोडा अवकाश आहे. खाडी पलीकडेही भूभाग मोकळाच ! खाजणाचा ! निसर्ग दृश्य खूप मोठे होते. फार सुंदर नसले तरी मावळत्या सूर्याने त्याला प्रेक्षणीय बनविले होते. पाण्यावर चकाकणाऱ्या किरण शलाका, खाली असलेले खाजण व घाणेरडी दलदल या एरवी कुरूप दिसणाऱ्या गोष्टींची कुरूपता झाकीत होत्या. या ठिकाणाचे नाव विमलेश्वर-संगम. नर्मदा व सागर यांच्या मीलनाचे स्थान. (नस्त म्हणजे खाडीचे मुख) आता उद्या आम्हाला याच्या आसपासच कुठेतरी समुद्र ओलांडायचाय.

कटपोरची धर्मशाळा फारच संकुचित होती. सामान भिंतीच्या कडेला ठेवून चहा पिण्यासाठी बैठकीवर बसलो. सभोवती नजर फिरविल्यावर विचार आला की, सध्या बसलो आहोत तोपर्यंत ठीक आहे. इतक्यात भाऊ पुरोहित म्हणतात :—

'जोगळेकर ! इथं बुफे व्यवस्था केली पाहिजे जेवणाची.'

'जेवणाची कराल हो बुफे, पण रात्री झोपण्याचीसुद्धा बुफेच करायची तयारी ठेवली पाहिजे.'—मी.

तशी आम्ही सर्वच माणसे पोक्त व वृद्धच होतो, परंतु तरी काय झाले !

'काहीतरी व्यवस्था बघू हो आपण' देवासकरांनी आश्वासन दिले. देवासकरांचे आश्वासन म्हणजे काही मंत्र्याचे आश्वासन नव्हे. त्यांनी काहीतरी योजूनच हे म्हटले असले पाहिजे. आतां जेवण मुळापासूनच तयार व्हायचे होते. म्हणजे तास दीड तास तरी हवा. तेव्हा तोपर्यंतचा वेळ कसा घालवायचा? त्यासाठी बायकांनी गाणी म्हणायला सुरुवात केली. ही 'कवनं' होती. एकेक कवन वीतभर हातभर नव्हे तर चांगले दांडभर लांब. वीस वीस-पंचवीस कडव्यांचे. लग्नांतली, डोहाळे जेवणाची, व्याह्यांची, विहीणीची वगैरे. काही नागरी तर काही ग्रामीण! ग्रामीण 'विहीणीतला' ठसका ऐकला आणि प्रथम 'काय कटकट आहे' असे वाटणारी गाणी 'वन्समोऽर' देण्यासारखी हवी हवीशी वाटू लागली. सानेमावशी, मग उषाबाई काळे, दिवाणबाई, इनामदारीणबाई, एकेकजणी आपला नंबर लावू लागल्या. आपणहून नव्हे! दुसऱ्या शेजारणीकडून आग्रह वसूल केल्यावरच! कवनांचा साठा अमाप होता. त्यांच्या पाठांतराबद्दलसुद्धा मार्क द्यायला पाहिजे होते. तासाभराने जेवणाची वर्दी आली. म्हणजे उठून कुठे जायचे नव्हते. तिथेच जागा करून पाने घ्यायची होती. जागा दुसरी कुठली नव्हतीच त्या कुग्रामात. पाने घेतली गेली. ताटे वाढून झाली. पण 'कवनं' आता बेफाम सुटली होती. आवरता आवरेनात. शेवटी जेवणं झाल्यावर हाच कार्यक्रम ह्याच ठिकाणी होईल असे पुन्हा पुन्हा जाहीर करण्यात आले तेव्हा कवने आटोक्यात आली आणि 'वदनी कवळ' सुरू झाले.

जेवणानंतर 'ती' समस्या पुन्हा उपटली. मग आम्ही काही सड्या मंडळींनी आमच्यापुरता प्रश्न सोडवला. समोरच एक 'गोडाउन' होते. त्यांत विटा आणि रेती होती. रेती सारखी पसरून त्यावर आम्ही आपले 'होल्डऑल' पसरले. हॉलमधल्या माणसांना आता जागेची थोडी सूट झाली. उद्या मचव्यातून आठ दहा तास प्रवास करायचा होता. मचवा सात वाजता तरी सुटायलाच पाहिजे होता आणि आमच्या मुक्कामावरून मचव्याजवळ पोचायला तास-दीड तास तरी आधी निघायला पाहिजे होते. इथे स्वच्छतागृह, स्नानगृह, अमके 'गृह' आणि तमकी 'रूम' सर्व 'बहिर्दिशेलाच' होते. म्हणजे पहाटे चारला तरी उठायलाच पाहिजे होते.

# बुधवार दि. ११ फेब्रुवारी

* * * * * * * * * * * *

श्री : सातवा दिवस नारेश्वर, "शांतिवन"

कटपोरला काल निजतानाच आजचा प्रवास कसा काय पार पडेल ही विवंचना प्रत्येकाला होती. साडेतीन वाजता (पहाटे) सर्व यात्री बरोबर उठलो. चार वाजता फक्त चहा घेऊन प्रत्येकाने आपला बाड-बिस्तरा बांधला. जरूर तेव्हढेच सामान खाकोटीच्या पिशवीत बरोबर घेतले. कमीत कमी आणि मळखाऊ कपडे अंगावर ठेवले. बाकीचे सामान मोटरीवर चढले. मोटरबस खाडीच्या पुलावरून पलीकडच्या तीरावर थोड्या वेळातच पोचणार होती, हातपिशव्या खाकोटीस मारून पावणेसहाला धर्मशाळा सोडली आणि कटपोरच्या मच्छीमारांच्या वस्तीत आलो. व्यवस्थापकांनी मचवेवाल्याला बोलावून आणले आणि काळोखातून समुद्रात उभ्या असलेल्या मचव्याकडे प्रवास सुरू झाला. शुक्ल पक्षातील द्वादशी होती. पहाटेस चांदणे नव्हते. हातात विजेरी असलेली माणसे आपल्या सहकाऱ्यांस वाट दाखवीत होती आणि स्वतः मात्र धडपडत होती. गावाजवळची खलाटी संपली. खाडी शेजारची दलदल सुरू झाली आणि त्याच्याही पुढे बरबटी जमीन आली. अद्याप दिशा फाकल्या नव्हत्या. उषेचा प्रहरच सुरू होता. पुढे समुद्रकाठी मचवा कुठे आहे तो अंदाजानेच दिसत होता. अनेक साठीच्या पुढील किंवा पोक्त महिलांना कुणीतरी नीट हात देऊन त्या बरबटांतून न्यावयास पाहिजे होते. आठ पत्न्यांचे पतीराज त्यांच्या बरोबर होतेच. तेव्हा त्यांची सोय होती. मात्र त्यातील गम्मत म्हणजे एका भक्कम महिलेने आपल्या पतीला धरून चालविले होते. एकेकट्या वृद्धांना कर्मचाऱ्यांनी धरून चालविले होते. आम्ही सड्या पुरुषांपैकी चौघांनी एकेक वृद्धेचा चार्ज घेतला. पन्नास-साठ फूट अंतर चालण्यास पंधरा मिनिटे लागली. काही वृद्धा म्हणू लागल्या की पंधरा मिनिटे इथं निश्चलपणे उभे राहिले तर खाली खाली, जात जात, सबंध बुडून जाऊं! वीतभर पाय बरबटांत बुडत होता व उचलून दुसरीकडे टाकायला जावे तर पहिला सरकत होता. याच्यात कोळी नृत्याच्या कितीतरी 'पोझेस' येऊन जात होत्या. हसण्याची सोय नव्हती. पडायला होत होते. अनेकांना खाली हात टेकावे लागलेच होते.

नुसते 'हात टेकले' म्हणून भागत नव्हते. प्रत्यक्ष प्रयोगच करावा लागत होता. मचव्याला हात लागल्यावरच आपण ज्या माणसाला धरून आणले त्याची हालत काय आहे ती पाहायला फुरसत मिळत होती. कसे तरी ढकलत ढकलत सर्वजण मचव्यात त्या अवस्थेत बसलो. मचव्यात चढायच्या आधी आम्ही समुद्राच्या त्या पाऊलभर पाण्यात हातपाय कसेबसे धुतले. आता दिसायला लागले होते. परंतु सूर्योदय झाला नव्हता. तोच नांगर उचलला गेला. शीड सोडले. दमाण खेचले आणि किंचितसा वारा, मतलय असल्यामुळे सूर्योदयाला मचवा चारदांड समुद्रात पुढे गेला सुद्धा! नाखवा म्हणाला, 'इतपत वारा असला तरी आपण बारावर एक वाजता पलीकडे पोहोचू.' तासभर किनाऱ्याकिनाऱ्याने मचवा चालला आणि मग समुद्रातील एका बेटाकडे जाण्यासाठी सुकाणू वळले. सर्व प्रवासी स्थिर झाले. आडव्या फळीवर आम्ही पाचजण बसलो होतो. पुढल्या आडव्या फळीवर तसेच तिघे चौघे बसले होते. बाकीचे सर्व खाली मचव्याच्या उतरत्या अंगावर बसले होते. हातपिशवीतील खाण्याचे तहान लाडू, भूक लाडू बाहेर निघाले. आसपासच्या सहप्रवाशांना उपलब्धतेनुसार त्यांचा प्रवास सुरू झाला. या बाबतीत वृद्ध स्त्रियांचे दूरदर्शित्व फार मोलाचे ठरले! एवढ्यात व्यवस्थापकांनी बरोबर आणलेल्या न्याहारीच्या बशा भरून द्यायला सुरवात केली. बटाटेपोहे होते. पाण्याचा मोठा कॅनही भरून आणलेला होता. तोही अर्ध्याच्यावर संपला. जवळ जवळ साडेनऊ वाजले होते आणि मचवा त्या बेटाला लागला. बहुतेक सर्वजण खाली उतरून 'कार्यक्रम उरकून' आले. अनेक वपुश्रीमान स्त्रियांना कर्मचाऱ्यांनी चक्क 'गणपती बाप्पा मोरया' करून मचव्यात दाखल केले. दोन पुरुषांचीही तीच गत झाली. मचवा जमिनीपासून छातीइतक्या उंचीवर होता. या मंडळींनी व आम्ही सर्व बघ्यांनी हा प्रकार खेळाडूपणाने स्वीकारला. न बोलतां! न हांसता!

पुन्हा मचव्याचे शीड सोडले नि दमाण खेचले गेले; पण आता वारा साफ पडलेला होता. मुंगीच्या पावलांनी मचवा चुळूक फुळूक करीत चालू होता. आतां मचवा पलीकडल्या तीराला लागण्याचा अंदाज दोन ते चारच्या दरम्यान असा सांगण्यात आला. आता 'दिल बहलाने के लिये' काहीतरी करणे प्राप्त झाले. पुढच्या फळीवरील अनंतशास्त्री देवासकरांनी मला काहीतरी सुरू करण्याची सूचना केली. मला काहीतरी (म्हणणे) येतेय, अशी त्यांची कल्पना झालेली होती. मी पुरुषसूक्त सुरू केले. आरोह अवरोहांच्या ठसक्यांसह. मी एक ऋचा म्हणायची.

अनंतशास्त्री देवासकरांनी पुढची म्हणायची. पुरुषसूक्त झाले. श्रीसूक्त झाले. अर्धातास गेला आणि या म्हणण्यांतील कौतुक ओसरल्याचे आम्हास दिसल्यावर आम्हीच तो प्रकार बंद केला. कालचा जेवणानंतरचा आश्वासित कार्यक्रम काही झाला नव्हता. तो सुरू करण्याविषयी सुचविले. पण आज सिनेमा नाटकांतील गाण्याचा मूड होता. ती गाणी सुरू झाली. खरे म्हणजे गाण्याचे अंग असलेले या चाळीस माणसांत फारसे कुणी नव्हते. परंतु काही बायकांचा आवाज गोड होता. ती गोडी काही वेळ पुरली. सोमणांनी दत्तसांप्रदायी भजने म्हटली. इनामदारांनी 'धून' लावली. भेंड्या झाल्या. मग मी काही सरदारजींच्या विनोदी चुटक्यांना सुरुवात केली. यांत साथीदार फक्त एकच मिळाला. आता बारावर एक वाजला होता. पलीकडल्या किनाऱ्यावरचे डोंगर प्रथम अस्पष्ट दिसू लागले. आता 'आम्ही त्या ह्याच्या यात्रेला गेलो होतो तेव्हा काय झालं!' ते सुरू झालं. दीड वाजला आणि प्रत्यक्ष वाळूचा किनारा आणि त्याच्या पाठीमागल्या झाडीत देवळांचे कळस आणि एक मशीदपण दिसू लागली.

किनाऱ्याला प्रत्यक्ष पाय लागले तेव्हा अडीच वाजले होते. निघालो तेव्ह आम्ही अंकलेश्वरच्या आसपास होतो आणि आता भडोचच्या आसमंतात उतरलो होतो. दरवर्षी ह्या यात्रा कंपनीची उतरलो, त्या किनाऱ्याला लागूनचा असलेल्या हरिधाम ह्या वस्तीतच जेवणासाठी जागा घेतलेली असे. ह्या वर्षी काहीतरी बिनसले होते आणि तिथून सात आठ मैल दूर असलेल्या मीठीतलई या ठिकाणी शिवानंद आश्रमात जागा घेतलेली होती, तिथे पोचलो. पोहोचल्या-बरोबर आश्रमाकडून चहा-कॉफी आली. आमची कर्मचारी मंडळी जेवण बनवायला लागली. आम्ही अनेकांनी विहिरीचे पाणी काढून आंघोळीच्या ऐवजी 'वॉश' घेतला. सभोवताली उजाड माळ होता. जवळच्या वस्तीतून याच विहिरीवर पाणी भरून घेण्यासाठी रांग लागली होती. पाणी मचूळच होते. पण तेही जवळपास फारसे मिळत नसावे असे त्या पुरंध्रींच्या रांगांवरून वाटले. आश्रमाच्या स्वामींनी थोडी आश्रमाची माहिती दिली. त्यानंतर तासाभरात जेवणे झाली आणि पुढील अर्ध्या पाऊण तासात आवराआवर होऊन आम्ही साडेतीन वाजता गाडीत पुन्हा बसलो.

दुपारच्या चहासाठी, कोसांबा या गावी एका आश्रमातच जायचे होते. 'अवधूत आश्रम' त्याचे नाव. नारेश्वरच्या रंगावधूत स्वामींचेच एक शिष्य श्री. दिगंबर गोपाळ कुळकर्णी यांचा हा आश्रम. इथे चहा व खाणे झाले. त्यांची

भजने ऐकली. आमच्या पैकी नानासाहेबांनीही तिथे हजेरी लावली. या शिष्य-वरांचे (कुळकर्णी) घारे गोरे व्यक्तिमत्व प्रभावी होते.

भडोच गाव बाजूला सोडून गाडी रात्र पडल्यानंतर नारेश्वरी पोचली. गावातील विद्युत् गेलेली होती. महाराष्ट्रातच नव्हे तर इतर प्रांतांतही असे होते, हे पाहून 'बरे' वाटले! उत्तरेकडे तर आणखी वाईट परिस्थिती आहे असा आमच्या आपापसांतील बोलण्यावरून निष्कर्ष निघाला तेव्हा तर आणखी 'बरे' वाटले. खरं म्हणजे अशा कोत्या, संकुचित मनोवृत्तीचे प्रदर्शन करू नये; परंतु आपल्या रोजनिशीतसुद्धा आपले आपल्याशीच खोटे कशाला बोला! व्यवस्थापकांनी चाव्या मिळवून एकेका गटाला एकेका खोलीत दाखल केले. मी आमच्या खोलीत प्रथम मेणबत्ती लावली. जागा साफसूफ करून सामान लावले. बाकीच्या खोल्यांतून काळोख! आणि आमचे सामान सुद्धा लावून झाले! हे पाहाताच मंडळी व्यवस्थापकांवर पक्षपाताचा आरोप करू लागली. त्यांना वाटले व्यवस्थापकांनी आम्हाला तेव्हढी मेणबत्ती दिली; परंतु मेणबत्ती माझ्या हात-पिशवीतच होती तीच मी लावली होती. आता व्यवस्थापकांनी इतरांनाही मेणबत्त्या दिल्या. जेवण तयार होऊन पंगत बसायची होती. म्हणजे उशीर होता. म्हणून आम्ही बाहेर अंगणात आलो. चांदणे होते. पण झाडीही भरपूर होती. तेव्हा दूरवर जाता येण्यासारखे नव्हते. केवळ गप्पांचा अड्डाच सुरू करता येण्यासारखा होता. तास-दीडतासाने बीज आली. जेवणही तयार झाले होते. चांदणे झक्क होते. जेवणानंतर बाहेर गेलो नाही.

आज प्रवाशांची खरी परीक्षा होती. या खडतर प्रवासाची कल्पना सर्वांना होती. परंतु कल्पना आणि वस्तुस्थिती यांतले महदंतर सर्वांनाच जाणवले बहुसंख्य प्रवासी श्रद्धायुक्त मनाने आले होते. त्यांची, काय होईल त्याला सामोरे जायची तयारी होती. परंतु तेव्हढी श्रद्धा नसलेल्या आमच्यासारख्या अर्धवटांना कष्ट जाणवले. ईश्वरकृपेने आम्हाला ते झेपले तरी! परंतु तीनचार वृद्धांची अवस्था फारच दयनीय झाली होती. त्या दुर्बल होत्या.

# गुरुवार दि. १२ फेब्रुवारी

❊ ❊ ❊ ❊ ❊ ❊ ❊ ❊ ❊ ❊ ❊ ❊

श्री : आठवा दिवस वडोदरा

नारेश्वरला आज भल्या पहाटे निराळ्याच कारणाने जाग आली, आमचे प्रेम पुरोहित (गुजराथी) हे घाबरे-घुबरे होऊन एकदमच ओरड करू लागले. आम्ही उठलो त्याच्या आधीपासूनच त्यांना त्रास होत होता. श्वासोच्छ्वासाचा. 'मला आत्ताच्या आत्ता ॲम्बुलन्स करून बडोद्याच्या हॉस्पिटलात पोचवा." हा पुण्याचा गुजराथी असल्याकारणाने मराठी बरे बोलतो. "आत्ताच्या आत्ता! नाहीतऽर मी चाललो 'वर'." अगदी चिमणरावाची अवस्था! एकीकडे आम्हाला हसू येत होते. पण हसता येत नव्हते.

"जोगळेकर, तुम्ही वडील, एवढी माझी वेवस्ता करा. नाईतर चाललो, वऽर". वरती बोट दाखवून हेच वारंवार म्हणायचा. आधी औषधाच्या गोळ्या घेत असे तेव्हा म्हणत असे मला ब्रॉंकॉइटीसचा त्रास होतो म्हणून औषध "घेवा लागते." परंतु आता त्याची अवस्था 'वर' जाण्याइतकी गंभीर अशी काही वाटेना. या खोलीत आम्ही सहा जण होतो. प्रत्येकाने त्याच्या पाठीवर हात फिरवून त्याला धीर दिला व तुम्हाला वाटतंय इतके गंभीर दुखणे नाही, म्हणून सांगून पाहिले. व्यवस्थापकांना आधीच कळविले होते. म्हणून त्यांनी डॉक्टर घेऊनच खोलीत प्रवेश केला. डॉक्टरांनी प्रेमाभाईंना तपासले. काही औषध दिले. मग जरा प्रेमाभाई स्वस्थ झाले.

पलीकडल्या खोल्यांतील मंडळी 'चला स्नानाला' म्हणाली तेव्हा आम्हाला वेळेचे भान आले. घाईघाईने उरकून आम्हीही पंधरावीस मिनिटांनी नदीवर निघालो. इथे नर्मदेचे पात्र चांगले रुंद आहे. नदीला घाट नाही. खूप पुढे गेले तरी पाण्यातून पाय सुटत नाही. त्यामुळे ते खोल नसावेसे वाटले. कपडे धुवायलाही जागा नाही. कसे बसे आघाळून पिळून आणले. घाटाशिवाय नदी सुखावह वाटत नाही. स्नानाला अगर धुण्यालाही!

आता आम्ही तिघे, भाऊ पुरोहित, स्वामी (अभ्यंकर) व मी, हिंडायला निघालो. शांतीवन या नावाला साजेसाच आश्रम आहे. मध्यम प्रकारच्या बागेइतका

मोठा परिसर आहे. येथील मठाधिपती ब्रह्मीभूत रंगावधूत स्वामी. पूर्वाश्रमींचे पांडुरंग वि. वळामे. रत्नागिरी जिल्ह्यातील देवरुख जवळच्या शिपोशीचे. उत्तरेत गंगाकाठी हिमालयात यांची वस्ती असताना गुजराथी चाहात्यांनी त्यांना इथे आणून हा आश्रम वसवून दिला. दत्तसांप्रदायी संत होते रंगावधूत स्वामी. आश्रमात मूळ दत्तमंदिराशिवाय शिव-गणपती यांचीही देवळे आहेत. ध्यान-मंदिर पण आहे. कोसंब्याचे अवधूत स्वामी आज येथे पुन्हा भेटले. आलेल्या प्रत्येक पाहुण्यास आश्रमातर्फे प्रसादाचे भोजन मिळते. कसला तरी उपास असलेल्यांशिवाय आम्ही बाकी सर्वच प्रसादाला गेलो होतो. दत्तसांप्रदायाच्या सर्व सणावरी इथे यात्रेसारखी गर्दी असते. त्यात मुंबईचे गुजराथी चाहते-भक्त जास्ती असतात. अध्ययन–मनन–चिंतन करणाऱ्या कोणालाही चार दिवस इथे रहावेसे वाटेल असे हे स्थान आहे. निवांत आणि निरामय !

दुपारी भोजनोत्तर वडोदऱ्यासाठी प्रस्थान ठेवले आणि वडोदऱ्याला आता या मंगल कार्यालयात मुक्कामाला आहोत. ही कार्यालयाची जागा बरी सोइस्कर आणि स्वच्छ आहे. संध्याकाळी आल्यावर सर्व मंडळी कुठेतरी दर्शनाला गेली आहेत. मी लिहीत बसलो आहे. पत्रे व ही रोजनिशी. रात्रौ मंडळी परत आली म्हणजे आरती, स्तोत्र वगैरे होऊन जेवणे होतील. मी आज रात्री जेवणार नाही. आठवड्यात एखादे-तरी जेवण टाळायला हवे. आरती (नर्मदेच्या आरतीसह) आणि नर्मदा स्तोत्र वगैरे रोज जेवणाच्या आधी वेळ असेल त्याप्रमाणे सावकाशीने अगर गर्दीने, पण नियमित होत असते. प्रथम प्रथम मी नावापुरता (किंवा प्रसादापुरता म्हणा) भाग घेत असे. रोज ऐकून ऐकून नर्मदेची आरती व स्तोत्र (शंकराचार्य विरचित) माझे आता पाठ झाले आहे. भक्तीभावापेक्षा एखादी गोष्ट सामुहिक रीतीने करणे यात सुद्धा गम्मत आहे. म्हणून हल्ली मी या सर्व गोष्टींत अथपासून इतिपर्यंत एखाद्या भक्तासारखा भाग घेऊ लागलो आहे.

नारेश्वर येथील आश्रमाचे एक पदाधिकारी, खादीधारी आहेत. ते थेट माझ्या-सारखे (किंवा मी त्यांच्यासारखा) दिसतात असे त्यांच्या मुंबईच्या एका स्नेह्यांचे म्हणणे आहे (सिक्कानगरमध्ये राहाणारे श्री. चंद्रकांत शाहा). त्यांची माझी भेट मुंबईस पूर्वी झालेली आहे. नारेश्वर आश्रमात त्यांची चौकशी केली. परंतु भेट झाली नाही. अखेर गाडी निघतांना, गाडीत बसल्यावर, केवळ हात हलवण्यापुरते आम्ही एकमेकांना बघितले.

## शुक्रवार दि. १३ फेब्रुवारी माघी पौर्णिमा

※ ※ ※ ※ ※ ※ ※ ※ ※ ※ ※ ※

श्री : नववा दिवस गरुडेश्वर (धर्मशाळा)

बडोद्याच्या मंगल कार्यालयात नेहमीप्रमाणे सर्व आटोपून साडेसात वाजता आम्ही तिघे स्वामी, पुरोहित आणि मी, असे फिरायला म्हणून सहज बाहेर पडलो. सूर सागराला एक प्रदक्षिणा घालून जाता जाता सहज घडले म्हणून एक देव-दर्शन केले. आमचे प्रत्येकाच्या ओळखीचे इथे कुणी ना कुणीतरी होते. परंतु या सहलीतला कार्यक्रम चुकवून जाण्याइतक्या जवळचे अगर कामाचे कुणीच नव्हते. म्हणून तासाभरातच परत आलो. न्याहारी-चहा उरकला आणि नऊ वाजत सर्वांच्या बरोबर गाडीतून नियोजित कार्यक्रमासाठी बाहेर पडलो.

प्रथम लष्करी बागेत लष्करातर्फे एक शंकराचे-नटेश्वराचे-मंदिर बांधले आहे तिथे गेलो. ध्यान मंदिरही आहे. एकूण सर्व बांधकामाच्या निराळेपणामुळे लक्षात राहाण्यासारखे आहे. तिथून पशुपक्षी संग्रहालय व म्यूझियम पाहाण्यास गेलो. मुंबई व इतर शहरांतील पशुसंग्रहालयापेक्षा हे पुष्कळच अद्यावत आणि चांगल्या स्थितीत आहे. धडधाकट प्रकृतीचे प्राणी पाहून बरे वाटले. पक्षी संग्रहालय तर इतके समृद्ध आहे की अनेक पक्षीनिरीक्षक हे पाहाण्यासाठी लांबून इथे येतात. म्यूझियम पाहायला जाईपर्यंत अडीच तीन तास झाले होते. अनेकजण म्यूझियम पाहायला जाण्यापेक्षा उपहारगृहात जाऊन बसले. एक दीड वाजता मुक्कामावर परतलो. जेवणे उरकली आणि सर्व आडवे झाले. इतक्यात प्रेम-पुरोहित जे बडोद्याला आल्याबरोबर आपल्या नातेवाईकांकडे (काल रोजी) गेले होते ते त्या नातेवाईकां-बरोबर या आमच्या मुक्कामावर परत आले होते आणि ते त्यांचे नातेवाईकही म्हणत होते की डॉक्टरांनी त्यांना यात्रासहलीबरोबर पुढे जाण्यास परवानगी दिली होती. 'तुम्ही इथून पुण्यास परत आपल्या घरी जावे', असे आमचे सर्वांचेच म्हणणे होते. त्यांनी ऐकले नाही. कालच सकाळी जो मनुष्य 'वर' जायला निघाला होता तो आमच्याबरोबर येऊन सहल पुरी करणार म्हणत होता.

आज गरुडेश्वरला संध्याकाळपर्यंत पोहोचायचे होते. म्हणून चहाच्या आधी निघालो आणि पाच वाजता चहा प्यायला गरुडेश्वरला पोहोचलोसुद्धा. जेमतेम

दोन तासांचा रस्ता होता. गरुडेश्वरला, निदान घाटाच्या बाजूला, नागरी जीवनाचा स्पर्शसुद्धा (विजेशिवाय) नाही. धर्मशाळा, घाट सर्व काही जुन्या जमान्यांतील आहे. एका दृष्टीने हे बरे वाटले. चहा उरकल्यावर आम्ही अनेकजण घाटावर जाऊन राहिलेले सर्व कपडे धुतले. घाट उत्तम आहे. अजून उन्हे होती. कॅमेऱ्या-वाल्यांनी मनमुराद फोटोग्राफी केली. येतांना ओल्या कपड्यांचे गाठोडे घेऊन दर्शने उरकीत आम्ही मुक्कामाच्या धर्मशाळेत येत होतो. दत्तमंदिरात दर्शन घेतले. ब्रह्मीभूत वासुदेवानंदसरस्वती म्हणजे टेंबेस्वामी यांच्या समाधीत जाऊन आलो आणि मुक्कामाच्या धर्मशाळेत येऊन दोरीवर कपडे वाळत टाकले आणि पुन्हा बाहेर पडलो. गरुडेश्वरी जायचे राहिले होते. ते देऊळ एका बाजूला उंचावर होते. गरुडेश्वराचे दर्शन घेईपर्यंत रात्र झाली. परंतु जेवण उशीरा आहे ते माहीत होते. म्हणून बाहेर येऊन चांदण्यात पायऱ्यांवर बसलो होतो. देवळाच्या गुरवाकडील तरुण मुलगेही आमच्या गप्पांत सामील झाले. नारेश्वर आणि गरुडेश्वर येथील दोन्ही स्वामी महाराष्ट्रीय. शिवाय गुजराथी जनतेवर प्रभाव असलेले, डोंगरे महाराज, गोडसेशास्त्री आणि पांडुरंगशास्त्री आठवले ही नावेपण आठवली. संतांना प्रादेशिकता नसते. पण आम्हा पामरांच्या ती मनात येते. ती येत नाही असे म्हणणारे एक संत तरी असले पाहिजेत किंवा ढोंगी तरी. प्रांतीयता, जातीयता मनात येऊनही शहाणी माणसे ती दाखवीत नाहीत अगर आचरणातही आणीत नाहीत, हा भाग निराळा. समाजहिताकडे लक्ष ठेवून तसे करायला हवे. पण मनातही येत नाही हे म्हणणे निराळे.

माझ्या मनात हे जरूर येते. कारण महाराष्ट्राची संतपरंपरा खरोखरच इतकी थोर आहे की इतर प्रांतांनी महाराष्ट्राचा हेवा करावा. गुणवत्तेनेही महान आणि संख्येनेही मोठी. ज्ञानेश्वरीवर कुणा कुसुमाग्रांनी इंग्रजीत 'ज्ञानांजली' लिहिली असती तर त्या कवीलाही नोबल पारितोषिक मिळाले असते. पण महाराष्ट्राचे इंग्रजी 'कच्चे' आहे. म्हणूनच ज्ञानेश्वरी, तुकारामाची गाथा, रामदासांचा दासबोध वगैरे अध्यात्म ग्रंथ महाराष्ट्रातच राहिले. महाराष्ट्राच्या इतिहासाबद्दलही हीच परिस्थिती आहे. एखादा जदुनाथ सरकार भेटला तर थोडाबहुत खरा इतिहास महाराष्ट्रा-बाहेरील प्रांतांना समजतो. असे अनेक जदुनाथ सरकार भेटणार नाहीत हे उघड आहे. महाराष्ट्रीयांनीच कंबर कसायला हवी. नाहीतर जवाहरलाल नेहरूं सारख्या-चेही गैरसमज राहातातच. जवाहरलाल नेहरूंनाही एकदा न. चिं. केळकर भेटले होते. पण अशा क्वचित भेटीस एखाद दुसरा गैरसमज त्या एखाद दुसऱ्या

माणसाचा दूर होतो. इतरांचे काय ? याला मूळ कारण ग्रँड डफ हा खोटा इतिहास लिहिणारा, साहेब आहे. नाहीतर महाराष्ट्राची संतपरंपरा व महाराष्ट्राने पावणेदोनशे वर्षे उपभोगिलेले स्वराज्य या गोष्टी प्रत्येक महाराष्ट्रीयाने अभिमान बाळगण्यासारख्याच आहेत. या अभिमानाबरोबर सद्यस्थितीबद्दल खंतही वाटली पाहिजे व परिवर्तनासाठी अभिमान बाळगणारांनीच, खंत वाटणाऱ्यांनीच, प्रयत्नशील राहायला हवे. काही विधायक कार्य व्हायला हवे.

अध्ययन, मनन, चिंतन अगर लेखन-वाचन (अभ्यास-स्वाध्याय) यासाठी ही जागा नमुनेदार आहे. सोयी नारेश्वर इतक्या अद्यावत नाहीत. पण त्याही इथे दुय्यमच वाटाव्यात असा निवांतपणा आणि चांगल्या घाटासह नदीचे-वाहात्या रेवा मैय्याचे-सान्निध्य, ह्या गोष्टी अधिक आकर्षक वाटतात. आज माघी पौर्णिमा. टिपूर चांदणे प्रसन्नता आणील यांत नवल काहीच नाही. परंतु ही हिवाळ्यातील पौर्णिमा ! दृष्यक्षमता या दिवसात सर्वांत जास्त ! त्यामुळे या शेजारच्या नदीतील पाण्यातल्या चंद्रदेवाच्या पलीकडे दिसणारे हे भव्य 'लॅंडस्केप', त्यावर पसरलेल्या रुपेरी पारदर्शक आवरणाखालचे, देहभान विसरायला लावत आहे. शेजारी—भाऊ पुरोहितांनी कोपरखळी मारल्यावर चंदेरी दुनियेतून मी पुन्हा गरुडेश्वर मंदिराच्या पायरीवर आलो. जेवण अद्याप व्हायचे होते. स्वप्नापेक्षा जेवण महत्त्वाचे ! म्हणून सर्वांबरोबर उठलो.

जेवण उरकल्यावर दुर्बीण घेऊन मी एकटाच अंगणाच्या कडेच्या कट्टयावर येऊन बसलो. आकाशस्थ ज्योतींची फारशी माहिती मला नाही; परंतु ज्या थोड्या आकाशस्थ मंडळींशी ओळख आहे त्यांना असे निरभ्र आकाश असल्यास भेटावेसे वाटते. खरे म्हणजे त्यासाठी पौर्णिमेपेक्षा अमावास्या अधिक सोईची. परंतु या प्रसन्न वातावरणामुळे बाहेर येऊन बसलोय. इतक्या लख्ख प्रकाशात अवकाशस्थ मंडळी शोधावी लागतात. तरीही दुर्बिणितून का होईना सहज ओळख पटेल असे पाहुणे त्या दरबारात पुष्कळ होते. सप्तर्षि व त्यांच्या वरून माग काढीत गेल्यास दिसणारा ध्रुव (उत्तर), मृगशीर्ष, आणि त्याच्या मागे व्याध आणि त्याचा बाण, पूर्वेकडे सिंहराशी, कृत्तिकांचा पुंजका (सोंगटीसारखा) ब्रह्महृदय, रोहिणी (बहुतेक) ! पश्चिमेची क्षितिजावरची बाजूच इथून दिसत नसल्यामुळे मावळतीकडे झुकलेले गुरु, शुक्र वगैरे नामदार दिसत नसावेत.

इतक्यात 'अरे भई क्या देख रहे हो अकेले अकेले ? हमे भी कुछ बताओ !' असे म्हणत आमच्या बसगाडीचा चक्रधर (ड्रायव्हर) आपल्या जोडीदारासह

तिथे आला. मला ज्यांची ओळख पटली होती असे तारे त्याला दाखविले. त्यांची नावे सांगितली. परंतु त्याला त्यात काही रस उत्पन्न होईना. धूमकेतूसारखा चमत्कार तेव्हा काही आकाशात नव्हता. मग त्यांनी दुसराच विषय काढला.

'एक बात हमे बताइये कि हिंदू धरममें इतनी सब देवताएँ है इसका मतलब क्या है?' तो मुसलमान व जोडीदार हिंदू होता.

'सचमुच जानना चाहते हो या ऐसेहि दिल बहलाने के लिए बात कर रहे हो?'–मी.

'अरे भई आप जैसे बुजुर्गों से कुछ जाननेको मिलेगा, इस लिए पूछ रहा हूं।'—चक्रधर.

'नाही! सांगा तुम्ही. मराठीत सांगितलं तरी चालेल. तो पुण्याचाच आहे.' त्याच्या जोडीदाराने खुलासा केला.

'हां हां! मराठी में बोलिये!'

'ठीक आहे! जरा ऐका हं! फार फार प्राचीन काळची हकीगत आहे. मनुष्य नुकताच विचार करायला लागला होता. विज्ञानाचा विकास अजिबात झालेला नव्हता. मनुष्याच्या सभोवतालच्या वातावरणाचाच विचार मनुष्याला प्रथम करावा लागला. कारण पंचमहाभूतांचा त्याच्यावर सतत परिणाम होत असलेला त्याला जाणवला. सूर्याचा दिवस व रात्र, त्याची उष्णता, अग्नी, हवा, पाणी या गोष्टींचा मनुष्याला उपद्रव जसा जाणवला तसाच त्याचा उपयोगही त्याच्या प्रत्ययाला आला. उदा० अन्न शिजवून अगर भाजून खायला अग्नी हवा तसाच तो वस्तू जाळून खाक करतो ही त्याची संहारक शक्तीही मानवाच्या प्रत्ययाला आली. प्रत्येक वस्तूला अगर मनुष्याला, उत्पत्ती स्थिती आणि लय अशा तीन अवस्था असतात हेही त्याला जाणवले. मनुष्य शेती करून आणि नगरे वसवून राहू लागला. संहारक व उपकारक अशा निसर्गातील शक्तींचे नियमन व्हावे अशी त्याला जरूर भासू लागली. समाज एका समूहाने राहायचा म्हणजे त्यालाही बंधनकारक असे यमनियम पाहिजेत. यासाठी मग थोर चिंतक व विचारवंत अशा ऋषीमुनींनी धर्म ही संस्था निर्माण केली. सर्वच माणसे काही विचार करू शकत नाहीत, (आणि अज्ञाताचे तर भय वाटत असते) म्हणजे विचार करतात; परंतु फक्त आपल्यापुरता अगर आपल्या कुटुंबापुरता? अरे भाई समजतेय ना मी काय म्हणतो ते?"

'हां हां ! आगे बतलाइये. सब आदमी सोच नही सकते इसलिये सोचनेवाले ऋषी-मुनीयोने मजहब पैदा किया. मगर इतनी सारी देवताएँ कैसी पैदा हुई ?'—चक्रधर.

'अभी मैने जैसा बतलाया —'

'मराठी में बतलाइये'- —चक्रधर.

'तर मी जे म्हणत होतो. उदा० त्या उत्पत्ती स्थिती आणि नाश(लय) या तीन अवस्थांबद्दल मनुष्याला नक्की काही माहीत नव्हते. पंचमहाभूते त्याच्या मुळाशी आहेत एवढी कल्पना होती. त्यांच्याबद्दल आदरही वाटत होता तशीच भीतीही वाटत होती. आपल्या आईवडिलांबद्दल अगर गुरुजींबद्दल कशी आदर आणि भीती दोन्ही वाटते ? तशीच त्यांना पंचमहाभूतांबद्दल वाटू लागली. म्हणून माणसे पंचमहाभूतांना मग देवता मानू लागली. त्यांना खूष ठेवण्याकरता, प्रसन्न ठेवण्याकरता मग यज्ञ-याग सुरू झाले. उत्पत्ती, स्थिती आणि लय यांच्या देवता म्हणून अनुक्रमे ब्रह्मा-विष्णु-महेश या देवता माणसाने कल्पिल्या. असं करता करता देवता पुष्कळ झाल्या. पुढे अनेक शहाण्या, कर्तबगार व पराक्रमी पुरुष व स्त्रियांना सुद्धा देवतारूपे प्राप्त झाली आणि अशा रीतीने ही संख्या खूप वाढली. परमेश्वर म्हणून जी संकल्पना आहे ते स्वरूप या सर्वांच्या पलीकडचं आहे. त्याच्यापर्यंत पोचायला या देवता मध्यस्थ म्हणून आहेत अशी कल्पना आहे.' जसे जमेल तसे मी समजावीत होतो.

'तो ये सब परमेश्वर के एजन्ट है।'—चक्रधर.

'वैसाही समजो. आखीर पैगंबर साहब, अगर इसा ये भी तो आपनेको परमेश्वरके दूत-मसीहाही मानते थे. इसके अलावा, फकीर, बाबा, मोतमावली वगैरे दूत हैही। वैदिक धर्ममे (हिंदू धर्म यह नाम पीछेसे मिला) यह बहोत पुराना होनेसे देवताकी संख्या ज्यादा है और दूसरे धरममे वे नये नये होने से कमती है। मगर देवताँएँ अनेक, सभी मजहबमे है और सभी धरममे परमेश्वर तो एकही बतलाया गया है. उनके पास पहुँचने के ये बहुत सारे रास्ते हैं।'

'आखीर परमेश्वर कोन अगर कहां होता है ?'—चक्रधर.

'परमेश्वर यह कोई एक आदमी नही है. और उनका कोई एक निश्चित रूप, एकगठ्ठा देखने को भी नही मिलेगा. परमेश्वर यह संकल्पना है, एक अपने अपने मनमे-दिलमे महसूस करनेकी चीज है।'

'वह कैसी महसूस करेगे ? कुछ तो बतलाओ.'

'मै कुछ तो बतलाऊंगा जरूर. मगर आप सचमुच जानना चाहते हो तो मेरे जैसे एक मामुली आदमी के बजाय दुसरा कोई बडा गुरु ढूँढना पडेगा और बात भी बडी लंबी होगी।'—मी.

'ठीक है! तब भी बहोत कुछ सीखने को मिला और रात भी बहोत हो गई। सव्वा ग्यारह बज गये। कल सुबहमे फिर लंबी सफर करनी है। अब सो जाईये।'—चक्रधर.

'बराय–नमस्कार'—जोडीदार.

'नमस्कार, जोगलेकरजी।' चक्रधर.

'बरं या हं.'—संवाद संपला. मला काही नीटसे सांगता आले नाही, असे वाटून गेले.

या बाबतीत गाडगेबाबा रोजच्या जीवनातील दृष्टान्त देऊन किती सहज सहज सांगत असत. ते म्हणत असत त्याप्रमाणे परमेश्वराने लिहिलेले (निर्माण केलेले) हे सृष्टीचे पुस्तक त्यांनी स्वतः चांगले वाचले होते. अभ्यास केला होता. अदृश्य अशा त्या महान पर्यटकाने निर्माण केलेले सृष्टीचे हे पुस्तक, हा महान ग्रंथराज, लिहिलेल्या अक्षरांच्या शब्दाने वाचायचा नसतो. उघड्या डोळयाने, उघड्या मनाने, उत्कट भावनेने जाणून घ्यायचा असतो. या सृष्टीतील प्रत्येक वस्तू वाचणाऱ्याला काहीतरी शिकविण्यासाठीच उत्पन्न झालेली आहे. वाचणाऱ्या माणसाचे डोळे आणि मन मात्र स्वच्छ व उघडे हवे. सृष्टी ही एक अखंड विद्यादानाचे केन्द्र आहे. 'प्रति प्रश्नेन सेवया' वगैरे सर्व मार्गाने जाणून घेणारा उत्सुक विद्यार्थी मात्र हवा. अशिक्षित गाडगेबाबांनी ते वाचूनच संतपद मिळविले. अविद्वान (?) तुक्यावाण्याने ते वाचून तर अढळपद मिळविले. नामदेव शिंप्याने भारताच्या उत्तर टोकावरच्या पंजाबी ग्रंथसाहेबात अढळपद मिळविले. ही मालिका असीम आहे. खरं म्हणजे माणसांसह ही सबंध सृष्टी म्हणजे प्रत्येक वस्तू ही परमात्म्याची अनेकविध रूपेच आहेत.

## शनिवार दि. १४ फेब्रुवारी

❊ ❊ ❊ ❊ ❊ ❊ ❊ ❊ ❊ ❊ ❊ ❊

**श्री :** **दहावा दिवस** **महेश्वर (होळकर वाडा)**

'क्यूं' जोगळेकरजी! आजहि है न वह शूलपाणी जंगल ? रास्ते मे ? गुजरात और मध्यप्रदेश के बीचमे ?'—

'है जरूर, मगर वे लुटेरे भिल हमको नही मिलनेवाले। क्यूँ के हम बहुत दूरीसे जा रहे हैं।'—

'पैदल जानेवालों को सचमुच लूटते है क्या ?'—

'तसं काही नाही हो! ते 'कंपलसरी लेव्ही' सारखं आहे. यात्रेकरूंकडून ते काही ना काही तरी उकळतात. त्या भिल्लांना दुसरं काही पोट भरण्याचं साधनच नाही त्या जंगलात. तेव्हा हाच एक धंदा झालाय! यात्रेकरूही काही थोडे फार देतात त्यांना समजून. पायी जाणारांसाठी तो बराच जवळचा रस्ता पडतो; पण आतां कोण पायी जातोय नी काय! बैरागी, गोसावीच जात असतील.—'

'बरं झालं तुम्ही सांगितलत ते, म्हणजे आता काही बांगड्या, मंगळसूत्र वगैरे काढून ठेवून खोटे दागिने घालण्याची जरुरी नाही काही?' एक मिष्किल वृद्धा. तिच्या अंगावर कसलेच दागिने नव्हते!

गरुडेश्वराहून आज न्याहारी उरकून निघायचे होते. दीडशे किलो मीटरच्या आतच असावा पल्ला. एकूण फार गर्दी नव्हती निघायची. घाटावर सावकाशीने स्नान व कपड्यांचा कार्यक्रम सगळ्यांना उरकता आला. ओल्या कपड्यांचे पिळे खांद्यावर टाकून आम्ही मुख्य दत्तमंदिरात दर्शन घेतले आणि टेंबे स्वामींच्या समाधीत आलो. कुणी दाढीवाले साधक सोवळे नेसून रुद्राची एकादष्णी करीत होते. आवर्तन संपल्यावर त्यांनी टेंबे स्वामींची माहिती सांगितली. सकाळच्या कोवळ्या उन्हात एकूणच परिसर मला कालच्या पेक्षाही सुभग वाटला. मंदिरे, समाधी आणि घाट भव्य नाहीत; पण जे आहे ते नेटके आहे. देखणे आहे. आसपास चार घरे मराठी बोलणारांचीच आहेत.

मुक्कामावरून निघालो साडेआठ वाजता. परंतु बाजारात वेळ मोडला एक तासभर. गाडीवाल्याने काल आल्याबरोबर टायर रिपेर करायला दिले होते ते

घ्यायचे होते. परंतु त्याचे दुकानच अजून उघडलेले नव्हते. त्याला बोलावून आणून टायर मिळेपर्यंत एक तास गेला. प्रांताप्रांतातून आमचा प्रवास होतोय. पण प्रत्यक्ष ते ते प्रांत किंवा त्यांतील पोट विभागांतील वैशिष्टये लक्षांत येण्या-इतक्या सावकाशीने आमचा प्रवास होत नाही; कारण प्रवासाचा उद्देश नर्मदा परिक्म्मा एवढाच आहे. खरे म्हणजे आजचा प्रवास, दोन प्रांतांच्या सरहद्दी पुरताच आहे. या भिल्ल व आदिवासींची माहिती तपशिलवार व्हावी अशी माझी इच्छा आहे. पण तिचा काही उपयोग नाही. त्यासाठी कोणतीही बंधने नसलेला स्वैर असा प्रवास एखाद दुसऱ्या सहकाऱ्यासह असा असावयास हवा. त्या लोकांत राहायला मिळायला हवे. पण हे 'विशफुल थिंकिंग'च राहाणार आहे; कारण आम्ही असे लंगोटी लावून प्रवासाला निघणारच नाही आहोत कधी !

आमच्या बसचा प्रवास लांबून आहे. म्हणून तो सुरक्षित आहे. गोध्याला टँजंट मारून गुजराथेतले शेवटले गाव छोटाउदेपूरला गाडी आली. आता गाडीने गुजरात प्रांत सोडला व मध्यप्रदेश जोडला. मला वाटले होते की एखादा डोंगरी घाट असेल पुढे; परंतु तसे काही नव्हते. साधा चढ सुद्धा नव्हता. या प्रदेशात मोठमोठी अभयारण्ये सुद्धा डोंगरावर नाहीत. जवळ जवळ सपाटीवर! महाराष्ट्रातही नागविदर्भाकडे तशीच आहेत. उदा० ताडोबा, नवेगाव, बांध, नागझिरा वगैरे. थोडासाच उंचवटा असेल कदाचित. पण प्रत्यक्ष प्रवास करतांना चढ कुठेच जाणवत नाही.

आता बारा वाजून गेले होते. गाडी एका मैदानाच्या बाजूस लहानसे देऊळ, एक विहीर आणि चार आम्रवृक्षांची राई होती, तिथे थांबली. आंब्याची झाडे इतकी विस्तीर्ण सावलीची होती की त्या छायेत जवाहरलाल नेहरूंची सुद्धा सभा झाली असती. इथेच जेवणासाठी थांबण्याचे व्यवस्थापकांनी ठरविले होते. आतापर्यंत आम्हाला छोटाउदेपूर सोडल्यावर व जंगल लागल्यावर मोजून पाच माणसे, एक ट्रक व एक टूरिंग कार भेटली होती. या शिवाय एक सात माणसे असलेली लग्नाची वरात भेटली. भेटलेली माणसे तिरकमठावाले भिल्ल होते. लहानसहान शिकारी साठीच बिचारे हिंडत असावेत. वरातींतील सात माणसांपैकी फक्त वधूच्या सर्वांगावर कपडा होता. वराने एक अंगारखा आणि कमरेला एक फडका नेसलेला होता. एक करवली होती ती सुद्धा मोठासा पंचावजा कापडाचा तुकडा नेसलेली होती. बाकीचे चारीजण अर्धनग्न, लंगोटीवाले, बंड्या घातलेले. वराच्या व दुसऱ्या एकाच्या डोक्याला रंगीत फडक्याची टापशी बांधलेली होती.

आम्ही जेवायला बसलेलो असतांना तीन मुले लंगोट्या लावलेली व लहान लहान धनुकल्या घेतलेली, तिथे आली. अन्नाच्या आशेने! उरले सुरले अन्न त्यांना मिळाले; परंतु आमची व त्यानंतर कर्मचाऱ्यांची जेवणे झाल्यावर. सुमारे तासाने.

मैदानाच्या कडेला असलेल्या खडकांवर सर्वांनीच आपले ओले कपडे वाळत टाकलेले होते. गाडीची निघायची सूचना मिळाल्याबरोबर प्रत्येकाने आपले कपडे गोळा केले व एक एक जण गाडीत जाऊन बसले. गाडी पुन्हा मार्ग आक्रमू लागली. सभोवतालच्या वृक्षराजीमुळे जंगल भासत होते. ऐन दुपारीसुद्धा चांगला गारवा होता. आता दुपारचे साडेतीन वाजले होते. जंगल संपून लहान सहान खेडेगावे येत होती, जात होती. पहिले मोठे गाव 'कुक्षी' आले. मग 'मनावर' आले. आता गाडी मुंबई-आग्रा रोडवर आली आणि डावीकडे वळून धामनोदला आली. इथे चहा झाला. आता गाडी नदीशी समांतर असलेल्या धामनोद-बडवाह रस्त्याला लागली. दिवस मावळायला आम्ही महेश्वरच्या किल्ल्यातील होळकर वाड्यात पोचलो. एका माडीवर उतरलो आहोत.

काळोख पडायला आला होता. तरी आम्ही एकदा घाटावर जाऊन यायचे ठरविले. घाटाची व वाड्याची विशालता ऐकून होतो ती आता समक्ष पाहिली. अहिल्यादेवी होळकर या राजस्त्रीने सगळ्या भारतभर तीर्थयात्री व प्रवासी यांची जी सोय केली आहे त्याला तोड नाही. तीनशे वर्षे होऊन गेली तरी या पुण्यश्लोक महाराणीची स्मृती अद्याप ताजी आहे. अनेक शतके ती तशीच राहाणार आहे. येथील वातावरणात तर ती सर्वत्र भरून राहिलेली आहे. राजे मात्र विस्मृतीत गेले आहेत.

रात्री जेवणानंतर आम्ही महेश्वरच्या बाजारात आलो. दुधाची कढई कुठे दिसते का पाहात होतो आणि आमच्या सहप्रवासी स्त्रियांचे दोनतीन गट आम्हास भेटले. त्यांच्या हातात लुगडी, साड्यांची पुडकी होती. जेवणाची वेळ टाळूनसुद्धा, या बाजारात साड्या बघायला गेल्या होत्या. महेश्वरी, चंदेरी वगैरे साड्यांच्या उत्पादकांची ही पेठ! बायकांचा हा सोस सनातनच आहे. आम्हाला दूध मिळाले, ते कुठे, म्हणून त्या विचारू लागल्या. कारण आता त्यांना जेवण मिळणे मुष्कील होते. त्यांना हलवायाची दुकाने दाखविली. या प्रहरी तिथे काय काय घेणे इष्ट आहे तेही सांगितले.

# रविवार दि. १५ फेब्रुवारी

❊ ❊ ❊ ❊ ❊ ❊ ❊ ❊ ❊ ❊ ❊ ❊

श्री : अकरावा दिवस इंदौर

'चला आबा, जेवायला चला!'—भाऊ पुरोहित.

'छे हो आज जेवणाला रजा.'—मी.

'कां हो! येवढीशी रबडी खाऊन पोट भरलं?'

'तुमचं वाईकर भटजींचं ठीक आहे हो! माझ्या वयाच्या माणसाने आधीच सावध असलेलं बरं. शिवाय आज आपण खूप खूप पाहिलय, ऐकलयपण. बोललोही खूप. तेव्हां रोजनिशी लिहायला आज वेळ पुरणार नाही.'—माझा खुलासा.

'बऽरं, बऽरं, बसा तुम्ही लिहीत. आम्ही येतो जेवून. चला स्वामी. आज देवासकर पण नाहीत. ओरपे पण त्यांच्या कुठल्याशा नातेवाइकाकडे जातायत.'

'आहो! देवासकर आपल्या गावालाच आले आहेत. तेव्हा त्यांनी कां बरं आपल्या घरच्याच माणसांना भेटायला जाऊ नये?' 'जावं की! बरं बसा तुम्ही लिहीत. आम्ही येतो जेवण उरकून.'—पुरोहित.

'बरं. या!'—मी पुन्हा ही 'वासरी' लिहू लागलो.

काल रात्री, महेश्वरला ज्या माडीत आम्ही झोपलो होतो तिथे आज पहाटे, जाग आल्याबरोबर आपण कुठे आहोत याची आठवण करताक्षणीच सभोवतालचा भव्य वाडा व पलीकडील नदीचे पाणी चकाकले. सकाळी म्हणजे पहाटेच पहिला चहा वगैरे उरकल्यावर प्रत्येक यात्री खाकोटीस कपडे घेऊन घाटाकडेच निघाला. कालपासून या घाटाची मोहिनीच तशी प्रत्येकावर पडली होती. गेल्या दोन दिवसांच्या अनुभवावरून प्रत्येकाला माहीत होते की माळव्याच्या थंडीतही रेवामैय्याचे पाणी जाम थंड असत नाही. नर्मदा घाटावरचे इतके विलोभनीय, भव्य, गंभीर असे दृश्य आणखी कोणत्या नदीघाटावरही क्वचितच पाहायला मिळेल. नद्या मोठ्या आहेत, घाटही मोठे आहेत. परंतु ही भव्यता फक्त महेश्वरचीच. तसेच गंभीरपणे वाहात असणारे पाणी पाहून, पोहोणाऱ्याला चार हात मारून आल्याशिवायही राहावणार नाही.

मुख्य घाट हा अहिल्यादेवींचा घाट. याच्या दोन्ही बाजूस शिवाय घाट असून नदीच्या सुमारे दोन किलोमीटर अंतरात या घाटासह सुमारे चाळीस-पन्नास लहान मोठे घाट आहेत. घाट तर आणखी पंचवीस ठिकाणी पाहिल्याचे सहज आठवते. परंतु इतका भव्य घाट कुठेच नाही. घाटाच्या वरच्या बाजूस असलेली मंदिरे जणू या घाटाचाच एक भाग असल्यामुळे एकूण भव्यतेत भर पडत आहे. कपडे धुऊन झाल्यावर वर पाहिले की ती मंदिरे बोलावीतच असतात. तिकडे पाय वळतात. दरवाजा ओलांडून पलीकडे गेल्यावर डाव्या हाताला जे मंदिर दिसते ती त्या पुण्यश्लोक अहिल्यादेवीचीच छत्री. आत शिव व गणपती यांच्या प्रतिमा आहेत. या छत्रींतच नव्हे तर सगळ्या महेश्वरात दर्शन होते ते फक्त अहिल्यादेवीचेच. खाली उतरल्यावर एक पाटी दिसते, ती सांगते हा रस्ता राजराजेश्वर मंदिराकडेच जातो. पुढे पायऱ्या चढल्यावर आपण मंदिरातच पोहोचतो. या मंदिराचा विशेष म्हणजे इतर सर्व नेहमींच्या सारखेच असून शिवाय शिव आणि पार्वतीची अष्टधातूंची एकाच बैठकीची घडविलेली मूर्ती आहे आणि दुसरे म्हणजे इथे काही शतके तरी चालत आलेली परंपरा. म्हणजे या देवापुढे अकरा नंदादीप अखंड तेवत असतात. खेडेगावांत आपल्या कुलदैवतापुढे एक नंदादीप चालू ठेवायला गावकऱ्यांना किती यातायात पडते हे ज्यांना माहीत आहे त्यांना या अकरा नंदादीपांचे कौतुक वाटल्याशिवाय राहाणार नाही. शेजारी विठ्ठलराव (विठोजी) महाराजांची छत्री आहे. यांच्या वधाची एक दुर्दैवी कहाणी आहे. विस्तारभयास्तव ती इथे देत नाही. याखेरीज त्याच परिसरांत काशी विश्वनाथाचे शिवालय, विंध्यावासिनी (भवानी माता) देवीचे मंदिर, (एकशे आठ शक्तीपीठांपैकीं एक व महाराष्ट्रांतील अनेकांची कुलस्वामिनी) बुले सरकार (एक कार्यक्षम कारभारी) वगैरे होळकर कुळातील दिवंगतांच्या छत्र्या आहेत. प्रत्यक्ष जाऊन न पाहिलेली अशी अनेक मंदिरे व वास्तू जरा लांबवर अनेक आहेत. त्यांपैकी काही महत्त्वाच्या स्थळांचा उल्लेख फक्त करीत आहे. पंढरीनाथ मंदिर, बाणेश्वर मंदिर, नरसिंह मंदिर, मातंगेश्वर मंदिर ही जवळच आहेत. शिवाय अनेक तीर्थेही आहेत. या महिष्मती नगरीला पुराणांतरीं गुप्त-काशी असेही म्हणतात.

ज्याच्यापाशी आणखी एखाददोन दिवसांची फुरसत असेल त्यांच्यासाठी आणखीही जाऊन पाहण्यासारखी स्थळे शिल्लक राहातात. त्यांची माहिती इथे देणे अप्रस्तुत ठरणार नाही. महेश्वर पासून सुमारे पाच कि. मी. अंतरावर सहस्रधारा नावाचा प्रपात आहे. उन्हाळ्यातही इथे पाणी असते व धबधब्याखाली

मनसोक्त स्नानाची तहान भागवता येते. नर्मदेच्या मध्यावर बाणेश्वराचे शिवालय आहे. याच्या प्राकारातून, पाण्याच्या सान्निध्यामुळे निसर्ग सौंदर्य अप्रतीम दिसते. हीच गोष्ट सहस्रधारा प्रपाताच्या ठिकाणी अनुभवाला येते.

जवळच मण्डलेश्वर हे ठिकाण आहे. विद्वान ब्राह्मणांची वस्ती, पाठशाळा वगैरे येथे आहेत. महाराष्ट्रीय वस्तीही बरीच आहे. पलीकडील तीरावर पण थोडे तिरके, खास होडींतून गेल्यास रावेरखेडीला थोरल्या बाजीरावांच्या समाधीचे दर्शनही घेता येईल. नदी ओलांडायची नाही हा आमच्यासाठी निर्बंध होता. शिवाय तितकी फुरसतही नव्हती. नर्मदा प्रकल्पात ती समाधी बुडून जाणार आहे म्हणून तिची पुन्हः पुन्हा आठवण होते.

महेश्वरच्या किल्ल्याचा विस्तार तीन चार चौरस मैल इतका आहे. अहिल्या देवींच्या या राजधानीची खरी शान बघायची असेल, तिची भव्यता अनुभवायची असेल तर पश्चिमेकडून धामनोदहून अगर बडवाहच्या बाजूने पूर्वेकडून येताना दोन तीन मैल अंतरावरून हा किल्ला पाहिला पाहिजे. सगळ्यात उत्तम म्हणजे नदीच्या पैलतीरावरून! पण त्यासाठी मुद्दाम नाव काढून पैलतीरावर जायला पाहिजे. तिकडून इथले काही फोटो तर अप्रतीमच येतील. इथे जवळून या राजधानीचे दर्शन घेऊन मनाला प्रसन्नता वाटण्याऐवजी उदासीनता वाटते. कारण म्हणजे येथील पडझड बघून व तिकडे होणारे संबंधितांचे दुर्लक्ष बघून मन खंतावते. ज्या राणीने ही इतकी वैभवशाली राजधानी उभारली तिची स्वतःची राहाणी किती साधी होती त्याची साक्ष तिचा राहाता वाडा पाहून येते. आम्ही उतरलो होतो याच्या समोरच मोठेसे अंगण आहे. हे अंगण राणीच्याच वाड्याचे. वाड्या-मागेच तिचे देवघर आहे. या सर्व वास्तूचे व्यवस्थापक कुणी एक मुसलमान गृहस्थ आहेत. आमच्या देखतच ते आले आणि गेले. आल्याबरोबर जोडे काढून राणीच्या गादीला त्यांनी बंदगी केली. त्यांच्या बरोबरच्या कुटुंबियांनीही तसेच केले. चांगले गृहस्थ आहेत असे समजले. आम्ही आता राणीचे देवघर पाहायलाच निघालो. देवघरात अनेक शिसवी देव्हारे आहेत. त्यांत गंडकी शिळेच्या शाळिग्रामी शिळेच्या अनेक पिंडी आहेत. चांदीच्या बैठकीत त्या बसविलेल्या आहेत. एक मोठा सोन्याचा पाळणा (सोन्याच्या पत्र्याने मढविलेला असावा) आहे. तो कृष्ण कन्हैय्यासाठी त्याकाळी असावा. कदाचित कुलदैवत खंडेरायासाठीही असेल. माहिती सांगायला किंवा विचारायला सुद्धा पहारेकऱ्याशिवाय कुणी नव्हते. या पाहा आणि जा. तो सोन्याचा पाळणा अगदी सोन्याच्या पातळ पत्र्याने मढविला

८२९ / २६२२०

आहे असे धरले तरी त्याची किंमत कित्येक लाख रुपये होईल. पण त्यामानाने तिथे बंदोबस्तही दिसत नाही. इथले दुसरे एक वैशिष्ट्य म्हणजे 'उजव्या पाळीचा शंख.' हे देवघर सध्या ज्या स्थितीत आहे ती स्थिती त्याकडे होत असलेले दुर्लक्षच दर्शविते. देवघर वाड्याच्या एका सोप्यात अगर गोडाऊनमध्ये आहे, असे भासते. तसेच देवघरात मांडणी अशी काही नाही. वखारीत माल पडलेला असतो तसे सर्व वाटते. कारभारी जर भले गृहस्थ आहेत असे म्हणतात, तर ही सर्व अव्यवस्था काही भलेपणाची म्हणता येणार नाही.

पुण्यश्लोक अहिल्यादेवीची थोरवी केवळ दोनशे वर्षांपूर्वीचा इतिहास आठवून मनात येत असते; परंतु तिने निर्माण केलेल्या वैभवाचे आजचे हे वेडेविद्रे रूप पाहून तितकीच खिन्नता येते. खिन्नता वाटण्यासाठी तरी हे सर्व पाहायला हवे.

या महिष्मती राजधानीला पौराणिक कालापासून इतिहास आहे. कलचुरिया वंशाची ही राजधानी. शंकराचार्यांशी द्वंद्व खेळणारा मंडनमिश्र इथला. असा अनेक पानेच्या पाने लिहिण्याइतका इतिहास या राजधानीला आहे. जिज्ञासूंनी तो इतरत्र पाहावा. सामान्य मराठी माणसाला रस वाटेल अशी माहिती ओघात आली तेव्हढीच इथे दिली आहे.

आज दुपारचे भोजन जरा लवकरच झाले. आज मुक्कामाला इंदौरला यायचे होते. वाटेत मांडवगडचा किल्ला बघायचा होता. चौदा वर्षांपूर्वी मी तो पाहिला होता. आज दुपारी आमची मोटरबस निघाली. धामनोदपर्यंत कालच्याच वाटेने परत आली. इंदौरच्याकडे तोंड करून काही काळ आग्रारोड काटल्यावर डाव्या हाताला धारच्या रस्त्याला लागली. तीन साडेतीन वाजतां मांडूगड गाठला. 'परिकम्मा'वाल्यांना इथे यावेच लागते. येथील रेवाकुंड हा नर्मदेचाच एक भाग समजतात. त्यांत स्नान करायचे असते परिकम्मावाल्यांनी.

या स्थानाला ऐतिहासिक व सांस्कृतिक दृष्ट्याही तितकेच महत्त्व आहे. बाजीराव-मस्तानी सारखीच बाजबहादर व राणी रूपमतीची प्रेमकहाणी इथे घडली. या कहाणीचा काळ सोळाव्या शतकाचा मध्य आहे. इतिहास संशोधकांतच मतभेद असल्यामुळे त्यांच्या विवाहपूर्व सामाजिक स्थानाबद्दल काही लिहीत नाही. रूपमती ही एक ठाकूर (क्षत्रिय) कन्या होती आणि बाजबहादर हा मोंगलांचा माळव्यातला सुलतान होता. संगीताच्या समान शौकामुळे दोघांचे प्रेम जमले. गडावर रूपमतीचा महाल सर्वांत उंच जागी आहे. रूपमती रेवामैय्याचे दर्शन घेतल्याशिवाय जेवीत नसे आणि तिच्या महालाच्या बुरूजावरून नर्मदेचे

दर्शन होत असे. रूपमतीच्या महालासमोरच दोनशे फुटावर बाजबहाद्दरचा महाल आहे. आपापल्या महालात बसून उभयता संगीताची जुगलबंदी खेळत असत आणि संगीताची मझा लुटीत असत. दोघंही इतकी संगीत प्रेमी व तज्ञ होती! प्रेमींच्या जगात असा समसमासंयोग किंवा मणिकांचन योग क्वचित आढळेल. या दोन्ही प्रेमिकांचा अंत मात्र दुःखद झालेला आहे. एका लढाईत बाजबहाद्दरचा पराभव झाला; परंतु अफवा पसरली ती मात्र तो त्या लढाईत मारला गेल्याची. इकडे रूपमतीने विरहदुःखाने विष प्राशन करून आत्महत्त्या केली आणि तिकडे बाजबहाद्दर खानदेशात जिवंत होता. उदासीनतेच्या भरात त्या शूर पुरुषाने मोंगलांच्या दरबारात केवळ एक सामान्य दरबार-गायक म्हणून स्थान पत्करले!

त्याच्याच विनंतीवरून तो मेल्यावर त्याची कबर सारंगपूरला रूपमतीच्या समाधीच्या शेजारीच बांधलेली आहे. शेजारी असलेल्या या समाध्या पाहात असतांना त्यांची संपूर्ण प्रेमकथा मनःचक्षुंपुढे उभी राहाते. मन हेलावते.

राणी रूपमतीच्या महालापलीकडेच रेवाकुंड आहे. त्यात आम्ही फक्त मार्जनस्नान केले. गडावर एकूण पाहाण्याची स्थाने सत्तर आहेत. त्यापैकी आज ज्यांना आम्ही भेट दिली ती व इतर काही महत्त्वाची अंगे यांच्याबद्दल इथे प्रत्येकी एक दोन वाक्यांतच सांगण्याचा प्रयत्न करीत आहे. आलमगीर, देहली, भंगी, गाडी वगैरे जे दरवाजे येताना लागले त्यांचीच 'ही नावे' बरोबर आहेत. चौदा वर्षांपूर्वी मी येथे येऊन जे पाहिले होते ते व आज जे पाहात होतो ते, यांत महदंतर पडलेले आहे हे पाहून मन खंतावते. काप गेले आणि भोके राहिली असे म्हणावेसे वाटते. १९५२ मध्ये पं. जवाहरलाल नेहरू इथे येऊन गेले आणि तेव्हापासून हा गड मध्य प्रदेशाच्या पर्यटन नकाशावर आला आहे. मोंगल बादशाह अकबर व जहांगीर यांनीसुद्धा हे हवा खाण्याचे ठिकाण म्हणून योजिले होते. दुसऱ्या बाजीराव पेशव्याचा जन्मही या परिसरात झाल्याचे सांगतात.

राणी रूपमती व बाजबहाद्दर यांच्या महालांचे दर्शन घेऊन आणि रेवाकुंडात मार्जनस्नान उरकून आम्ही आता गड पहायला निघालो होतो. प्रथम लागला तो एको (प्रतिध्वनी) पॉइंट. तुम्ही मारलेली हाक तुम्हालाच दोन वेळा ऐकायला येते. पुढे नाक्यावर अश्रफी महल आहे. इथे म्हणतात, नर्तकी हातावर उलटी उभी राहून (सोन्याच्या) अश्रफी गोळा करीत पायऱ्या चढत असे. डाव्या बाजूला (रस्त्याच्या) जामा मसजीद आहे. खूप म्हणजे खूपच मोठी आहे. कर्णरेषेत समोरच्या बाजूला राममंदिर आहे.

इथून बरेच पुढे गेल्यावर डाक बंगल्याच्या पुढे 'जहाज महाल' म्हणून राजवाडा आहे. त्याच्या दोन्ही बाजूला पाण्याचे रुंद नाले होते. त्यांत या महालाचे जे प्रतिबिंब पडत असे त्यामुळे पाण्यांतून जहाज जात आहे असा भास होत असे. चौदा वर्षांपूर्वी मी तो पाहिलेला आहे. आता नाले बुजवून पाण्याच्या ठिकाणी चार फुलांच्या झुडपांचे ओसाड बगीचे केले आहेत. आहे का नाही पर्यटन खात्याची करामत ? हाच 'जहाज महल' परदेशात असता तर काय झाले असते ! परदेशात समक्ष पाहिलेल्या काही स्थानांवरून मला असे वाटते की त्या मंडळींनी पाणी वाढवून त्यांत लाटा व लाटांचे आवाज ऐकू येतील अशी योजना केली असती आणि ते पाहायला अगर तो आभास अनुभवण्यासाठी पर्यटकांकडून प्रवेश फी घेतली असती. पण त्याचा असा उजाड बगीचा (?) केला नसता नक्की !

'हिंडोला महल' त्याच परिसरात एक वास्तू आहे. झोके घेत असतांना हिंदोळ्याचा जसा आकृतीबंध दिसेल तशा तिरक्या भिंतीचा हा महल आहे. बाजूला चंपा बावडी म्हणून एक मोठी विहीर आहे. विहीर मध्ये ठेवून सभोवताली वाटोळी गॅलरी बांधली आहे. मोंगली बेगमा उन्हाळ्याचा त्रास इथे बसून घालवीत असत. सध्या याला जमिनीखाली एकच मजला दिसतो. पूर्वी अनेक होते. बाजूला हमामखाना (जहाज महलजवळ) म्हणून स्नानगृह (मोंगलांचे) आहे. त्यांतील विस्तीर्ण असा पाण्याचा हौद बघून मोंगलांच्या विलासी वृत्तीची कल्पना येते. सध्या हौद कोरडाच आहे.

नीलकंठेश्वराचे मंदिर हे एक रम्य ठिकाण आहे. मुळात मोगलांनी बांधले व पेशव्यांनी त्याचा जीर्णोद्धार केला. चौदा वर्षांपूर्वी इथे आमची गाडी बिघडली होती व मोडलेला सुटा भाग इंदौरला जाऊन आणीपर्यंत दोन रात्री आमचा मुक्काम इथे गाडीत (स्टेशन वॅगन) होता. त्यावेळच्या पुजाऱ्यांशी दोस्ती जमली होती व दीड दिवस मोठा अनपेक्षितपणे मजेत गेला होता. इतिहासातील वैभव आठवीत !

पुजारी बहुश्रुत होता. बहुतेक राष्ट्रीय स्वयंसेवक संघवाला किंवा सावरकर भक्त असावा. आम्ही महाराष्ट्रीय आहोत असे आढळल्यावरून त्यांनी अनेक महाराष्ट्रीय परंतु अखिल भारतीय पुढाऱ्यांबद्दल आदराचे उद्गार काढले. विशेषत: झांशीची राणी लक्ष्मीबाई व सध्यांच्या ग्वाल्हेरच्या राजमाता विजयाराजे शिंदे यांच्याबद्दल. आम्हालाही आमच्या तुटपुंज्या ऐतिहासिक ज्ञानाचा उपयोग करून, राजा छत्रसाल व राणी दुर्गावती तसेच आधुनिक पुढारी मदनमोहन मालवीय

वगैरेंबद्दल गौरवोद्गार काढून मध्यप्रदेश सुद्धा काही कमती नाही म्हणून म्हणावे लागले. वेळ मजेत गेला होता.

मागील गोष्टी आठवण्याचे कारण म्हणजे यात्रा कंपनीतर्फे दाखवायचे ते सर्व दाखवून झाले होते व आम्ही–सर्व सहप्रवासी, मधल्या वेळच्या चहापाण्याची वाट पाहात नवीन मैदानी बगीच्यांत (?) बसलो होतो.

प्राचीन काळी परमार वंश माळव्यात राज्य करीत होता तेव्हा, मांडवगड हे साहित्य व कलेचे केन्द्र समजले जात असे. मंडनमिश्रावर महेश्वरसारखे येथील लोकपण 'तो आमचा' म्हणून हक्क सांगतात. मांडवगडाचा विस्तार पंधरा चौरस मैलांच्या वर आहे. तीन बाजूला खोल दरी. हवा पाणी उत्तम.

'हे सगळं प्रवचन आधी कां नाहीं केलंत? म्हणजे आम्ही सगळं तशा दृष्टीने बघितलं असतं. मगाचपासून ऐकतेय मी.' सानेमावशी विचारीत होत्या. त्यांचं लक्ष असावं बहुतेक आमच्या आपापसांतील बोलण्याकडे.

'आधी श्रोते कुठे होते प्रवचन ऐकायला? मी आपला एकटाच बडबडत बसूं?'—माझा खुलासा.

'बरं! आता यापुढे तरी लक्षांत ठेवा.'

'अवश्य' मी आश्वासन तर देऊन ठेवले. कोण जातोय आपणहून कुणाला सांगायला. ऐकणाराला त्यांत रस असेल तर ठीक!

'पाच वाजता आमचा मांडूगडचा मुक्काम संपला आणि पुन्हा मागे वळून आम्ही आग्रा रोडवर येऊन दिवे लागल्यावर इंदौरात या मारवाडी धर्मशाळेत आलो. जुनाट वास्तू आहे. पण जागेचा संकोच नाही. ऐस पैस तीन चार हॉल मिळाले आहेत माडीवर. जेवणाला (रात्रीच्या) बराच अवकाश आहे. म्हणून या माळवभूमीच्या, दुधातुपाची चंगळ असलेल्या राजधानीत आल्याबरोबर फिरायला बाहेर पडलो. फार लांब न जाताच 'सर्वटे' स्टँडजवळ दुधाची व हलवायांची दुकाने दिसली. रबडी, लस्सी ज्याला जे हवे होते ते मिळत होते.

जिभेवर त्या रबडीची, मिठाईची चव तशीच बराच वेळ आठवणीत घोळत होती आणि आत्ता सुरवातीला सांगितल्याप्रमाणे मी जेवायला न जाता लिहायला बसलो आहे.

# सोमवार दि. १६ फेब्रुवारी

❊ ❊ ❊ ❊ ❊ ❊ ❊ ❊ ❊ ❊ ❊

श्री : बारावा दिवस इंदौर

जरूर असो अगर नसो, अशा प्रवासात लवकर उठायची सवय होतेच. पाच वाजता होणाऱ्या चहासाठी तोंड धुवून आम्ही तयार असतो. याला 'बेड टी' म्हणतात. परंतु आम्ही तो बेडमध्येही घेत नाही आणि तोंड धुतल्याशिवायही घेत नाही. दोन्ही वेळा, म्हणजे पहिला व दुसरा न्याहारीच्या वेळचा चहा पोटभर मिळतो. तरी तो कुणीही दीड, फार तर दोन कप (लहानच) च्या वर घेत नाहीत. (तसा मिळत नसता तर मात्र जास्तीत जास्त वसूल करण्यात कोणीही कुचराई केली नसती, असा एक वात्रट विचार मनात येऊन जातो.) आज नऊ वाजता महांकाळेश्वराच्या दर्शनासाठी उज्जैनला जायचे होते. तेव्हा सकाळी सगळेच आरामशीर चालले होते. आजचा प्रवास तसा मोठा नव्हताच. दोनच तासांचा प्रश्न होता.

साडेअकरा वाजता आम्ही मेघदूतात वर्णिलेल्या क्षिप्रेच्या किनारी पोचलो; परंतु क्षिप्रेचे पाणी त्यात वर्णिल्याप्रमाणे, न्हालेल्या ललनांच्या अंगाच्या उटण्याने सुगंधित झालेले नसून घाणेरडे होते. वाहाते नव्हते. पुन्हा आम्ही येथे मार्जनस्नानच केले. (खरं म्हणजे काही केलेच नाही.) इंदौरहून आम्ही 'दमयतीच्या वराने' पुरविलेल्या पवित्र जलाने स्नान उरकूनच आलो होतो. आता सर्वांचा मोर्चा यात्रानियोजित स्थानिक गुरुजींच्या मागून महांकाळेश्वराच्या मंदिराकडे निघाला. इथेही महांकाळेश्वराची दोन मंदिरे आहेत. स्थानिक गुरुजी नवीन मंदिराकडे जात होते; परंतु आम्हाला 'टिप' मिळाली होती जुन्या मंदिराकडे जाण्याची. तेव्हा आम्ही चौघेजण (चौथे गुरुजी) जुन्या मंदिराकडे चालू लागलो. तशी दोन्ही देवळांची दिशा एकच आहे. मंदिरात पोचलो. पादत्राणांचे पास घेतले नी ती योग्य त्या माणसाच्या ताब्यात दिली. समोरच्या खिडकीशी जाऊन मंदिरात जाऊन पूजा करण्याचा पास काढला. आत जाऊन व्यवस्थित पूजा करून परत आलो आणि ज्या उपाध्यायाच्या मार्फत पूजा केली त्याच्याशी बोलत जरा उभे होतो. इतक्यात आमच्या बसमधील सहप्रवाशांना, काही रक्षक बाहेर काढीत होते. वस्तुस्थिती अशी होती

की आम्ही आरामात सावकाशीने ज्या महांकाळाची पूजा केली तोच सरकारमान्य होता व दुसरी मंडळी जी नवीन मंदिरात गेली होती त्यांचे तिकडले पूजेचे पास इकडे चालेनात. तेव्हा त्यांना इथे पैसे खर्च करून पुन्हा पूजापास घ्यावयास हवे होते. तसे त्यांना करावेच लागले. ओंकारेश्वरला जसा पहिल्या मजल्यावर महांकाळ आहे तसा इथे महांकाळाच्या वरच्या मजल्यावर ओंकारेश्वर असायला पाहिजे होता. तसा तो आहे किंवा नाही याची खात्री करून घेतली. अर्थात तो तसा होताच.

जेवण्यासाठी ठरलेल्या मुक्कामावर जाताना अनेक मंदिरांना भेटी दिल्या. त्यांतील मुख्य सांगायची झाली तरीसुद्धां ती यादी लहान नाही. बडा गणपती, पंचमुखी मारुती, सिद्धी माता मंदिर, संतोषी माता मंदिर, अन्नपूर्णा मंदिर. वगैरे वगैरे; पैकी बडा गणपती महाकायच आहे. त्याच्यामागे एखादी अँबेसेडर गाडी सहज लपून राहील. त्याशिवाय न पाहिलेली ठिकाणेही तितकीच आहेत. अंकपाद आणि संदिपनी आश्रम ही स्थाने तिथून एक मैलावर आहेत, शिवाय समोरच्या डोंगरावर उत्खननांत अनेक कुतूहल वाढविणाऱ्या वस्तू आढळल्या आहेत; परंतु आमची यात्रा महांकाळापुरतीच होती. डोळे व कान उघडे असतात आणि नवीन काही जाणण्याची उत्सुकता असते म्हणून एवढेतरी समजले. हे ही नसे थोडके ! असे मनातल्या मनात म्हणत जेवणाच्या मुक्कामाकडे वळलो. जेवण एक देवळाच्या प्राकारांतील एका सोप्यात झाले. उज्जैनी विक्रमादित्याची राजधानी, परमारांची राजधानी, कालिदासाची कर्मभूमी म्हणून ती न वाटता तिच्याबद्दलच्या ज्या रम्य कल्पना होत्या त्या ती नगरी समक्ष बघून आता राहिल्या नाहीत. कदाचित जे रम्य ते आम्हाला बघायलाच मिळाले नसेल.

इन्दौरला परत आलो तरी उज्जैनचा गलिच्छपणा आणि चिखल आठवत होता. वास्तविक ओंकारेश्वर-महांकाळेश्वर ही बारा ज्योतिर्लिंगांच्या श्लोकांतील दुसऱ्या व तिसऱ्या क्रमांकाची ज्योतिर्लिंगे, म्हणजे महत्त्वाची तीर्थक्षेत्रे. उत्तरेत बनारससह सर्वच ठिकाणे, कोंदट व गलिच्छपणाचे नमुने आहेत. ओंकारेश्वर डोंगरावर असून गावगर्दीत नाही. म्हणून तिथे अस्वच्छपणाला वावच कमी आहे. उज्जैन महांकाळेश्वर मंदिराचा प्राकार मोठा असल्यामुळे घाण कमी आहे; परंतु परिसर अगदी गलिच्छ. शहरातही तीच अवस्था. याच्या उलट परिस्थिती दक्षिणेत आहे. म्हणून मनात ही दक्षिण उत्तर तुलना आपोआप येते. दक्षिणेतील प्राकार उत्तरेच्या मानाने अवाढव्यच. पण कसे स्वच्छ आणि देखणे ! हां ! उत्तरेत खाण्यापिण्याची

चंगळ. दुधातुपाची मुबलकता व स्वस्ताई. दक्षिणेत नुसती स्वस्ताईच आहे ऐश्वर्य नाही दुधा-मधाचे. शिवाय कलेचा, शिल्पकलेचा वारसा दक्षिणेकडेच आहे. मीनाक्षी, वेरूळ, अजिंठा वगैरेंशी तुलना करायला उत्तरभारतात फारच थोडे आहे.

इंदौरला दिवसाउजेडी पोचलो आणि गाडी अन्नपूर्णामंदिर पाहाण्यासाठी थांबली. पंढरपूरला कैकाडीमहाराजांच्या मठात जो प्रकार आहे तोच इथे आहे. मंदिराचे आवार खूप मोठे आहे. या आवारात अनेक झोपड्या आणि लहानमोठी मंदिरे आहेत आणि यांतून पौराणिक दृश्यें उभी केली होती. सजावट व व्यक्ती मिळून दृश्यें उठावदार व आकर्षक वाटत होती. ऋषी, राजे, देवता, अधिकारी, सेवक व काही जनावरांच्या आकृती मिळून सव्वाशे दीडशे तरी एकूण मूर्ती असतील. सर्व मूर्ती व देखावे सुबक होते. अन्नपूर्णादेवीचे मुख्य मंदिर छानच आहे. तरीही मनात येत होते की दक्षिणेकडील मूर्तिकला यापेक्षा बरी असावी. ह्याचा कलात्मक दर्जा आम्ही सामान्यांनी काय ठरवावा!

आमची परिकम्मा उत्तर तीरावर आल्यापासून नर्मदेची आरती झाल्यानंतर जो प्रसाद वाटला जातो तो आता कसल्यातरी मिठाईचा असतो व ती मिठाई कुणातरी एका अगर दोघा 'परिकम्यावाल्यांची' असते. तशी स्वखुषीने सुरुवात झाली आहे. सहज मिळू शकते व स्वस्ताई पण आहे.

या इंदौर शहरातही मी पूर्वी येऊन गेलो होतो. पन्नास वर्षांपूर्वी. आता सर्वच नवीन वाटत आहे. या पूर्वीच्या मराठी संस्थांनी—राजधानीत व या निमाड प्रांतात मराठी लोकांची वस्ती तर खूपच आहे. या शहरात ती एक लाखावर आहे. आठवण केल्यास ओळखीची नावेही आठवतात; परंतु मुद्दाम कुणाकडे जाऊन भेटावे असे कोणी नाही. जायचे म्हटले तर काही तास हवेत. देवासकर गुरुजी आज उज्जैनीला होते. त्यांच्या गावी सहल आली आहे तेव्हा ते आता गायब होणार आहेत. ते उद्या दुपारी मुक्काम हलण्याच्या वेळी परत येणार आहेत, हे सहाजीकच आहे.

# मंगळवार दि. १७ फेब्रुवारी

❋ ❋ ❋ ❋ ❋ ❋ ❋ ❋ ❋ ❋ ❋ ❋

**श्री : तेरावा दिवस नेमावर (नर्मदा मंदिर)**

आज सकाळी इंदौरला सकाळी साडेआठला न्याहारी उरकून इंदौर शहर पाहायला म्हणून बाहेर पडलो. भाऊ पुरोहित, स्वामी आणि मी. पन्नास वर्षांपूर्वीचे मी पाहिलेले (आठवणी अर्थात पुसटच झाल्या आहेत) इंदौर कुठेच दिसत नव्हते. होळकरवाडा आता फारसा शिल्लक नाही. आगीच्या भक्षस्थानी पडला आहे. जैन मंदिराचा 'शिश महल' पाहिला. चकचकाट बराच होता. काचेवरील रंगीत कलाकुसर बरी वाटली. इथे आमचे सहप्रवासी प्रेम पुरोहित भेटले. आम्ही त्यांना आमच्याबरोबर घेत नाही म्हणून त्यांनी थोडी नाराजी प्रगट केली; परंतु एका रिक्षात तीनच माणसे बसू शकतात हे त्यांना समजावून सांगितले. त्यांचे समाधान अर्थात झाले नाही. तिथून लंबे (का बडे !) हनुमान मंदिर पाहाण्यास गेलो. शिडी लावूनच त्याच्या कपाळी शेंदूर लावावा लागेल इतका उंच. गीता मंदिर बघण्यासारखे आहे म्हणून सांगितले म्हणून तिकडे गेलो. कालच्या अन्नपूर्णा मंदिराचीच ही आवृत्ती. कालचे देखावे बरेचसे रामायणातील होते. हे महाभारतांतले आहेत. याशिवाय अनेक सरकारी इमारती ! त्यांत काय पाहायचे आहे ! म्हणून त्या जाताजाता रिक्षांतूनच बघितल्या. शेवटी कढईवाल्याकडे बसलो असता लक्षात आले की सकाळचा वेळ जवळ जवळ फुकटच गेला. वेळ फुकट असला तरी तो खिशाला महागच पडला होता.

काल-परवापासून या भागात आल्यावर आम्ही दुधाबरोबर एकएक भांगेची गोळी पण घेत आहोत. देवासकर सांगतात याने हुशारी वाटते, हुशारी काय ? मी नेहमीच हुशारीत असतो असे मला वाटत असते. पण खरं सांगायचे तर मला बरे आणि वाईट काहीच वाटत नाही. इतरांच्याबरोबर म्हणून घेतो आपली. दुधाचा आग्रह मात्र माझा. मला 'अल्सर'चा त्रास आहे. (होताच म्हणायचा.) त्यावर दूध हे मोठ्ठेच औषध आहे. शिवाय मला ते आवडते. चहाच्या ऐवजीही चालते. इतर दोघातिघा सोबत्यांचीही त्याला खुषीने मान्यता आहे. म्हणून आम्ही नेहमी दुधाची कढई शोधीत असतो.

भोजनोत्तर दुपारी दोन वाजता निघून आम्ही दिवसाउजेडी इथे नेमावरला पोचलो, येताना वाटेत जे जंगल लागले ते केवळ सागाचे होते. साग! फक्त साग! इथे नर्मदा मैय्याचे मंदिर आहे. या परिक्रमेत या स्थानाला एक विशेष महत्त्व आहे. नर्मदा मैय्याचे हे नाभिस्थान समजले जाते. आम्ही सडे पाच-सहाजण या मंदिरातच पथारी टाकून बसलो आहोत. लागूनच असलेल्या धर्मशाळेत बाकीची मंडळी उतरली आहेत खरी परंतु तिथे हवा उजेड फारच कमी आहे. आता रात्रीची अनेक मंडळी खोल्यांत झोपण्याऐवजी बाहेर व्हराड्यांतच आली आहेत आणि आता व्हरांडापण गच्च झाला आहे.

देवासकर म्हणाले, 'चला नदीवर स्नानाला जाऊ. आज संकष्टी आहे. चंद्रोदयानंतर जेवायचे आहे. तोपर्यंत अथर्वशीर्षाची आवर्तने करीत बसू.'

'चला. आम्ही सगळेच तयार झालो. या मिणमिणत्या प्रकाशात दहा वाजेपर्यंत आम्ही करणार तरी काय होतो? आज सर्वांनाच संकष्टीचा उपवास होता. म्हणजे उपवासाच्या अन्नपदार्थांशिवाय दुपारी दुसरा कोणता पदार्थ शिजलाच नव्हता. त्यांत तक्रार करण्यासारखेही काही नव्हते.

नदीवरून स्नान करून आलो; परंतु काळोखात गावही दिसला नाही अन् नदीही. नदीवर नदीच्या पात्रात एका खडकासारख्या (ते कुंड होते) जागेकडे बोट दाखवून देवास्कर म्हणाले 'ते खरे नाभिस्थान.' आम्ही 'हो' म्हटले. खरे म्हणजे स्पष्ट काहीच दिसले नाही.

एकूण दहाजण आम्ही आवर्तनासाठी बसलो होतो. त्यात चार स्त्रिया होत्या. स्त्रियांना संपूर्ण याज्ञिकी शिकविण्याचे वर्ग पुण्यास सध्या चालतात. त्यामुळे त्यांत आश्चर्य असे वाटले नाही. परवा मचव्यात (समुद्र प्रवासात) मराठे आजींनी श्रीसूक्त म्हटले होते. दहा वाजता जेवायची पाने मांडल्यावर आम्ही आवर्तने संपविली. बरीच झाली होती; पण पुरी सहस्र नक्की नव्हती. काही सहप्रवाशांनी आम्हास दक्षिणा देऊ केली. अखेर आग्रहाखातर आम्हास ती घ्यावी लागली. आम्ही सांगून पाहिले की अहो! आमचे पुण्य तेवढे कमी नाही का होईल? अखेर दक्षिणा घेतली, तरी फारसा पश्चात्ताप करण्याची पाळी आली नाही. कारण दक्षिणा फारच माफक मिळाली होती. आमचे पुण्य फारसे कमी झाले नव्हते.

नर्मदा मंदिरातच गर्भगृहासमोरचा रस्ता सोडून आम्ही आमच्या पथाऱ्या पसरल्या व झोपण्याच्या बेतात असताना पुजाऱ्याने आमच्या भेटीसाठी दोन उत्तर भारतीय स्त्रिया 'पैदल परिकम्मा'वाल्या आणल्या. त्यांनी ठराविक साच्याची

माहिती सांगितली. म्हणाल्या, 'आम्ही अशा अशा जात होतो. तो अकस्मात समोर एक मोठी 'खाई' आली. आम्हाला काही आधीपासून ती दिसली नाही. आम्ही मैय्याचे (देवीकडे हात दाखवून) स्मरण केले आणि एक बाई आमच्या समोर आली. तिने हाताला धरून आम्हाला नीट वाटेला लावले आणि ती नाहीशी झाली. मग आमच्या लक्षात आले 'आरी! यह तो मैय्या थी.' असे आम्हाला रेवामैय्याचे दर्शन झाले. असल्या ठरीव साच्याच्या कथा सांगणारे मधून मधून प्रवासात भेटतातच. उतार वयात पायी प्रदक्षिणा करायला निघाल्या होत्या त्याबद्दल आम्हास विशेष वाटले. कारण काय म्हणून विचारले तर म्हणाल्या 'परिकम्मा, सर्वपापहारिणी और मोक्षदायी है, यह बात तो भृगु ऋषीच सांगून गेलेत.' भृगु नंतर कपिल पुराण सुरू होईल या धास्तीने मी म्हटले, 'अरे भई ग्यारह बज गये, अब बाकी कल सुनेंगे।' आमच्या काही सहप्रवासी बायकांनी त्यांना दोनदोन रुपये दिले. त्या बिचाऱ्या गेल्या. काही मंडळी बारा महिने तेरा काळ कुठल्यातरी यात्राच करीत असतात. तशापैकी तर या नसाव्यात ना, असा एक विचार मनात येऊन गेला.

या भागात जवळपास कुठेतरी नर्मदातीरी धावडीकुंड नावाचे गाव आहे. येथे नदीच्या प्रवाहात अनेक कुंडे आहेत. या कुंडांतील पाण्यात हात घातल्यास बाण (शिवलिंग) हाताला लागतो. तो पूजेसाठी अनेक यात्री घेतात अशी माहिती मिळाली.

# बुधवार दि. १८ फेब्रुवारी

❊ ❊ ❊ ❊ ❊ ❊ ❊ ❊ ❊ ❊ ❊ ❊

श्री : चौदावा दिवस जबलपूर

आज सकाळी नेमावरला बहिर्दिशेलाच सर्व दिशा होत्या. स्नानार्थ नदीवर गेलो. काल संध्याकाळच्यापेक्षा जरा खालच्या बाजूला ! तिथे घाटबीट नव्हताच; पण नदीकाठी उघडाच कां होईना पण एक मंडप होता; परंतु कपडे ठेवण्यासाठी आणि नदीत उतरण्यासाठी बरी जागा होती. स्नानोत्तर सिद्धेश्वर महादेवाच्या शंकराच्या देवळात गेलो. देऊळ छान बांधले आहे. जुनी शिल्प-मूर्तीकला मला आवडली; परंतु एकूण देवळाला देखभाल नव्हती. स्थानिक सेवेकऱ्यांनी स्वच्छता बरी ठेवली होती; परंतु एकूण देवळाला दुरुस्तीची जरूरी होती. तिच्या अभावी काही वर्षांत पडझड आणखी होऊन मूर्ती चोरीससुद्धा गेलेल्या असतील. चोरीस जाण्याच्या योग्यतेच्या त्या आहेत. पूर्वी नेमावर, देवास संस्थानात मोडत होते. तेव्हा मंदिर चांगल्यास्थितीत होते म्हणतात. संस्थाने खालसा झाल्यावर या मंदिरांना कुणी वाली उरला नाही.

चिन्मयाश्रम नावाच्या जरा उंचावर असलेल्या एका मठात गेलो. मठाधिपती कुणी महाराष्ट्रीयच आहे. सांगलीकडील गाडगीळ किंवा अशा काहीतरी नावाचे ! पूर्वी चार्टर्ड अकौन्टटंट होते. गेलो तेव्हा कुणाशी बोलत नव्हते. फक्त दर्शन देत होते. तेथील एका आश्रमवासीयाने सांगितले दुपारी आलात तर बोलायला मिळेल. आम्हाला ते शक्य नव्हते. आम्ही आताच न्याहारी करून निघणार होतो. या नदीकाठाशिवाय नेमावर गाव म्हणजे आणखी काही वस्ती आहे किंवा काय हे कळायला काही मार्ग नाही. या अशा बांधीव प्रवासात तुमची पुष्कळ पाहायची इच्छा असली तरी पाहाता येत नाही असे आणखी काही ठिकाणी होणारच आहे.

दुपारचे भोजन, बुधनी (बहुतेक) गावाच्या बाहेरील एका शंकराच्या देवळात झाले. येताना कालचे सागांचे जंगल लागलेच; परंतु जबलपूर शहरात पोहोचेपर्यंत वाटेत एकही मोठे गाव लागले नाही. वाहने भेटली तीही एका हाताच्या बोटांवर मोजता येण्याइतकीच. मधूनमधून पाऊस मात्र येत होता. सभोवती मोठी वनश्री होती असेही नाही. मोठा कंटाळवाणा प्रवास ! दिवे लागणी झाल्यावर जबलपूरमध्ये शिरलो आणि मंगल कार्यालयात येईपर्यंत दोन तास रात्र झाली होती. दत्तमंदिराच्या आवारातील हे एक मंगल कार्यालय आहे.

# गुरुवार दि. १९ फेब्रुवारी

❋ ❋ ❋ ❋ ❋ ❋ ❋ ❋ ❋ ❋ ❋ ❋ ❋

श्री : पंधरावा दिवस जबलपूर

आजचा सबंध दिवस मुक्काम इथेच होता. काल निजायला उशीर झाला होता. तेव्हा आजचा दिवस जरा उशीराच सुरू झाला. पहिला चहाच सहा वाजता झाला. तरीसुद्धा न्याहारी आटोपून नऊ वाजता भेडाघाटला घाटावर स्नानासाठी पोहोचलो. प्रत्यक्ष स्नानाचा घाट आहे तिथे पात्र रुंद होते; परंतु तिथे ज्या बाजूने प्रवाह आला होता तो मैलभर भाग अत्यंत अरुंद आणि त्यामुळे खोल आहे आणि त्या पलीकडे धुवांधार.

हेच सर्व पाहाण्यासाठी, स्नान यथेच्छ उरकून कपडे वाळत टाकून व ते राखण्याचीही व्यवस्था केल्यावर आम्ही सहप्रवासी दोन मोठ्या नावांत बसून भेडाघाटचे संगमरवरी दगडाचे खडक पाहाण्यास पाण्याच्या प्रवाहाच्या उलट दिशेने निघालो. खोली जास्त असल्यामुळे ओढ फारच कमी होती. त्यामुळे वल्ही मारायला फार त्रास होत नव्हता.

दोन संगमरवरी दगडाच्या खडकांच्या रांगांतून आमची नाव चालली होती. काही ठिकाणी प्रवाह इतक्या अरुंद वाटेने वाहात होता की तिथे वानरे इकडून तिकडे उडी मारून जाऊ शकतात. म्हणून या ठिकाणांना 'बंदर कूद' असे अर्थपूर्ण नाव पडले आहे. खडक चांगल्या संगमरवरासारख्या दगडांचे आहेत पण म्हणून या खडकांतून संगमरवराची खाण काही पाडता येत नाही. ते इतके उत्तम प्रकारचे व विपुल प्रमाणांत उपलब्ध नाहीत हे त्याचे कारण. मधून मधून बाजूचे खडक पांढऱ्या, काळसर अगर निळ्या रंगाचे दिसतात. डोळ्यांना बरे वाटते; पण वाऽह वाह ! असे उद्गार काही निघत नाहीत. राजपुतान्यातल्या खाणींत दगड चकाकतात; पण सभोवताल अगदीच गद्य. प्रवाहात मध्येच एखाद दुसऱ्या ठिकाणी खडक वर आले आहेत. त्यावर कुणीतरी लहान अगर मोठी सांबाची पिंडी बसविलेली आढळते. त्या पिंडी अहिल्याबाई होळकरांनीच स्थापिल्या असे नावाडी सांगतात. खपून जाणारे हे नाव आहे एवढाच त्याचा अर्थ आपण घ्यायचा. काही ठिकाणी खडक हत्तीचे, गणपतीचे अगर हनुमंताचे आकार धारण करतात. ढगांत

नाही का आपण निरनिराळे आकार पाहातो त्यांतलाच हा प्रकार! पण त्यामुळे बडबड हे तोंडाचे जे पवित्र कार्य अशावेळी असते, ते चालू राहायला चांगली मदत होते. नावाड्यांना!

पाऊण तास, पन्नास मिनिटे हा जलप्रवास चालू होता. परत येऊन किनाऱ्यावर उतरल्यावर वाळत घातलेले कपडे गोळा करून पुन्हा आम्ही नाक्यावर मोटर-बसमध्ये बसलो. दहाच मिनिटे गाडी चालली असेल. तितक्यात ती थांबली. इथून आम्हाला अर्धाएक मैल नदीच्या कडेकडेने जाऊन धुवांधार गाठायचे होते. इथे नर्मदा शतमुखांनी खाली फेसाळत कोसळते. आम्ही उभे होतो तिथे तुषार उडत होते. काही पोरे प्रेक्षकांकडून पाच पाच रुपये घेऊन खालच्या फेसाळलेल्या पात्रात उडी घेऊन प्रेक्षकांची करमणूक करीत होती. माझ्या वयाच्या पंचविशींत मी ही गोष्ट सहज केली असती असा विचार मनात येऊन गेला. त्या विकतच्या कौतुकाच्या वाटेला आम्ही गेलो नाही. पाण्याच्या धारेचा धुव्वा उडविणारा हा धुवांधार अप्रतीम नाही तरी बघायला चांगला होता. अप्रतीम वगैरे शब्द वापरायची वेळ हिमालयात वारंवार येते. कोकणात आम्ही पावसाला 'धुवांधार' हे विशेषण लावतो.

इतरांपेक्षा चपळाई करून जरा 'फास्ट' निघालो आणि अड्ड्यावर येऊन पंजाबी लस्सी (तीन)ची ऑर्डर दिली. 'टावरणांत' ती लस्सी म्हणजे त्यावेळी आणि त्या ठिकाणी केवळ 'अमृत' होते 'अमृत'! आमच्या मागोमाग इतर सहप्रवासी आलेच होते आणि ते 'लिमका' आणि 'थम्सप' पीत होते. एक शतांश सुद्धां अन्नांश अगर पौष्टिकपणा नसलेली ती पेयें! लिमका आणि थम्सप!! हॅट! तामसी कुठले!! असे मनातल्या मनात म्हणत त्यांच्याकडून मी तोंड फिरवले आणि 'अमृता'चे घुटके घेत बसलो. तिथून उठल्यावर विचार आला की ती मंडळीही आम्हाला 'ताक' पिताना बघून काही म्हणत नसतील का? म्हणतही असतील! तुम्हाला 'ताक'वाल्यांना यांतली 'फन' आणि 'किक्' काय कळणार?

गाडीत बसलो आणि पुन्हा गाडी भेडाघाट नाक्यावर आली आणि थांबली. डाव्या हाताच्या पर्वती एवढ्या टेकडीवर चौसष्ट योगिनी—असलेल्या टेकडीवर जायचे होते. वर जायला चांगल्या पायऱ्या आहेत. वर मोठ्या प्राकारात एक शंकराचे देऊळ आहे. त्या देवळाच्या वर विस्तीर्ण अशी वर्तुळाकार बांधीव आगाशी आहे. या वर्तुळाकार जागेत एक एक दरवाज्याएवढ्या मोठ्या मेहरपीत

चौसष्ट योगिनींची स्थापना केलेली आहे. प्रत्येक मूर्तीचे ध्यान, वस्त्रालंकार व आकृतीबंध निरनिराळे. एकीसारखी दुसरी नाही. सगळे दुर्लक्षितच आहे. देखभाल अगर पूजाअर्चा कुणी करतेय असे वाटत नाही. क्वचित् पडझडही झालेली आहे. मोजून दहाच माणसे वरती आली होती. त्यांत फक्त चार बायका होत्या. या बघण्यात हिंडणे काय सकाळपासून थोडे का झाले होते? दमली असतील मंडळी! आता दुपारचा एक वाजायला आला होता.

चौसष्ट योगिन्यांच्या प्रकारातून समोर पंधरा-वीस मैलांच्या टप्प्याचा देखावा छान दिसत होता. धुवांधारचे दर्शन अस्पष्ट पण म्हणून सुंदर दिसत होते.

यात्रा कंपनीतर्फे जेवायला मेजवानी होती. गुलाबजाम व पुऱ्या! आता उद्या सकाळी निघेपर्यंत दुसरा काही आखलेला कार्यक्रम नव्हता. तेव्हा 'उदरभरणाचे यज्ञकर्म' फार आस्थापूर्वक प्रत्येकाने पार पाडले आणि मग दिली ताणून!

माझा व्यवसाय कागद पुरविण्याचा असल्यामुळे (आता तो फारच थोडा शिल्लक आहे) येथील विड्यांच्या कारखानदारांना कागद विकण्यासाठी म्हणून मी तीन चार वेळा जबलपूरला येऊन गेलो आहे; परंतु ते सर्व तीस वर्षांपूर्वी. येथे चार विडीवाले तर कोट्याधीश आहेत. म्हणजे ज्यांची एक कोट विडी रोज विकली जाते असे. तंबाखू, निपाणी व आनंदला पिकतो; परंतु तेंदूच्या पानाची जंगले इकडे मध्य प्रदेशमध्ये आहेत आणि मजुरी पण इथे स्वस्त. म्हणून विडी वळण्याचे कारखाने इकडे सर्वांत जास्त. त्यामुळे त्या क्षेत्रांतील व्यापारी परिचयाचे आहेत. आता त्यांचे मुलगे कर्ते सवरते असतील. यापैकी तीन चार तर ज्यांना स्नेही म्हणता येईल असे आहेत. मी भेटायला गेलो तर त्यांना नक्की आनंद होईल; परंतु त्यांचा तपास करीत करीत जायची मलाच उमेद नाही. तेव्हा आम्ही तिघांनी इथेच जवळपास फिरून यायचे ठरविले आणि जवळच्याच एका सार्वजनिक बागेत जाऊन बसलो. आम्ही उतरलो आहोत हा भाग अगदीच गलिच्छ आहे. तीन फुटी रुंदीच्या गटारांतून सर्वच प्रकारची घाण वाहात होती. नाक मुठीत धरूनच जावे लागत होते. सर्वच शहर असे झाले आहे किंवा काय कुणास ठाऊक! आम्ही बसलो आहोत या बागेत मध्यवर्ती वास्तूत कॉंग्रेस कमेटीचे ऑफिस आहे. बंदच होते. पण पाटी दिसली. क्रिकेट खेळणारी मुले आमच्या देखत खेळ थांबवून गेली. कारण आतां स्पष्टपणे दिसत नव्हते; परंतु आम्ही कंटाळा येईपर्यंत बसलो.

आठच्या सुमारास तास दीड तास रात्र झाली होती. मला जेवायचे नव्हते. म्हणून आरती, मंत्रपुष्प वगैरे आटोपल्यावर मी ही रोजनिशी घेऊन बसलो आहे.

जबलपूरला येऊन खजुराहो पाहिल्याशिवाय आम्ही जाणार आहोत. उद्या अमरकंटकला जाताना कटनी–मुखारापर्यंत तर आम्ही जाणारच आहोत. तिथपासून पुढे खजुराहोला जायचे असेल त्यांना तीन-चार तासांचा रस्ता आहे. आमची ही सहल धार्मिक प्रवृत्तीच्या माणसांसाठी आखलेली असल्यामुळे त्यांत खजुराहो बसत नाही.

नागड्या-उघड्या स्त्री-पुरुषांचे स्वर्गीय (अप्सरा–देव) कोरीव पुतळे तिथे आहेत; परंतु हे काही तिथे जाणाऱ्यांसाठी महत्त्वाचे कारण नाही. चंदेले रजपूत राजांनी ९५० ते १०५० या शंभर वर्षांत वसविलेली ही त्यांची राजधानी आहे. शेकडो अव्वल कलाकृतींचा खजिना येथे आहे. हा सांस्कृतिक ठेवा पाहाण्यासाठी मुख्यत: रसिक येथे जातात. येथील काही कलाकृती केवळ आशियातच नव्हे तर साऱ्या जगात श्रेष्ठ ठरलेल्या आहेत.

मुळांत येथे ८५ कला-वास्तू होत्या. त्यापैकी आता फक्त बाविसच शिल्लक आहेत. भेडाघाटप्रमाणे येथेही चौसष्ट योगिन्यांचे मंदिर आहे. याशिवाय मातंगेश्वर, लक्ष्मण, कंदारिया महादेव, चित्र-गुप्त, शंकर आणि विष्णु यांची मंदिरे तसेच जैनांचे पार्श्वनाथाचे मंदिर आहे. पुराणवस्तूंचे 'म्युझियम' हेही वैशिष्ट्यपूर्ण आहे. हे सर्व पाहाण्यास कमीतकमी एक दिवस पुरा पाहिजे. अश्लील समजल्या जाणाऱ्या कोरीव मूर्तींना बिचकण्याचे कारण नाही. कोनार्क, जगन्नाथाचे मंदिर, यासारख्या अनेक महत्त्वाच्या देवस्थानांवर सुद्धा त्या मुबलक प्रमाणावर आहेत. त्यांचे काही प्रयोजनही आहे.

उदईक अमरकंटकला जायचे आहे. ते एक या प्रदक्षिणेतील महत्त्वाचे, तसेच इतर अनेक दृष्टीने महत्त्वाचे असे स्थान आहे. म्हणून त्या ठिकाणी पोहोचण्याची पण एक उत्कंठा लागून राहिली आहे.

# शुक्रवार दि. २० फेब्रुवारी

❊ ❊ ❊ ❊ ❊ ❊ ❊ ❊ ❊ ❊ ❊ ❊ ❊

**श्री : सोळावा दिवस अमरकंटक (टूरिझम कॉटेज)**

आज तर लवकरांत लवकर निघण्याचा विक्रमच झाला, पहाटेस साडेतीन वाजता पहिला चहा झाला आणि स्नानासह सर्व प्रातर्विधी आटपून, सामान बांधून ते मोटरच्या टपावर साडेपाच वाजता चढले सुद्धा. प्रत्यक्षात सहा वाजता आमच्या मोटरबसने जबलपूर सोडले. पाचपंचवीस मैल गेल्यावर सूर्योदय झाला. अलाहाबादला जाणाऱ्या सातव्या क्रमांकाच्या राजरस्त्याने आम्ही कटनी-मुरवाराकडे निघालो होतो. आजचा पल्ला आजपर्यंतच्या पल्यांत सर्वांत मोठा. अडीचशे किलोमीटरच्याही वर! म्हणून तर निघण्याची एवढी घाई केली होती. गाडी चालू असतानाच आम्हाला न्याहारीची पाकिटे मिळाली होती. गप्पा व न्याहारी दोन्ही कामे चालू होती आणि सिहोरा गावच्या वेशीवरच एका 'बादशाही' का 'राजेशाही' नावाच्या 'टावरणात' चहा (स्पेशल) झाला. बाहेरगावी स्पेशल चहा म्हणजे तो दुधाचा असतो. त्यामुळे लज्जतदार लागतो. चांगला एक एक 'गिलास' भरून प्रत्येकाने घेतला.

कटनी हे रेल्वे (जं.) व मोठे जिल्ह्याचे गाव आले आणि गेले. पंधरा मिनिटे या गावातून गाडी जात होती. उद्योगधंदे, कारखान्यांचे असे मोठे गाव होते. गाडी इथे थांबायची नव्हती. आजचा सर्वच प्रवास बाघेलखंड हे पूर्वी नाव असलेल्या प्रांतातून व्हायचा होता. आतापर्यंतचा प्रवास उत्तरेकडे होता. इथे गाडी दक्षिण-पूर्वेकडे वळली. बाराच्या पुढे उमरिया या खेडेवजा गावाच्या अलिकडे असलेल्या एका शंकराच्या मंदिरात जेवणासाठी गाडी थांबली. शिवरात्र जवळ आल्यामुळे देवळात थोडी रंगरंगोटी झाली होती. आरती, मंत्रपुष्प होऊन भोजनाचा कार्यक्रम 'संपन्न' झाला. हल्ली सर्व कार्यक्रम, स्मशानातला दहनविधीसुद्धा, आपले 'संपन्न' होतात! मला मात्र जेवण झाल्यावर खरे आपण 'संपन्न' झालो असे वाटले.

अशी 'शिवमंदिर' भोजने आमची आतापर्यंत पाच-सहा तरी झाली होती; परंतु त्यांतील गंमत अद्याप संपली नव्हती. आरती, मग ओरडण्याची चढाओढ लावून म्हटलेले 'देवे', मग 'वदनी कवळ' आणि शेवटी 'यन्तु नदयो वर्षन्तु'

झाल्याशिवाय जेवण सुरू होत नसे. ज्यांना या विधींमध्ये रस नव्हता असे आमचे सहप्रवासी जेवण वाढलेले असले तरी सर्व मंडळी येऊन बसल्यावरच 'हरहर महादेव' झाल्याशिवाय जेवायला सुरुवात होत नसे. धार्मिक भावना हा समान 'फॅक्टर' होता. त्यामुळे ही शिस्त दिसत होती. या सर्व शिस्तीमुळे म्हणा किंवा भूक लागायच्या वेळीच अन्न मिळत असल्यामुळे जेवण चविष्ट लागे.

दुपारी स.डेतीनच्या सुमारास शहाडोल या जिल्ह्याच्या गावी गाडी दुपारच्या चहासाठी थांबली. तेव्हा मला 'चारोळ्या' या वस्तूची आठवण झाली. माझा एक नातेवाईक पूल बांधण्यातला दर्दी इंजिनियर आहे. तो इकडे बरेच वेळा येऊन 'साईट'वर राहात असे. त्याचे म्हणणे, इकडे चारोळ्यांच्या झुडपांची रानेच्या राने आहेत. म्हणून इकडे चारोळ्या स्वस्त असतात. म्हणून उतरल्यावर प्रथम दोन दुकानी चौकशी केली. हेतू असा होता की त्या जर खरोखरच पाच-दहा रुपये किलो असल्या तर दोन किलो घेऊन आपल्या चार इष्टमित्रांकडे भेट म्हणून देऊं; परंतु त्या इष्टमित्रांचे कौतुक माझ्या नशिबी नव्हते. चारोळ्या ऐशी रुपये किलो होत्या. तरी मी आशा सोडली नव्हती. अमरकंटला आपण जातोच आहोत. दोन दिवस त्या जंगलातच मुक्काम आहे ना? मग आपण चक्क झुडुपांखालून चारोळ्या वेचूनच आणूं. माझ्या शेजारच्या भाऊ पुरोहिताला ही गोष्ट सांगितली. तेव्हा त्याने म्हटले होते, 'आबा! हे तुमचे मनातले मांडे मुंबईला तुम्ही जाईपर्यंत मनातल्या मनातच राहाणार आहेत.' भाऊ पुरोहित जरा व्यवहारी होता. जमिनीवर पाय रोवून चालत असे. आमचे कधी कधी अधांतरी (पाय) होत असत. हो! आणि मी साने मावशींजवळ पण याबद्दल जबलपूरला बोललो होतो. तेव्हा ती पण म्हणाली होती, 'मला पण एक पायलीभर तरी पाहिजेत हो!' आणि मीही 'नक्की घेतो हं' म्हणून म्हणालो होतो.

मात्र इथे मिठाई बिठाई बरी वाटली. चवीला आणि भावाला पण. बत्तीस रुपये किलो. आज आरतीला प्रसाद आमचा होता. म्हणून दोन आरत्यांना पुरेल इतकी मिठाई आम्ही घेऊन ठेवली.

पाचच्या सुमारास आम्ही म्हणजे आमची गाडी एका किर्रर जंगलांतून जाऊ लागली आणि जरा पुढे जातोय तो चक्क—'किरर' या नावाची जंगलाची पाटीच लागली. हा मराठी 'किर्र' शब्द इकडे हिंदीत कसा आला? पण त्या 'किर्र' जंगलात हे विचारणार कुणाला? जंगलात साग आणि ऐन होतेच; परंतु इतर वनस्पतींची नावे गाडीतून पाहून सांगता येण्यासारखी नव्हती. कारण कोकणातील बदामांच्या

झाडांची पाने, समुद्रफूल, बिब्बा, हरडा वगैरे झाडांची पाने सारखीच दिसतात. त्यात आणखी भर तेंदूची आणि महुवा, या दोन खास मध्यप्रदेशीय झाडांच्या पानांची भर पडत होती. आतां काळोख पडत होता त्यामुळे 'वनस्पती शास्त्रातील मौलिक संशोधने सोडून द्यावी लागली होती.

आता गाडी पठारावर आली होती. अमरकंटक हे पाच-पन्नास मैलांचे पठारच आहे असे ऐकून होतो. तेव्हा अमरकंटक आलेच असे वाटू लागले. पुढे मोठे गावही दिसू लागले; परंतु जवळ जातोय तो एका पाटीवर गावाचे नाव राजेन्द्र नगर असे लिहिले आढळले आणि गाव संपले तेव्हा दुसरी एक पाटी लागली. त्यावर लिहिले होते की, अमरकंटक तिथून वीस किलोमीटर आहे.

अ.ता गाडीचे हेडलाइटस् लावावे लागले आणि गाडी रस्ता काटू लागली. अमरकंटला आल्यावरही जिथे आमचा मुक्काम व्हायचा होता त्या टूरिस्ट कॉटेजेस शोधून काढाव्या लागल्या. आम्हाला जी जागा 'फ्लॅट', कुलूप उघडून दिली ती झक्क होती. कारण सिंगल रूम्स् संडास-बाथरूम ॲटॅच्ड! शिवाय नळाला हवे तितके, 'कूऽल' पाणी, परंतु एक एक करून आत आलो तेव्हा आम्ही सातजण झालो. अंथरुणे जास्तीत जास्त सहाच मात्र होती. अखेर देवासकर गुरुजींनी सांगितले की, मी आपला बाहेर झोपतो. ओटीवर! त्यांच्या अंगावर फक्त एक शाल अगर उपरणे असे. कमरेला धोतर एवढाच त्यांचा पोषाख असे आणि या पस्तीसशे फूट उंचीवरही त्यांना पांघरायला फक्त शालच पुरणार होती या थंडीच्या दिवसांत. तात्पुरता तरी प्रश्न सुटला, म्हणून आम्ही निःश्वास सोडला.

आता रात्रीचे जेवण इथे पहिल्यापासूनच तयार व्हायचे होते. वेळ लागणारच होता. म्हणून जरा बाहेर आलो आणि पुन्हा आत गेलो, गरम स्वेटर आणायला. थंडीचे दिवस होतेच. शिवाय आम्ही पस्तीसशे फूट उंचीवर आलो होतो. तेव्ह थंडीचा कडाका चांगला होता. जे जे म्हणून गरम (कपड्यांमध्ये) होते त्याचा इथे चांगला उपयोग झाला.

यथाकाल आरती, मंत्रपुष्प होऊन 'आमचा' प्रसाद वाटला गेला. प्रसाद एकूण कमी दिसत होता. कुणीतरी त्यातला काढून घेतला होता. कोण असावा हे आमच्या तिघांच्या लक्षांत आले; पण आम्ही वाच्यता केली नाही. क्षुल्लक बाब होती; परंतु त्यातही क्षुद्र मनाचा कुणी तरी होता.

# शनिवार दि. २१ फेब्रुवारी

❊ ❊ ❊ ❊ ❊ ❊ ❊ ❊ ❊ ❊ ❊ ❊ ❊

**श्री : सतरावा दिवस अमरकंटक (टूरिस्ट कॉटेजेस्, कपिलधारातीर्थ मार्ग)**

आज उठल्याबरोबर कुठे धावायचे नव्हते. तेव्हा तोंडात ब्रश धरून आम्ही, तशीच शेजारच्या फ्लॅटमधील मंडळी हिरवळीवर जमलो होतो. आमच्या मुक्कामा-समोरच दिसतोय हा 'कपिलधारा' मार्ग. डांबरी पण एकेरी. त्याच्या पलीकडल्या बाजूला झुडपे दिसतायत. त्यांच्या पलीकडे वाहाते ती रेवा मैय्या. इथून दगड फेकला तर त्या पाण्यात जाऊन पडेल. ही सर्व माहिती टूरिस्ट कॉटेजेस्च्या शेजारच्या इमारतीत राहाणारे कर्मचारी आम्हाला सांगत होते. त्यांनी असेही सांगितले की, तुम्ही एवढी गर्दी करून राहिलांत तशी राहाण्याची जरूरी नव्हती. आणखी खोल्या तुम्हाला मिळाल्या असत्या. प्रत्यक्ष शिवरात्रीला इथे गर्दी असते. त्याला तर अजून आठवडाभर अवकाश आहे. हे ऐकल्यावर आम्ही एकमेकांकडे पाहून डोळे मिचकावून फक्त हसलो आणि फेसाने भरलेले तोंड धुण्यासाठी निघून गेलो.

आज न्याहारी आटपून स्नानाला कपिलधारा तीर्थ येथे जायचे होते. बस निघाली आणि पाचच मिनिटांत थांबली. पाण्याच्या प्रवाहाच्या एका वांकणापाशी थांबली. कारण हा प्रवाह म्हणजे साक्षात् रेवा मैय्या होती. आम्हा परिक्रम्मा-वाल्यांना ती ओलांडायची नव्हती. तो चाळीच्या गॅलरी एवढा, एवढासा प्रवाह सायकलवाले सुद्धा खाली न उतरता पलीकडे जाऊ शकत होते. आमची मोटर बस आणखी दोनच मिनिटे त्याच रस्त्याने पुढे गेली असती तरी तिने आम्हाला कपिलाधारा तीर्थाच्या धारांजवळ नेऊन सोडले असते; परंतु आम्ही व्रती होतो. व्रतींनी प्रवाह न ओलांडता उजव्या हाताची एक लहानशी टेकडी काटेकुटे बाजूला सारीत चढायची होती. तीच पुन्हा उतरायची होती. तेव्हा कुठे कपिल मुनींच्या फक्त आश्रमाशी पोचता येत होते आणि त्याच्या पुढे पन्नासएक पायऱ्या उतरल्यावर पडणाऱ्या धारा फक्त दिसत होत्या. प्रत्यक्ष स्नानासाठी आणखी एक लहानसे दिव्य करायचे होते. हत्तीएवढ्या दोन तीन, पाय ठरत नाही अशा वाटोळ्या खडकांवरून, वाहात येणाऱ्या धारेपर्यंत पोहोचायचे होते.

डाव्या हाताला समोर पंचवीस-तीस फुटांवरून दोन ओंजळी एवढ्या रुंद धारा खाली कोसळत होत्या आणि आम्ही स्नानासाठी उतरलो होतो तिथे म्हणजे चार ढेंगा पुढे, ढोपरभर पाण्याचा प्रवाह बनून पुढे वाहात गेला होता. सोपी जागा 'आजी' मंडळींसाठी सोडून आम्ही जरा वर जाऊन स्नान केले. पलीकडील तीरावर सुके कपडे ठेवले होते ते हात लांब करून घेत होतो आणि पुन्हा आपापसांत एकमेकाला बजावीत होतो. 'मी फक्त हात लांब करून पलीकडे ठेवलेले कपडे तेवढे उचलले आहेत. पलीकडल्या तीरावर पाय ठेवलेला नाही हं!' प्रत्येकजण डोळे मिचकावीत हेच दुसऱ्याला सांगत होता आणि आपले' हे सांगणे तिसरा कोणी ऐकतो आहे की नाही हे वाकडा डोळा करून पाहात होता.

त्या धारा एवढ्याशा, त्यांचा प्रपात एवढासा; पण समुद्राच्या गाजेसारखा आवाज मात्र त्या निमुळत्या दरीत घुमत होता. त्या गाजेमुळे एकूण वातावरणाला, त्या ठिकाणाला गांभीर्य येत होते. डोंगर चढतानापेक्षा तो उतरतांनाच त्याचे खरे स्वरूप कळत असते. आता आम्ही आल्या वाटेनेच परत जात होतो. पायऱ्या चढून वर आल्यावर कपिल मुनींच्या, सांख्य तत्वज्ञानाच्या त्या प्रणेत्याच्या आश्रमात जावेसे वाटले. आश्रमात मुनींच्या शिवाय दुर्गा आणि भैरवाच्या मूर्ती आहेत. पुढे पुन्हा टेकडीची चढउतार करायची होती. जंगलात साग, ऐन, हिरडा, बिब्बा, तेंदू, महुवा हे अपेक्षित वृक्ष होतेच शिवाय झुडुपांमध्ये टणटणी आणि अडुळसा ही विशेष होती. अडुळसा तर चिखलदऱ्यासारखा अगदी माजला होता. सह्याद्रीपेक्षा विंध्याद्रीचे हे जंगल फारसे निराळे वाटले नाही. हिमालयात अगर निलगिरीत तसा तो भासतो, निराळेपणा!

दुपारी भोजनोत्तर बाकीच्यांचा 'राष्ट्रीय' (?) कार्यक्रम चालू होता (वामकुक्षीचा). आम्हाला तिघांना काही चैन पडेना अमरकंटकेश्वराचे मंदिर तिथून एक-दीड किलोमीटरावर होते. तिकडे आम्ही जायचे ठरविले. निघालो आणि गेलोही. मुख्य मंदिराच्या आसपास शिवरात्रीच्या यात्रेसाठी रस्त्याच्या कडेला दुकानांसाठी कुठे कुठे टपऱ्या उभारण्याची तयारी चालली होती. शेवटी देवळाच्या समोरचा लहानसा पूल दिसला. तो ओलांडून आम्हास जायचे नव्हते. आम्ही अद्याप उत्तर तीर-वासीच होतो. दुधाची कढई कुठे दिसते का पाहात होतो; पण दिसली नाही; परंतु शेवटल्या 'टावरण'वाल्यांनी आम्हाला—एक एक 'गिलास' दूध द्यायचे कबूल केले. इथे आम्हाला एक मुंबईचा कामगार भेटला. मराठीत

बोलायला लागल्याबरोबर तो आमचा 'मुलुखवाला' झाला. चार गप्पा गोष्टी करायलाही अशा ठिकाणी कुणी मनुष्य मिळणे मुष्कील. आजूबाजूच्या मंडळींना गप्पा ऐकविण्यासाठी त्यांनी आमच्याशी मुंबई पुण्याच्या पंधराएक मिनिटे गप्पागोष्टी केल्या. तेवढाच त्याने आपला भाव वाढवून घेतला.

परतत असताना दोन पाट्या दिसल्या. जातानांही आम्ही त्या बघून ठेवल्या होत्या. गुलबकावलीची फुले व ताटवे विकत मिळतील, अशा अर्थाच्या त्या पाट्या होत्या. उर्दू साहित्यात या फुलाचे कौतुक केलेले असते अशी माझी ऐकीव माहिती होती. त्या नावाचा जुन्या जमान्यात एक सिनेमाही असल्याचे आठवले. तोपर्यंत माझी माहिती अशी होती की, 'आकाशपुष्प', 'उंबराचे फूल' त्यासारखेच दुर्मिळ नव्हे अप्राप्यच असे गुलबकावलीचे फूल होते; परंतु इथे ते प्रत्यक्ष दिसणार आहे हे केवढे 'अहो भाग्य', असे म्हणून आम्ही ती पाटी असलेल्या आवारात गेलो. जरा वेळाने एक लहान मुलगी भेटली. तिला आमचे येण्याचे प्रयोजन सांगताच त्या मुलीने मागील वावरात जाऊन आणखी एका बाप्याला बोलावून आणला. त्यांनी आम्हाला तिथूनच्या ताटव्यातून एक फूलच काढून हातात दिले. फूल सोनटक्क्याच्या फुलासारखे वाटले; परंतु त्याचा वास घेता हे सोनटक्क्याचेच फूल आहे हे खात्रीने सांगता येईना. फुलांचे ताटवेही सोनटक्याच्या पानांपेक्षा मोठ्या म्हणजे कर्दळीच्या पानासारखे वाटले. सोनटक्का व हे झाड आणि फूल यांत काही फरक असेल किंवा नसेलही. मला माझ्याशीच नीट ठरविता येईना. वासही मंद सुगंधाचा असून तो सुवास सोनटक्क्याचाच असेही ठासून सांगता येईना. त्या झाडाची रोपे मातीत बांधून चार आठ दिवसांनी घरी गेल्यावर वाफ्यात लावली तरी चालतील असे विक्रेता पुन्हा पुन्हा सांगत होता; परंतु चार आठ दिवसांनी आम्ही घरी कुठे पोहोचणार होतो? आणि ते झाड मुंबईला आणून फार तर कुंडीत लावले असते. मुंबईत ते लावायला वाफे कोठून आणायचे? त्यापेक्षा आम्ही असे दुष्प्राप्य अप्राप्य 'गुलबकावली'चे फूल समक्ष पाहिले, जवळ बाळगले आणि त्याचा सुगंध उपभोगिला, असे सांगायला जास्त प्रौढीचे आहे असे वाटून ते ताटवे काही घेतले नाहीत. 'तुमच्या स्वप्नातही येणार नाही असे गुलबकावलीचे फूल मी याची देही याची डोळां पाहिले' ही प्रौढी मित्रमंडळींत मिरविणे हे आपल्या 'अहं'ला जास्त सुखावणारे वाटले.

येताना एका आश्रमात गेलो. जातानाच ठरविले होते की, येताना इथे जायचे. आश्रम स्वच्छ व बगीच्यामुळे आणि बगीच्यात असलेली काही कारंजी व पुतळ्यांमुळे आकर्षक वाटला, विद्यार्थी व गुरुजी भगव्या वेषांत होते. इथे कसले अध्ययन व अध्यापन चालते हे विचारायला कुणी स्वस्थपणे भेटत नव्हते. सायंकालीन पूजा व अर्चना वगैरेंच्या धांदलीत प्रत्येकजण होता. आम्हाला यायला उशीरच झाला होता. जरा बागेत हिंडून बाहेरच पडलो. चकचकीत पानांचा एक 'वृक्षविशेष' पाहिला. जाणाऱ्या एका स्थानिक वाटणाऱ्या माणसाला त्याचे नाव विचारले. त्याचे नाव त्याने 'सराई' असे सांगितले. टूरिस्ट कॉटेजवर गेल्यावर थेट आमच्या खोलीत न जाता शेजारच्या आवारातील 'रामकृष्ण मिशन' आश्रमात गेलो. झटपट रिकामा आश्रम पाहून घेतला. ध्यान मंदिरात प्रत्यक्ष भजनाऐवजी भजनांची कॅसेट रिकाम्या हॉलमध्ये वाजत होती.

अमरकंटक या स्थानाचे माहात्म्य आपण बरेच वेळा ऐकतो. हे तीन प्रकारचे असते. पौराणिक व ऐतिहासिक स्थळ–विशेष म्हणून आणि तिसरे हवेशीर ठिकाण म्हणून उज्ज्वल भविष्य असलेले स्थळ म्हणून; कारण याची उंची पस्तीसशे फूट असून पन्नास-साठ चौरस मैलांचे क्षेत्रफळ असलेले हे पठार आहे. हवा पाणी उत्तम! पाण्याची सोय भरपूर! जलाशय, तलाव आहेतच. शिवाय इथे चार नद्यांचे उगम होतात. नर्मदा, शोण-भद्र, रुद्रगंगा (हिलाच पुढे माही नाव मिळालेले आहे.) आणि चौथी ज्वालावती. हा मैकल पर्वत आहे. विंध्य व सातपुडा यांच्या उशागती हा आहे. मजबूत घट्ट अशी जमीन आहे. हिमालयासारखा हा कोवळा तरुण नाही आणि हिमालयाप्रमाणे याची शिखरे वालुकामय म्हणून कच्ची पण नाहीत.

पौराणिक कथा पुष्कळच असतात. सरधोपट जी आहे तेवढीच पाहूया. नर्मदा गंगेसारखीच स्वर्गातून पृथ्वीवर उतरली. राजर्षी पुरुरवा याच्या तपानुनयामुळे नर्मदा पृथ्वीवर यायला तयार झाली; परंतु तिचे अवतरण व्हायचे कसे? स्वर्गातून प्रवाह पृथ्वीवर पडेल तेव्हा त्या प्रपाताचे अवतरण सोसण्याचे बळ कुणापाशी असणार? अर्थात भगवान् शंकरापाशीच फक्त. त्यांनी कबूल केले एकदाचे; पण हा प्रपात पृथ्वीवर कोठे व्हावा म्हणजे जमीन फाटणार नाही! मैकल पर्वताने हे आव्हान स्वीकारले. शिवशंकराने आपल्या जटा मैकलावर पसरल्या आणि त्या जटांवर, मैकल पर्वतावर-नर्मदा अव-तरली. इथून ती पश्चिम वाहिनी होते व शेवटी सिंधुसागरात, १३०० कि. मी. अंतरावर, विलीन होते.

शंकराने तिला जन्म दिल्यामुळे तिला आपली मुलगी—कन्या मानले. तिच्या माहेरवासाकरिता या १३०० कि. मी. अंतरांत अमर कंटकेश्वरापासून तर शेवटी विमलेश्वरापर्यंत अनेक माहेरघरे निर्माण करून तिचे रक्षण केले.

पुराणापेक्षा इतिहास जास्त विश्वसनीय असतो. त्याला पुरावे असतात आणि मुख्य म्हणजे त्यांत अतिमानुष काहीही नसते. शंकराचार्यांच्या वेळेपासूनचे पुरावे इथे आहेत; परंतु त्या पेक्षांही गेल्या दोन-तीनशे वर्षांच्या काळातीलच इतिहास आपण बघूं. सतराव्या-अठराव्या शतकात हे संपूर्ण पठार नागपूरकर भोसल्यांच्या ताब्यात होते. त्यांच्या राज्यात ते मोडत असे. त्याकाळी सुद्धा तेथील मुख्य मंदिर म्हणजे अमर कंटकेश्वर आणि नर्मदा मंदिर हे जोड मंदिरच होते. या मुख्य मंदिराचे पुजारी शंकराचार्यांनी नेमलेल्या परंपरेतील एक दसनामी संन्यासी होते. त्यांचे भोसल्यांशी मतभेद झाले. म्हणून भोसल्यांनी या संपूर्ण क्षेत्राचा जीर्णोद्धार केला; तरी पण ते मुख्य मंदिर तसेच राहिले. सध्याचे नर्मदाकुंड त्यांनीच बांधले. जुने कुंड त्याच्या शेजारी अद्याप दिसतेच आहे. पुढे भारतात इंग्रजांचा वावर सुरू झाला. इंग्रजांनी भोसल्यांचा पराभव केला. त्यांत हे पठार पण इंग्रजांच्या हाती आले. इंग्रजांना या पठारी भागाचा तत्कालीन काही उपयोग नव्हता, म्हणून त्यांनी आपल्या स्नेही राजांपैकी एक रेवा संस्थानचे अधिपती, रेवानरेश यांच्या स्वाधीन ते केले. संस्थाने खालसा झाली सन १९४८ मध्ये आणि तेव्हापासून हे भारतात म्हणजे भारतातील मध्यप्रदेश राज्यात आहे. सध्या हे मध्यप्रदेशाच्या शहाडोल जिल्हा परिषदेच्या अखत्यारात आहे.

येथील मूळ वस्ती गिरीजनांचीच आहे. त्यात गोंड व बैगा या मुख्य जमाती आहेत. यांना नागरी जीवनाची स्पष्ट कल्पना नाही. पाऊस भरपूर पडतो, त्यामुळे ते थोडेसे भात पिकवितात. भाज्याही काढतात. शिवाय शिकारीचा शौक असल्यामुळे शिकार करून आपल्या आहारात भर घालतात. महुवाची दारू पिऊन नाचणे ही यांची करमणूक. इतर जिल्ह्यांप्रमाणे शहाडोल जिल्ह्याचे सरकार यांच्या उन्नती आणि विकासासाठी प्रयत्नशील आहे; परंतु प्रत्यक्षात फारशी काही सुधारणा सहज दिसण्याइतकी झालेली नाही. कै. हरि विनायक पाटसकर हे मध्यप्रदेशचे गव्हर्नर असताना त्यांच्या हस्ते येथे एक वन-महाविद्यालय सुरू झाले होते. त्यांतून बाहेर पडणाऱ्या स्नातकामध्ये काही गिरीजन असतात. या महाविद्यालयाचा दर्जा चांगला आहे असे म्हणतात.

या स्थानाचा योजनापूर्वक विकास झाल्यास हे एक अप्रतिम गिरीस्थान, हवा खाण्याचे ठिकाण म्हणून होईल. हवा पाणी तर उत्तमच आहे. इतर अनेक ठिकाणी म्हणजे सिमला, मनाली, मसुरी वगैरे ठिकाणी न आढळणारा सपाट प्रदेश येथे भरपूर आहे. तसेच तेथील ठिसूळ जमिनीमुळे विकासाच्या बाबतींत तिकडे ज्या समस्या उद्भवतात त्या इथे येणार नाहीत. एकूण पहाडी सौंदर्य स्थळांमध्ये योग्य विकास झाल्यास हे स्थळ राणीपद पटकावील. इतके भविष्यकालीन महत्त्व या स्थानाला आहे.

विमानांच्या पंख वगैरे भागासाठी लागणारे उत्तम अल्युमिनियम येथे सापडते. इतर अनेक खनिजेही इथे मिळतील. औषधी वनस्पती हा तर या पर्वताचा एक विशेष आहे. उद्योग म्हणून (विकास झाल्यास) वनस्पतीचा पुरवठा करणे हा धंदा इथल्या लोकांना एक उपजीविकेचे साधन होईल. 'ज्योतिष्मती' या नावाची एक दिव्य वनस्पती या जंगलात मिळते. तिचा योग्य तो विधिपूर्वक उपयोग केल्यास त्याने माणसाचा कायाकल्प होतो असे म्हणतात. दापोलीचे (रत्नागिरी) बाबा फाटक या गृहस्थांना तो उपयोग माहीत होता व ते त्या वनस्पतीच्या शोधात होते. हे एक गांधीवादी विधायक कार्यकर्ते होते. ते आता हयात नाहीत. नाहीतर त्यांनी यावर प्रयोग करून बघितले असते. हे स्थान जरा एका बाजूला पडते. तरीही या तीर्थक्षेत्री शंकराचार्य, कबीर वगैरे अनेक संत येऊन गेले.

प्रस्तुत स्थळ एका बाजूला आहे म्हणून याचा विकास होत नाही. असे असू नये. कारण जलद वाहातुकीच्या सोयी आता उपलब्ध होऊ शकतात.

# रविवार दि. २२ फेब्रुवारी

✻ ✻ ✻ ✻ ✻ ✻ ✻ ✻ ✻ ✻ ✻ ✻

**श्री :** **अठरावा दिवस** **दिंडोरी (मनीष हॉटेल)**

अमरकंटकच्या टूरिस्ट कॉटेजेस्मध्ये पहिला चहा पिऊन आणि खाकेतल्या पिशवीशिवाय इतर सामान मोटरवर चढविण्यासाठी देऊन आम्ही सर्वांनी तो मुक्काम सोडला. आज नर्मदेच्या उगमाला वळसा घालून आम्ही दक्षिण-तीर-वासी होणार होतो. दुपारी उशीरा अमरकंटक सोडून इथे येण्यासाठी निघणार होतो.

आमच्या मोटर बसने आम्हाला, काल आम्ही ज्या हॉटेलमध्ये दूध घेतले होते तिथपर्यंत आणून सोडले आणि मोटर बस आमच्या देखतच पुलावरून पलीकडे जाऊन थांबली. आम्ही डोंगराकडे निघालो. दहाएक मिनिटे माळ तुडविल्यावर 'माईका बग्गीया' या बागेत आलो. बाग म्हणजे इतर वनवृक्षांबरोबर तिथे फुलझाडेही होती. इथून फुले रोज देवळांत पूजेसाठी जातात. त्या माईनेच बहुतेक ही फुलझाडे लावली असली पाहिजेत; म्हणून भक्तिभाव असणाऱ्या या माईचे नाव या बागेला पडले असावे. चालता चालता आम्ही केलेला हा केवळ एक तर्क होता. चढउतार करीत अर्ध्या तासात आम्ही एका कुंडापाशी आलो; परंतु हे उगमाचे कुंड नव्हते. ते जरा वर होते. इथे एक करंगुळी एवढी पाण्याची धार एका गायमुखातून लहानशा स्वच्छ कुंडात पडत होती. गायमुखाच्या मागील बाजूस बांबूची व इतर रान झाडे होती. तीर्थ प्राशनानंतर या उगम स्थानाला वळसा घालून आम्ही पुढे निघालो. एका लहानशा टेकडीला वळसा घालून दुसरी एक लहानशी टेकडी चढायची होती. चढावावर आणखी दुर्बल सहप्रवाशांसाठी दोन मिनिटे थांबावे लागत होते. मजल दरमजल करीत चाललो असताना शोण नदीचा मनगटा एवढ्या जाडीचा प्रवाह वाटेत आला. उजव्या हाताच्या डोंगरातून हा प्रवाह येत होता.

आता मोटरबसवाल्याने मारलेल्या हाका (ध्वनिसंकेत) आम्हास ऐकू येऊ लागल्या. समोरची टेकडी चढल्यावर मोटर रस्ता होता. मंडळी भराभर चढू लागली. तरीही पहिला प्रवासी व शेवटला, यांत अर्ध्या तासाचे अंतर पडले. वर पोचल्यावर, खालून येणारी मंडळी व त्यांच्या भोवतालचे योजनापूर्वक वाढविलेले जंगल मिळून

देखणे दृश्य दिसत होते. अनेकांनी (अर्थात मीही) त्याची 'छबी खेचली'. मोटर-गाडी जिथे आम्हाला घेण्यासाठी म्हणून येऊन थांबली होती त्या तिठ्याचे नाव 'शोण मोड'. पिछाडीची तुकडी तर आल्यावर सर्वजण गाडीत बसून आम्ही नर्मदा कुंडाच्या शेजारी असलेल्या 'शक्तीपीठा'च्या पारावर आलो. इथे न्याहारी घेऊन नर्मदा कुंडावर स्नानासाठी निघालो.

डोंगरात ज्या उगमाला वळसा घालून आम्ही आलो ते स्थान तीर्थक्षेत्र म्हणून विकसित झालेले नाही. नर्मदाकुंड (नवे) हेच तीर्थक्षेत्र म्हणून मानतात असे दिसले. अमरकंटकेश्वर व नर्मदा मंदिर असे जे जोडमंदिर प्रसिद्ध आहे ते या कुंडाला लागूनच आहे. या कुंडातूनच नर्मदा जोड मंदिराच्या खालून पुढे गेलेली दिसते. आम्ही ज्या उगमापाशी गेलो होतो तेथील झरे या कुंडात येतात व इथून खरा प्रवाह पुढे चालू होतो. या कुंडापर्यंतच बहुतेक यात्रेकरू येतात. आम्ही जंगलात गेलो होतो तिथपर्यंत फारच थोडे यात्रेकरू जातात म्हणून यालाच मुख्य कुंड समजतात.

ज्यांनी ज्यांनी नर्मदा (जल) ओंकारेश्वराहून बरोबर आणली होती ती इथे या कुंडात सोडायची होती व इथून पुन्हा भरून घेऊन ती शेवटी जेव्हा आम्ही ओंकारेश्वरला पुन्हा पोहोचू तेव्हा तिथे पात्रात समर्पण करायची होती. तो विधी आणि स्नान-विधी करवून घेण्यासाठी यात्रा कंपनीने एक स्थानिक भटजीची योजना केली होती. आम्हाला तसले काही विधी करायचे नसल्यामुळे आम्ही चौघे (चौथे देवासकर गुरुजी) निराळेच पडलो. आठ मेहुणे व १६ अध्यापिका, मुख्या-ध्यापिका व उपमुख्याध्यापिका यांचा खूप मोठा असा गट व त्यात प्रेम पुरोहित, अवधूत वगैरेंची भर पडलेली होती. त्यांच्या समोरच्या पायऱ्यांवर गंगाविसर्जन, गंगाभरण, क्षेत्री स्नानसंकल्प, व्रतवैकल्ये, दान-पान-पूजन वगैरे विधी सुरू झाले. आम्ही स्नान उरकून देवासकरांच्या नेतृत्वाखाली 'म्हणण्याचा' कार्यक्रम चालू केला. पुरुषसूक्त, श्रीसूक्त, गणपती अथर्वशीर्ष, रुद्र, महिम्न एवढे प्रकार म्हणण्यात स्नानोत्तर एक तास गेला. ज्याला जे येत होते ते तो देवास्करांबरोबर म्हणत होता. मला देवास्करांचे एका बाबतींत कौतुक वाटत असे. जिथे यात्रा कंपनीने भटजी नेमला असेल तिथे दक्षिणेच्या आशेने ते कधीही लुडबुड करायला जात नसत. खरे म्हणजे ते एक विद्वान पढिक याज्ञिक होते. आमचे म्हणणे चालू असताना तिथे सानेमावशी आल्या. महिम्न तर त्यांनी अस्खलित म्हटले. त्यांचे एकूण पाठांतर भरपूरच होते.

या पवित्र कुंडात कपडे धुवायचे नसल्याने एका वस्त्राचे पिळे प्रत्येकाच्या खांद्यावर होतेच. आता मंडळींचे सर्व धार्मिक विधी आटोपले होते. कुंडा-सभोवतीच्या देवतांचे दर्शन व दानधर्म यासाठी मंडळी हिंडत होती. दान-दक्षिणा आमच्यापर्यंतही काहींनी पोहोचविल्या. दक्षिणा आमच्या बरोबर सानेमावशींनाही मिळाली; परंतु एवढे होऊन मागे मी म्हटल्याप्रमाणे आमचे फारच थोडे पुण्य कमी झाले (दक्षिणा घेतल्यामुळे). दक्षिणा मिळाल्यावर आशीर्वादाचे काम धंदेवाईका-इतके चोख आम्ही केलेले होते. त्यामुळे दक्षिणा दिल्या घेतल्याचे कौतुक कांकणभर जास्तच झाले. त्या कुंडाच्या सभोवती एकूण तेरा लहान मोठी देवळे आहेत. (१) विष्णु मंदिर, (२) यज्ञमंडपाजवळ भवानीमहादेव, (३) घंटेश्वर महादेव, (४) महात्रिपुर सुंदरी, (५) दुर्गा माता, (६) सिद्धेश्वर महादेव, (७) गौरीशंकर, (८) राम मंदिर, (९) मुरली मनोहर, (१०) एकादश रुद्र, (११) भवानी शंकर, (१२) आणखी एक राम मंदिर आणि (१३) अन्नपूर्णा मंदिर. याशिवाय एक अख्खी बाजू अमरकंटकेश्वर व नर्मदा या जोड मंदिराने व्यापलेली होती. तिकडेच आम्ही कुंडाची एक बाजू धरून निघालो. नर्मदा मातेच्या मंदिरात पोहोचल्यावर अनेक महिलांनी चुनडी, खण वगैरे अर्पण केले. देवीच्या समोर अमरकंटकेश्वर होता; परंतु तिथपर्यंत गेलो तर पुन्हा नर्मदा ओलांडल्यासारखे होईल; कारण देवळाखालून दोन देवतांच्या मधून नर्मदेचा प्रवाह वाहात पुढे चालला होता. अर्थात लांबून दर्शन होत होते. आम्ही आता सकाळच्या पारावर भोजनाला जाण्यासाठी परत फिरलो. तितक्यात थोडी वेळ मोडणारी एक घटना घडली.

देवळाबाहेर हत्तीचा एक लहानसा पुतळा उभा होता. त्याच्या पोटाखालून गेले तर मनुष्य अधिक पुण्य संपादन करतो असे समजले जाते. त्याच्या खालून जाऊन निघणे सरळ सडपातळ बांध्याच्या माणसाला फारसे कठीण नव्हते; परंतु आमच्या सहप्रवाशांपैकी एक भक्कमभट (स्थूल) त्या खालून जाण्यासाठी आडवे पडले आणि अडकले. हे लक्षात आल्यानंतर सभोवताली माणसे जमली. आम्ही सर्व होतोच. 'असा नीघ' 'तसा नीघ' वगैरे सूचना त्याला केल्या जात होत्या. एखाद दोन मिनिटे अशी गेल्यावर सभोवती जमलेल्यापैकी आणखी भक्कमभटच पुढे झाला. त्यांनी त्याला कमरेवर हात घालून धरला आणि एका बाजूला एकदा व पुन्हा दुसऱ्या बाजूला एकदा असा प्रत्येक वेळी एक एक गहूभर पुढे सरकावीत त्याला वीतभर पुढे काढले तोपर्यंत त्याच्या मायेच्या माणसांच्या तोंडचे पाणी

पळाले होते आणि मग काय भक्कमभट आपण होऊन पुढे येऊन उठला. त्याला पुढे काढणाऱ्याला हात जोडून त्याचे त्याने आभार मानले. भक्कमभट घाबरलेला मुळीच नव्हता. पण घामाने थबथबला होता. उलट म्हणू लागला, 'मी पुन्हा जाऊन दाखवू का? मला त्यातली खुबी आता कळली आहे.' त्याच्या मायेच्या माणसांनी त्याला पुढे ढकलला आणि आम्ही सर्वच सहप्रवासी मुक्कामाकडील वाट चालू लागलो.

मुक्कामाला म्हणजे शक्ती विद्यापीठाच्या पारावर आलो. जेवायला थोडा अवकाश आहे असे समजले. शक्ती विद्यापीठाचे दोन-तीन कार्यकर्ते तिथे होते त्यांच्याशी गप्पागोष्टी केल्या. त्यांनी तिथली उपयुक्त अशी माहिती सांगितली. शिवाय त्यांच्या विद्यापीठाच्या कोणत्या तरी समारंभानिमित्त निघालेली एक 'स्मरणिका' पण आम्हाला दिली. त्यातही स्थानिक माहिती बरीच मिळाली. तिथेच त्यांच्या बरोबर हिंडून जवळपासची स्थळे सुद्धा पाहिली. योगायोगानेच सहजासहजी एवढी माहिती मिळाली.

**कर्ण मंदिर :** राजा कर्णदेव याने हे मंदिर ९०० ते १००० वर्षांपूर्वी बांधले. बांधण्यातला उद्देश चार नद्यांचे उगम स्थान असलेला हा पठारी भाग वस्ती वाढून विकसित व्हावा. वस्तीला असे एखादे मंदिरासारखे सार्वजनिक स्थान पाहिजे असते. यावर अत्यंत कलापूर्ण असे दगडी कोरीव काम आहे. दुरुस्ती कधीही झालेली नाही तरीही ते अद्याप सुस्थितीत टिकून आहे. नर्मदा कुंडाच्या पलीकडेच हे मंदिर आहे.

**विष्णु मंदिर :** काळ्या पाषाणाचे हे मंदिर जवळच आहे. विष्णु या मुख्य देवतेच्या सभोवती लहान लहान अशा दशावताराच्या दहा मूर्ती आहेत. महर्षी भृगु याने श्रीविष्णु व महालक्ष्मी यांचा विवाह याच मंदिरात लावला होता अशी पुराण कथा आहे.

**श्रीपातालेश्वर महादेव :** प्रथम या पातालेश्वर महादेवाची स्थापना आद्य श्रीशंकराचार्यांनी केली होती; परंतु आज ते जे बऱ्यापैकी स्थितीत दिसत आहे त्याचे श्रेय मात्र कर्णदेवाचे आहे. यात हेमाडपंती आणि उडिया शिल्पकलेचा संगम दिसला. उडिया (ओरिसा) प्रांत येथून पलीकडेच आहे. तेव्हा उडिया छाप असणे साहजिक आहे. येथील लोकांचे हे मोठे श्रद्धास्थान आहे. एखादे गुरु-वासरू हरवले तर या महादेवाला नारळ फोडून ते शोधायला जातात व मग ते हमखास

सापडते अशी स्थानिक लोकांची श्रद्धा आहे. अशा अनेक गोष्टी येथे ऐकायला मिळतात. हेही मंदिर जवळच आहे.

नर्मदा कुंडाच्या जवळपासच्या वरील मंदिराशिवाय सांगण्यासारखी अशी दुसरीही काही स्थाने आहेत. आम्ही आणखी दीड-दोन दिवस तिथे राहिलो असतो तर तिकडे जाणे शक्य झाले असते. कारण तिथे पोहोचायचे म्हणजे पदयात्रेशिवाय दुसरा मार्ग नाही. त्यांच्याबद्दलची माहिती मिळाली ती अशी आहे.

**मार्कंडेय ऋषींचा आश्रम :** हा नर्मदा कुंडापासून फार लांब नाही. अलिकडेच पंचवीस एक वर्षांपूर्वी एका ब्रह्मचारी साधकाने येथे मंदिर व धर्मशाळा बांधली आहे. शेजारी जे तळे आहे त्यांत नेहमीच कमळे उगवलेली दिसतात. येथे एका वटवृक्षाखाली अंधाऱ्या रात्री कधी कधी उजेड दिसतो. तो ओल्या बुरशी आलेल्या लाकडांनी, बाहेर टाकलेल्या फॉस्फरसमुळे फेकलेला प्रकाशही असू शकेल. जंगल दाट असल्यामुळे इथे वन्य श्वापदांचेही दर्शन होते.

**शंभुधारा :** नर्मदा कुंडाच्या नैऋत्येस पाच-सहा मैलांवर घनदाट अरण्यात, सुमारे सव्वाशे फूट उंचीवरून घनगर्जनेसह हा प्रपात खाली कोसळतो. ज्याच्या मनाची बैठक आध्यात्मिक आहे अशा साधकास, साधनेसाठी हे स्थान योग्य वाटावे असे येथील वातावरण आहे; पण इथे राहायची सोय काही नाही.

**भृगुकमंडलु :** नर्मदा कुंडाच्या दक्षिणेस दोन मैलांवर हे सर्वांत रमणीय म्हणून समजले जाणारे स्थान आहे. खडकांतील एका विवरांत नेहमी पाणी असते. हा भृगु ऋषींनी येथे सोडलेला पाण्याचा कमंडलू असल्याचे समजतात. हे स्थानही वरीलप्रमाणेच आध्यात्मिक चिंतन, मनन व अभ्यास यासाठी आदर्श असल्याचे सांगतात.

इतर काही स्थाने प्रवासाच्या हकिगती सांगण्याच्या ओघांत येऊन गेलेलीच आहेत. प्राचीन काळी हा कलिंग देशाचाच भाग असल्यामुळे उडिया शिल्पकलेचे येथे दर्शन होणे स्वाभाविक आहे.

एक वाजल्याबर जेवणे आटोपली. थोडी विश्रांती घेऊन, (म्हणजे कर्मचाऱ्यांचे आटोपेपर्यंत) निघायचेच होते. काल रोजी कपिलधारांकडे जाताना गाडी जिथे थांबली होती तिथेच, परंतु प्रवाहाच्या या बाजूला आज गाडी थांबली होती व तिथपर्यंत आम्हा म्हाताऱ्यांना रानांतून चालत जायला तासभर वेळ लागणार होता. अंतर दोन मैलच असावे. तिथून प्रस्थान दिंडोरीसाठी ठेवायचे होते. ही दिंडोरी

अर्थातच नाशिक कडील नव्हे. बिनीची तुकडी आणि पिछाडी, मोटर बसपर्यंत पोचेस्तोवर, कालच्या सारखा आजही अर्ध्या तासाचा फरक पडला होता. भक्तिभावामुळे विचारी वयस्कर मंडळी कष्ट साहत होती. ही ताकद श्रद्धेची होती. मला पुन्हा पुन्हा (माझ्या ठिकाणी नसलेल्या) या धार्मिक श्रद्धेचे कौतुक वाटत होते. कारण एकूण श्रद्धा ही वस्तूच दुर्मिळ होत चालली आहे.

बसमधून जाताना रस्त्याच्या दुतर्फा किर्र रान होते. ऊन रस्त्यापर्यंत पोचतच नव्हते. एखादा वाघोबा, हरण, निदान सर्प अगर मुंगूस तरी दिसायला वातावरण आदर्श असे वाटत होते; परंतु मनुष्याच्या पूर्वजांशिवाय दुसरे काहीएक दिसले नाही. या शाखा मृगां—शिवाय रंगीबेरंगी पक्षीगण भरपूर होते. माणसांची, वाहनांची वर्दळ रस्त्यावर मुळीच नव्हती. घाट संपल्यावर अंजानिया या गावी चहा झाला. पाच साडेपाच पर्यंत दिंडोरी हे तहसीलीचे गाव आले. मनीषा हॉटेल हे राहाण्याच्या सोईचे एकच हॉटेल या गावी असावे. खोल्या इतक्या लहान होत्या की जास्तीत जास्त चारचजण इथे झोपू शकले असते. तेही चौथ्या माणसाचा बिस्तारा वाटेतच घातला तर. नळ संडास जोडून होता. खिडक्या मोडक्या अवस्थेत होत्या म्हणून बरे ! नाहीतर एवढ्याशा जागेत आम्ही चारजण गुदमरून गेलो असतो.

सामान लावून आम्ही गावात फिरायला निघालो. प्रथम जगदंबा मातेचे मंदिर लागले. लहानसे, टुमदार पण शोभिवंत ! हवा पावसाळी कुंद अशीच होती, बाजारात शेतमालाचा व्यापार बराच दिसला. दुधाची कढई दिसली आणि शांभवी गोळ्याही मिळाल्या. आज रात्री फुरसत अशी पुष्कळच मिळाली. म्हणून एवढ्या विस्ताराने लिहिता आले.

# सोमवार दि. २३ फेब्रुवारी

❊ ❊ ❊ ❊ ❊ ❊ ❊ ❊ ❊ ❊ ❊ ❊

**थी : एकोणिसावा दिवस महाराजपूर**

**(रपटा, छोटे दादा, गणेशरामजीकी–कांचका मंदिर)**

दिंडोरीहून सकाळच्या प्रहरी निघण्याची गर्दी नव्हती. जेवण जरा लवकर उरकून बारा वाजता दुपारी निघायचे होते. म्हणून पहिल्या चहानंतर बहुतेक सहप्रवासी नदीवर स्नानार्थ निघालो. झिम झिम पाऊस पडतच होता; परंतु त्याची फिकीर न करता सर्वजण आरामात फिरत होतो. प्रत्यक्ष नदीवर गेल्यावर अंगाला झोंबणारा वारा फिरण्यातली गम्मत घालवीत होता. नदीवरही जी थोडीशी जागा स्नानासाठी सोयिस्कर अशी होती ती महिलांनी व्यापली होती. काही महिलांनी आपापल्या यजमानाचीही त्यातच सोय करून दिली. नदीचे पात्र खूप रुंद; परंतु सगळे निसरड्या शेवाळलेल्या दगडांनी आणि खडकांनी भरलेले. अखेर आम्ही काही मंडळी खालच्या बाजूला नदीला लहानसा चुनेगची बांध बांधला होता त्या बांधावर स्नानाला गेलो. तिथेही तांब्यानेच स्नान उरकावे लागले. त्या झोंबऱ्या वाऱ्यात कसेबसे स्नान उरकले. कपडेही धुवून घेतले आणि सुके कपडे अंगावर चढविले.

दांडभर वर आल्यावर आता सूर्याजीराव जर ढगाबाहेर पडले होते. कपडे वाळत टाकून एका खडकावर जरा उन्हाला पाठ देऊन टेकलो. समोरच्या गवती पात्यांवर जलबिंदूंचे मोती झाले होते. कितीही क्षणभंगूर का असेना! परंतु या जलबिंदूंनीं ही संधी साधली होती, मनुष्याचा हा वाण त्यांनाही लागला असावा! पुढच्या काही क्षणानंतर ते मातीत मिसळून जाणार आहेत; परंतु सध्या आमच्या समोर तरी त्यांनी (मोती म्हणून) नाव कमाविले आहे.

हवेत वाफेचे प्रमाण किती असावे? जवळ जवळ शंभर टक्के! पाऊण तासात कपडे थोडा सूर्यप्रकाश असून सुद्धा जराही हळकले नाहीत. तस्से ओलेच कपडे घेऊन निघालो. अमरकंटकला पोहोचण्यापूर्वी दोन दिवस व अमरकंटक सोडल्यानंतरचे दोन दिवस हवा अशीच पावसाळी व दमट या दिवसांत असते

म्हणतात. प्रत्यक्ष अमर कंटकातील दोन दिवस मात्र वरुण राजाने आमच्यावर अक्षरशः मेहेरबानीच केली होती असेच म्हटले पाहिजे. कारण तिथेही या दिवसांत थोडाफार पाऊस असतो असे म्हणतात.

गावात आल्यावर कढाईवाल्याकडे एक एक ग्लास दूध घेतले. चारोळ्यांची इथे पुन्हा चौकशी केली. तो भाव शंभर रुपये किलो असल्याचे समजले. हा रानमेवा साफसफाई न केलेला असा जेव्हा गिरिजन, एका विशिष्ट हंगामात विकायला आणतात तेव्हा हे व्यापारी त्यांच्या हातावर पंचवीस तीस रुपयेच एक किलोमागे टिकवतात आणि मग साफसूफ करून ते शंभर रुपये किलोप्रमाणे विकतात. सर्वच क्षेत्रांत 'दलाल' ही जमात उत्पादकांपेक्षाही मातबर बनते. हापूस आंब्याच्या बागाईतदारांपेक्षां मुंबईतल्या दलालाची हवेली मुंबईतच प्रथम उठते.

जेवणे उरकली. बारा वाजल्यावर आमची निघायची वेळ झाली. तरी कपडे ओलेच होते. गाडीत बसतांना ते कपडे आणि ताणलेल्या दोऱ्या असे घेऊनच गाडीत चढलो. गाडी सुटली आणि चक्क मोठा पाऊसच आला. गाडी आपला मार्ग तशा पावसातही काटतच होती. पुढे समनेरपूरचा ओढा लागला आणि ऐन ओढ्यात गाडी चिखलात रूतून बसली. गाडी चालकाने जरा डोके वापरून गाडीतील माणसांना उतरायला सांगितले. गाडी हलकी झाल्यावर त्याने ती मागे घेतली आणि भराव टाकून थोड्या मुद्दाम उंच केलेल्या रस्त्यावर न घेतां बाजूला घेतली आणि ऐन पाण्यातून न रुळलेल्या मार्गाने झटदिशी पुढे काढून दोन मिनिटाच्या आंत पैलतीरावर चढवून उभी केली. आम्ही सावकाशीने त्याच्या मागून ढोपरभर पाण्यातून पलीकडे चालत गेलो. इथे गाड्या रुतून एक एक दिवस खोळंबा झाल्याचीही उदाहरणे ऐकली. आमची गाडी पुढे चालू लागली. पुढचाच गाव अंजानिया हा लागला. इथे चहा व खाणे उरकले आणि संध्याकाळी पाचच्या सुमारास महाराजपूरच्या या रपटा भागातील या 'कांचका' मंदिरांत दाखल झालो. देवापुढील सभागृहातच आम्ही उतरलो आहोत. बाजूला खोल्या आहेत; परंतु त्या कोंदट व काळोख्या ! म्हणून या हॉलमध्येच पथाऱ्या पसरल्या आहेत.

सामान लावून ठेवल्यावर महाराजपूर या दोन एक कि. मीटर दूर असलेल्या गावापर्यंत जाऊन तसेच परत फिरलो. कारण पाऊस मेव घालीत होता. आम्ही उतरलो आहोत त्याच्या समोरच नदी (नर्मदा) आहे. पलीकडे मोठा गाव दिसत आहे. ते मांडला शहर. जिल्ह्याचे गाव.

जरा जवळचा नकाशा काढून पाहिला. थोडी चौकशी केली. तेव्हा लक्षात आले की मांडला फोर्टही इथून जवळच आहे. मांडला फोर्ट जर जवळ आहे तर कान्ह हे अभयारण्यही इथून फारसे लांब नाही; कारण काही महिन्यांपूर्वी वर्तमान पत्रातील एक बातमी वाचली होती. त्यात लिहिले होते की, मांडला फोर्ट मधील सैन्याचे शिपाई निशाणबाजीचा सराव करीत असताना कान्ह अभयारण्यातील काही वनवासींना इजा पोहोचली होती. थोडक्यात म्हणजे कान्ह अभयारण्यही इथून फार लांब नाही हे लक्षात आले आणि हेही लक्षात आले की, कान्ह अभयारण्याच्या इतक्या जवळ येऊन आम्ही ते पाहिल्याशिवाय जाणार आहोत. आमच्या सारख्या भटक्याला वाटतं की, खजुराहोला जावे, कान्ह अभयारण्यात जावे; परंतु यात्रा कंपनीला आणि त्यांतून प्रवास करणाऱ्या बहुसंख्य धार्मिक भावनेने यात्रा करणाऱ्या प्रवाशांना हे परवडणार नाही. आधीच ही नर्मदा परिक्रमाच पंचवीस दिवसांची आयोजित यात्रा आहे. तेव्हा आणखी आठवडाभर म्हणजेच एकूण पुरा महिनाभर फिरत राहायला त्यांना आवडणार नाही. तेव्हा मी जरी कान्ह अभयारण्य इतके जवळ येऊन चुकणार आहे म्हणून आमच्या दोस्तांजवळ हळहळ व्यक्त केली, तरी पण फारसे गंभीरपणे कुणी माझे म्हणणे मनावर घेतले नाही.

'असे काय आहे त्या अभयारण्यात पाहाण्यासारखे हो?' म्हणून भाऊसाहेबांनी फक्त जाण्याची उत्सुकता व्यक्त केली. आमची टकळी पुढे चालू राहायला एवढे पुरेसे कारण होते.

'अहो! खजुराहोला नुसते दगडी पुतळेच आहेत; परंतु या अभयारण्यात चांगले जिते जागते पशु-पक्षी जंगलात उघडे फिरताना दिसतात. भारतातील राखीव जंगलांत हे अभयारण्य सर्वोत्तम समजले जाते. जबलपूर पासून १७३ कि. मी. अंतरावर हे आहे. तिथून रोज नियमीत बसगाड्या या अभयारण्यातील 'किस्ली' या मुक्कामाच्या ठिकाणापर्यंत जातात. राहायला, नुसत्या खांबांचा खालचा मजला मोकळा सोडून पहिल्या मजल्यापासून सोयी असलेल्या लाकडी झोपड्या भाड्याने मिळतात. जेवणाचीही सोय आहे.'

'इथून किती लांब असेल पण?'—

'दोन तासांच्या रस्त्यावर आहे; परंतु सकाळी जाऊन संध्याकाळी परत येण्यासारखे हे ठिकाण नाही. कमीत कमी त्रिरात्र तरी मुक्काम करायला पाहिजे.

'का असे काय आहे तिथे?'

'पशु-पक्ष्यांचे वैविध्यच इतके आहे आणि ते काही राणीच्या बागेसारखे तुम्हाला पाहायला मांडून ठेवलेले नाहीत. नैसर्गिक अवस्थेत जंगलात त्यांना पाहायला हत्तीवरून अगर भाड्याच्या जीपने जावे लागते. सनसेट पॉइन्टवरून सूर्यास्त पाहून परतत असताना यांचे दर्शन होते; कारण त्यांची ती पाणी प्यायला पाणवठ्यावर जायची वेळ असते. असे दोन तीन दिवस हिंडल्यावर नशीबांत असेल तर पट्टेवाला अगर ठिपकेवाल्या वाघोबांचे सुद्धा दर्शन होऊ शकते.'

'आणखी कोणते कोणते प्राणी पाहायला मिळतात?'

'क्वचितच आढळणारा बारसिंगा, रान डुक्कर, गवे (रान बैल) कोल्हा, अस्वल, रानटी कुत्रे, ससे, तीन पट्ट्यांच्या मुंगुसाएवढ्या खारी आणि शिवाय काळवीट, सांबर, चितळ, काळे हरीण, कबरे हरीण आणि अनेक प्रकारचे शाखामृग (माकडे) ही मंडळी तर एरवी दिवसा उजेडीही दिसतात. पक्ष्यांचे तर दोनशेच्या वर प्रकार आहेत. वनस्पतीमध्ये साल व बाम्बू हे जास्त आहेत. राहायला लाकडी झोपड्यांशिवाय, डाक बंगले व धर्मशाळा सुद्धा आहेत. या अभयरण्याचे एकूण क्षेत्रफळ सुमारे एक हजार चौरस कि. मी. चे आहे. जायला चांगला हंगाम म्हणजे फेब्रुवारी ते जून पर्यंत. पावसाळ्यात पाहाणारांसाठी हे बंदच असते.'

'अरे मग चांगलं आहे की. एकदा गेलं पाहिजे.'

माझ्या बडबडण्याचा इतका परिणाम झाला. हेही नसे थोडके! मी मनाशी म्हटले. इथे कॅमेरा व दुर्बिणीला उत्तम वाव आहे.

आरती मंत्रपुष्प झाले. जेवणे झाली आणि या गप्पाच खूप झाल्या. आज करमणूक अशी झालेली नव्हती. इथे गच्चीवरून काळोख्या रात्री आकाशदर्शन चांगले होत होते; परंतु दुसऱ्या कोणासच त्यात रस नव्हता. पुजाऱ्याने सांगितले इथे जवळच बंजारा नदीचा संगम आहे. मनात म्हटले उद्या सकाळी बघू. आम्ही सर्वच गच्चीवरून खाली आलो. दिवस आरामात संपला.

# मंगळवार दि. २४ फेब्रुवारी

* * * * * * * * * * * *

श्री : विसावा दिवस होशंगाबाद

रपटा या मुक्कामी 'बडे फजल' स्नानासाठी नदीवर जाऊन आलो. तेंव्हा रपटा या वस्तीची काही कल्पना आली. मोठ्या गावापासून दूर अशी कोळी, भंडारी वगैरे ज्यांची उपजीविका नदीवर केवळ अवलंबून होती अशा लोकांचे हे गाव. गावात स्वच्छता बेताचीच ! परंतु आम्ही उतरलो होतो त्या देवळात चांगले निर्मळ वातावरण होते. आज होशंगाबाद गाठायचे म्हणजे पुऱ्या दहा तासांचा प्रवास होता. नऊच्या सुद्धां आधी आमचा मुक्काम हलला. बाराच्या सुमारास लखना-दौन हे गाव आले आणि संकटमोचन हनुमानाच्या मंदिरापाशी गाडी थांबली. इथेच जेवण उरकून नरसिंहपूर या शहराला टँजेन्ट मारून गाडी पुढील राज रस्त्याने धावत होती. गाडरवारा हे रेल्वे स्टेशनचे गाव. इथे दुपारचा चहा झाला. आता रात्र पडली. होशंगाबाद अजून फार दूरवर राहिले होते. गाडीचे काही तरी बिघडले होते. कारण वरचे वर ती मंडळी गाडी थांबवून उतरून विजेरीच्या प्रकाशात काहीतरी तपासून बघत होती. रात्रीचे दहा वाजले. बाभई नावाच्या एका गावात ऐन बाजारात गाडी उभी होती. काय बिघडले होते त्याची तपासणी चालली होती. दुपारच्या जेवणाला आठ तास झाले होते. अर्धे अधिक प्रवासी खाली उतरले. समोरच मिठाईवाल्याचे मोठे दुकान होते. आम्ही तिघांनी रबडी खाऊन घेतली आणि अर्धा किलो बर्फी घेतली. गाडीत परत आलो आणि साने मावशी वगैरे ज्या बायका खालीही उतरल्या नव्हत्या त्यांना ती बर्फी वाटून टाकली.

होशंगाबादला पोचायला साडे दहा वाजले. आमच्या मुक्कामाची धर्मशाला बाजारात होती. आम्हा सड्या सहाजणांना जी खोली मिळाली होती ती चकडबंद होती. ऐन थंडीच्या दिवसांतही उबावले होते. साडेअकरा पर्यंत जेवणाशी गाठ पडली. या हवाबंद खोलीत झोप कशी येणार या विवंचनेत सहप्रवाशांनी पाय लांब केले. मी 'वासरी' घेऊन बसलो आहे.

# बुधवार दि. २५ फेब्रुवारी

❊ ❊ ❊ ❊ ❊ ❊ ❊ ❊ ❊ ❊ ❊ ❊ ❊

श्री : एकविसावा दिवस ओंकारेश्वर

वर जरी ओंकारेश्वर म्हणून लिहिले असले तरी प्रस्तुत मजकूर मी आता संध्याकाळी पाच वाजता होशंगाबादच्या धर्मशाळेत बसून लिहीत आहे. कारण गाडी दुपारपासून दुरुस्तीला गेली आहे आणि ती आल्याबरोबर सुटणार आहे. या अनिश्चितपणामुळे बाहेर कुठे जाता येत नाही. इथेच ताटकळत बसण्यापेक्षा ही रोजनिशी लिहायला घेतली आहे.

होशंगाबादचे पूर्वीचे नाव नर्मदापूर. हेच खरे सार्थ नाव आहे. कारण सगळयात रुंद, भरपूर खोल आणि स्वच्छ वाहात्या पाण्याची अशी नर्मदा, रेवामैय्या, प्रसन्न अशी दुसरीकडे कुठे पाहायला मिळत नाही. माळव्याचा सुलतान हुशंगशाहा याने या शहराला आपले स्वतःचेच नाव दिले. मध्यप्रदेश सरकारने ते बदलून मूळ नाव नर्मदापूर हेच ठेवावे. पण स्वतःचा मतलब साधण्यात गर्क असलेल्या कोण्या राजकीय कार्यकर्त्याच्या हे मनात तरी येणार आहे काय ?

इथे नदीला एकूण बारा मोठे घाट बांधलेले आहेत. तरीपण महेश्वरच्या अहिल्या घाटाची सर एकालाही नाही. महेश्वरच्या भव्यतेत घाटामागील राजवाडा व भव्य मंदिरे यांचाही वाटा आहे. शिवाय त्या पुण्श्लोक महाराणी बद्दलची आमची भावना ! असो ! तर, इथे हे जे घाट बांधले आहेत त्यांचे वैशिष्ट्य म्हणजे ते बांधायला गेल्या शतकातील ब्रिटिशकाळातील एक रेक्टन नावाचा अधिकारी कारणीभूत झाला आहे. त्याने सेठाणी नावाच्या एका लखपतीच्या पैशाने हे बांधविले. कदाचित खरी गोष्ट याच्या उलटही असू शकेल. सेठाणीने ते बांधले आणि त्याला साहेबाचे नाव दिले. नाहीतर हे धार्मिक कृत्य करण्याची ऊर्मी साहेबाला का व्हावी या शंकेचा उलगडा होत नाही; पण या घाटांशी साहेबाचे नाव निगडीत आहे हे खरे !

इथे आल्यावर घाटावरच्या छोट्या बुरूजांवरून खालच्या पाण्यात सूर मारावासा वाटणार नाही असा पोहोणारा शोधून मिळायचा नाही. मी १९३६ मध्ये येथे

आलो होतो. तेव्हा अशोक अवस्थी हा चांगला पट्टीचा पोहोणारा युवक माझ्या-बरोबर होता. बडा मजा आया था!

आज गाडी दुरुस्तीला जायची हे सर्वांना माहीत असल्यामुळे सकाळच्या उठण्यापासून गर्दी नव्हती. तरीसुद्धां सवयच अशी झाली होती की सकाळचे न्याहारी पर्यंतचे कार्यक्रम रोजच्या वेळेवर झाले. स्नानार्थ नऊच्या आधीच सर्व मंडळी घाटावर आली. सत्याहत्तराव्या वर्षीही मला जमली तशी पोहोण्याची मजा मी लुटली. होते नव्हते तेव्हढे सर्व कपडे सर्वांनी आज धुवून घेतले. वाळविले. कपडे घेऊन तसल्या त्या रामदासी वेशांतच आम्ही बाजारात आलो. १९३६ मध्ये येथील वस्ती आठ एक हजार असावी. आता ती ऐंशी हजारावर आहे. मिठाई फारशी स्वस्त नाही. पण प्रत उत्तम! मुंबईला परत गेल्यावर चार जणांना प्रसाद म्हणून काहीतरी द्यायला पाहिजे. त्याची तरतूद इथे करून घेतली. पूर्वीच्या ओळखी काढून कुणाकडे जायचे तर अंगावरचा पोशाख अगदीच अपुरा होता. दुधाचे दोन ग्लास रिचवून बाराच्या सुमारास आम्ही धर्मशाळेतच परत आलो. काही मंडळी गावात देवळे शोधीत गेली. तशी प्रसिद्ध अशी मंदिरे इथे नव्हतीच. यथा काल, म्हणजे उशीराच जेवणे उरकली. आराम करून झाला. गाडीचा पत्ता नाही. ती आल्यावर निघायचे एवढेच निश्चित ठरविता आले होते.

आता पुढील मजकूर कालचा म्हणून मी ओंकारेश्वरला धर्मशाळेत बसून लिहीत आहे. संध्याकाळी सहा वाजता गाडी आली आणि निघाली. एका सहप्रवासी बाईंना दुसरे दिवशी मुंबईस पोचणे जरूर होते. तेव्हा त्यांच्या सांगण्यावरून त्यांना इटारसी या रेल्वे जंक्शनला सोडण्यासाठी गाडी इटारसीला गेली. फारशी नाही. थोडीशीच आडवाट होती. बाईंच्या ओळखीचेही कुणी तिथे होते. गाडी पुन्हा राजमार्गाने जोरात निघाली. बाहेर मिट्ट काळोख. पाहाणार काय? हरदा रेल्वे स्टेशनचे गाव आले आणि गेलेही, पुढेही गावे आली असणारच; परंतु सामूहिक 'राष्ट्रीय कार्यक्रमात' प्रत्येकजण गर्क होता. आपली मान शेजारच्याच्या खांद्यावर ठेवून प्रत्येकाची टाळी ब्रह्मानंदी लागली. तिथे कोण कोणाते सांभाळी? अशी अवस्था पहाटे साडेचार वाजेपर्यंत म्हणजे ओंकारेश्वर येईपर्यंत चालली होती.

# गुरुवार दि. २६ फेब्रुवारी महाशिवरात्री

❊ ❊ ❊ ❊ ❊ ❊ ❊ ❊ ❊ ❊ ❊ ❊

श्री : बाविसावा दिवस ओंकारेश्वर

आज महाशिवरात्रीचा पवित्र दिवस आहे. आजचा सबंध दिवस मुक्काम इथेच आहे. आज पहाटे पाच वाजता येथे आल्यावर पथारी पसरली असली तरी आठ वाजता आवरली. नऊ वाजता माणसे न्याहारी (उपासाची) उरकून व्रतोद्यापनासाठी घाटावर दाखल झाली. व्रतोद्यापन म्हणजे प्रदक्षिणेचा संकल्प पुरा झाला म्हणून करायचा विधी. तोही यथासांग उरकला आणि कुणाच्या तरी सांगण्यावरून आम्ही नावेतून ओंकारेश्वराच्या डोंगराला प्रदक्षिणा घालण्यासाठी निघालो. ही नावेतील प्रदक्षिणा त्रासदायक ठरली. त्यापेक्षा उन्हाची वेळ टाळून चालत गेलो असतो तर फार बरे झाले असते. ऊन सतत डोक्यावर होतेच. त्यात नावेतून तीन वेळा उतरून चालावेच लागले. एके ठिकाणी पाणी कमी म्हणून, दुसरे वेळी पाण्याला ओढ फार म्हणून आणि तिसऱ्या वेळी पलीकडल्या तीरावरून ओंकार (ॐ) हा आकार पाहाण्यासाठी म्हणून. शिवाय पाहाण्यासाठी म्हणून डोंगरावर हिंडावे लागत होते.

वीस दिवसांपूर्वी पहिल्या दिवशी ओंकारेश्वराचे सावकाशीने दर्शन झाले होते; परंतु काळोख पडल्यामुळे आसमंत निरखता आला नव्हता. आज दुसरा उद्योग नसल्यामुळे ते फार छान जमले. विचारून, वाचून माहितीही बऱ्यापैकी जमली. ओंकारेश्वर मंदिराच्या जरा वरील बाजूस सिद्धनाथाचे पुराणे मंदिर आहे. त्याचे छप्पर पडून गेले असावे. त्या देवळाचा पाया व त्यावरील कोरीव मूर्तिकाम आणि आत्ताच्या ओंकारेश्वर मंदिराचा उंच पाया व त्यावरील नक्षीकाम यात खूपच साम्य आहे. तेव्हा दोन्ही देवळे सुमारे हजार वर्षांपूर्वी एकाच वेळी सारख्याच वैभवात असावीत असा तज्ञांचा निष्कर्ष आहे. दोन्ही देवळांची छपरे कालभाराने पडल्यावर ओंकारेश्वराचे छप्पर तेवढे नव्याने बांधले गेले. आज जे दिसते ते नव्याने बांधले गेलेले आहे. म्हणूनच मला वाटते ते इतके साधे आहे.

पुलाच्या अलीकडे ममलेश्वराच्या मंदिरात आज पुन्हा गेलो. यालाच अमरेश्वर पण म्हणतात. यावरील प्रमाणबद्ध मूर्तिकलेकडे यावेळी लक्ष गेले. एका वेगवान पावित्र्यातील शिवमूर्तीकडे मागील वेळेस लक्ष गेले नव्हते. एकूणच मूर्तिकला फार प्रमाणबद्ध म्हणून खूप आकर्षक वाटली. या ममलेश्वराच्याच आवारात श्रीदेश्वराचे मंदिर आहे. तेही आकर्षक आहे. जवळच ब्रह्मेश्वराचे मंदिर असून आणखी पलीकडे विष्णूचे पण मंदिर आहे. म्हणजे याच परिसरात ब्रह्मा–विष्णु–महेश या तिघांचीही मंदिरे आहेत.

रावेरखेडीस बाजीरावांच्या (थोरल्या) समाधी दर्शनासाठी परतताना जाण्याचे ठरले होते म्हणून एस. टी. स्टँडवर जाण्या–येण्याची संपूर्ण माहिती काढून आणण्यासाठी गेलो. काही पैसे दिल्यास एक मनुष्य आमच्याबरोबर वाट दाखविण्यासाठी यायला तयार झाला. व्यवस्थापकांना तसे सांगितले. महाशिवरात्रीचा फराळ वगैरे झाल्यावर गेल्या रात्रीची राहिलेली झोप प्रत्येकाने पुरी केली. मधल्या वेळचा चहा वगैरे झाल्यावर आम्ही उतरलो होतो त्याच बाजूच्या डोंगराची कडा धरून बाहेर पडलो. जरा पुढे गेल्यावर आतापर्यंत ऐकून होतो तो विश्वरूप दर्शनाचा पस्तीस फूट उंचीचा पुतळा दिसू लागला. हा रावणासारखा एक भव्य पुतळा आहे; परंतु रावणाच्या दहा तोंडांऐवजी इथे त्याच्या तिप्पट तोंडे आहेत. मधोमध श्रीविष्णूचा मुखवटा आणि त्याच्या दोन्ही बाजूंस बारा-पंधरा असे अनेक देवतांचे व ऋषी-महर्षींचे मुखवटे आहेत. खाली अन्नपूर्णा मातेचे मंदिर आणि मार्कंडेय ऋषींचा आश्रम आहे. देवळांच्या ओवऱ्यात अगर कट्ट्यावर बसून चांगला वेळ जातो. खाली नर्मदेचे पात्र, समोरचा डोंगर असे सुरेख विशाल असे निसर्ग दृश्य दिसते. वरील दोन्ही गोष्टी ( विश्वरूप आणि अन्नपूर्णा ) अगदी अलीकडच्या म्हणजे नवीनच आहेत. डोंगराची बाजू फोडून तिथे जागा करून हे सर्व बांधलेले आहे.

नर्मदा नदीची महा-प्रदक्षिणा सुखासमाधानात पूर्ण झाली होती. तेव्हा बहुतेक सहप्रवाशांना आता घराची ओढ लागली होती आणि आता घरही केवळ दोन दिवसांवर आले होते.

# शुक्रवार दि. २७ फेब्रुवारी

❊ ❊ ❊ ❊ ❊ ❊ ❊ ❊ ❊ ❊ ❊ ❊ ❊

श्री : तेविसावा दिवस धुळे

आज सकाळी पहिला चहा आटोपल्यावर स्नानालाच पलीकडल्या म्हणजे ओंकारेश्वराच्या तीरावर गेलो. स्नानोत्तर दर्शनाच्या गर्दीत सापडलो. त्यांत सापडल्यावर दर्शन घेणे भागच पडले. परत येऊन बिस्तरे बांधून गाडीवर चढविण्यासाठी दिले. शिऱ्याची न्याहारी उरकून आठ वाजता आम्हीही निघालो. व्यवस्थापकांना रावेरखेडीला जाण्याची आठवण दिली. एस्. टी. स्टँडवरचा एक मनुष्य वाट दाखविण्यास बरोबर येणार असल्याची माहितीही सांगितली; परंतु व्यवस्थापकांनी आता कानावर हात ठेवले. 'ड्रायव्हर म्हणतो मोठा रस्ता सोडून इतर ठिकाणी जाण्याचे आपल्याला लायसेन्स नाही.' म्हणून सांगू लागले गाडीत आम्ही तिघेतरी गाडी हाकणारे होतो. तुमचे म्हणणे चूक आहे म्हणून सांगितले; परंतु ड्रायव्हर कबूल होईना. त्याचे म्हणणे तुमच्या खासगी गाड्यांची गोष्ट निराळी आणि आमच्या भाड्याच्या गाड्यांची गोष्ट निराळी. तुम्हाला पंधरा दिवसांपूर्वी कबूल केले तेव्हा ही गोष्ट आमच्या लक्षात आली नव्हती. भांडण्यात काही अर्थ नव्हता. (बोलविता धनी वेगळा होता.) अडाणीपणाचा बुरखा पांघरून मनुष्य काहीतरी सबब सांगतो आहे हे कळत असून काही इलाज नव्हता. व्यवस्थापकांनी ड्रायव्हरकडे बोट दाखवून आपली सुटका करून घेतली होती.

आलो त्याच रस्त्याने परतायचे होते. सेंधवाच्या हद्दीवर त्याच 'बीजांवासी माता' मंदिरात दुपारचे जेवण उरकले आणि निघालो. दुपारी शिरपूर गावाच्या वेशीवरील एका 'टावरणात' स्पेशल चहा झाला. संध्याकाळी सहाच्या सुमारास त्याच पारोळेकर हॉलमध्ये आम्ही मुक्कामास आलो आहोत. आमची रेल्वेची तिकिटे उद्यांची आहेत. आजचीही चालली असती. भातखंड्यांना दम्याचा त्रास व्हायला लागला होता. म्हणून ते एका हॉटेलात राहायला गेले. त्यांची रेल्वेतिकिटे त्यांच्याजवळ दिली. माझे माझ्याजवळ ठेवले व मी इतरांबरोबर पारोळेकर हॉलमध्ये राहिलो.

रात्री जेवणानंतर सर्व प्रवाशांनी मिळून जमविलेले पैसे बक्षिसी म्हणून गाडीच्या कर्मचाऱ्यांना द्यायचा विधी माझ्या हस्ते झाला. पैसे देऊन झाल्यावर प्रवास–प्रत्ययकारी प्रवास–या विषयावर मी पाच-सात मिनिटेच बोललो व या सहलीचा–प्रवासाचा समारोप केला. माझे 'भाषण' ऐकल्यावर काहींना मी बहुश्रुत विद्वान वाटलो. कुणी म्हणाले 'आम्हास आधीच समजले असते तर तुमच्या संगतीचा लाभ घेता आला असता.' 'अरे भाई, आप तो छुपे रुस्तुम हो!' हे बहुधा देवासकर म्हणाले, 'कसचं कसचं!' म्हणत मी या बोलण्याकडे दुर्लक्षच केले. कारण 'वासरांत लंगडी गाय शहाणी' असा हा प्रकार होता. तरीपण प्रवासाच्या शेवटी माझ्या दृष्टीने एक चांगले वातावरण तयार झाले होते. माझ्याबाबतीत तरी.

जी सहल आखण्यात माझा काहीही भाग नाही अशी ही दुसरी सहल, मी स्वतःच आयोजन केले असते तर मला आणखी एक आठवडा तरी लागला असता. रावेरखेडी, खजुराहो आणि कान्ह–अभयारण्य ही तीन स्थळे तरी सोडली नसती. इतर सहप्रवाशांची (एक दोन अपवाद सोडून) व माझी भूमिकाच वेगळी होती. भटकण्याची हौस ही माझी भूमिका तर धार्मिक श्रद्धेने पुण्य संपादनार्थ तीर्थयात्रा करणे ही इतरांची भूमिका होती.

# शनिवार दि. २८ फेब्रुवारी

✻ ✻ ✻ ✻ ✻ ✻ ✻ ✻ ✻ ✻ ✻ ✻ ✻

श्री : चोविसावा दिवस धुळे

पारोळेकर हॉलमध्ये आजही रोजच्या प्रमाणे चहा लवकरच झाला. स्नानोत्तर न्याहारी उरकली. न्याहारीला आज भजी होती. साडेआठ वाजता बस-गाडी निघायची होती. बस आल्यामार्गाने पुण्यास जाणार नव्हती. साकोरी (उपासनी बाबा) व शिरडी (साईबाबा) ला भेट देऊन ती पुण्यास परतणार होती. गाडी निघायची वेळ झाली तशी नानासाहेब इनामदार, गुरु देवासकर वगैरेंनी उराउरी भेटून निरोप घेतला. अनेक वृद्ध व वृद्धा यांनी प्रेमपूर्वक हात दाबून निरोप घेतला. जाधव बाई यातल्या शेवटल्या. चुकून कुणाचा निरोप घ्यायचा राहू नये म्हणून गाडी सुटायच्या वेळी मी गाडीत चढून सर्वांचा सामूहिक निरोप घेतला. गाडी निघाली. मी आपले सामान धर्मशाळेच्या रखवालदाराकडे दिले. संध्याकाळी स्टेशनवर जाताना मला ते घेऊन जायचे होते. ड्रायव्हरच्या म्हणण्याप्रमाणे पुण्यास पोहोचेपर्यंत साडेचार हजार किलोमीटर अंतर पुरे होणार होते.

सहलीची बस पुण्याकडे चालल्यावर मी धुळे गावात माझ्या एका स्वातंत्र्य सैनिक असलेल्या मित्राकडे, सुप्रसिद्ध पत्रकार कांतीभाई गुजराथी यांच्याकडे जायचे ठरविले. कांतीभाई पत्रकार-नगरात राहात होते. तिथे त्यांचे घर शोधीत त्यांच्या घरी गेलो. तिथे त्यांच्या सूनबाईने सांगितले की, ते हल्ली मालेगाव नाक्यावरील पांजरपोळातील एका घरात राहातात. म्हणून मी रिक्शाने मालेगाव नाक्याकडे निघालो तिथे पोचल्यावर पाहातोय तो त्यांच्या दाराला कुलूप. तेव्हा आता दुसऱ्या कुणाकडे जावे याचा विचार करीत उभा होतो. कारण रेल्वे गाडी रात्री निघायची होती. इतक्यात पांजरपोळच्या मुख्य दरवाजातून कांतीभाईच येताना दिसले आणि आणखी कुणाकडे जावे हा प्रश्नच माझ्यापुढे उरला नाही. कांतीभाईंनी फारच लगबग केली होती. पत्रकार नगरमधील त्यांच्या घरीच ते गेले होते. तिथे मी येऊन गेल्याचे त्यांच्या सूनबाईंनी सांगितल्यावरून त्याच रिक्क्षाने ते परत पांजरपोळात आले. त्यांनी केलेल्या लगबगीमुळेच त्यांची व माझी भेट झाली.

भेट झाल्यानंतर मात्र संध्याकाळी पाच वाजेपर्यंत त्यांनी मला सोडले नाही. पाच वाजता कांतीभाईंना सोडून मी पुन्हा पारोळेकर हॉलमध्ये आलो. तासभर तिथे काढल्यावर सहा वाजता स्टेशनकडे येण्यास निघालो. प्लॅटफार्मवर येऊन गाडी येईपर्यंत ही रोजनिशी लिहीत बसलो आहे.

ही दीर्घ मुदतीची सहल संपली आहे; पण सध्या मनात विचार त्या सहलीचेच येत आहेत. गेल्या चोवीस दिवसांत घडलेल्या हकीगतींचेच मनन चालले आहे. सहलींतील सहप्रवासीच मनश्चक्षूंसमोर येत आहेत. आम्ही तीन-चार जण सोडलो तर बाकी सर्व प्रवासी म्हणजे भक्तांची मांदियाळीच होती. अनेक जातींची ही मंडळी होती; पण कुणीही दुसऱ्याची जात काढली नाही अगर आपली जात दाखविली नाही. खरं म्हणजे ही परीक्षा किंवा याची कसोटी लागलीच नाही. कारण दलित वर्गातील प्रवासी कुणी नव्हतेच. सर्वजण पांढरपेशे आणि मध्यम वर्गीय होते. तरीपण पंचवीस दिवस गुण्यागोविंदाने एकत्र राहायला जरूर ती सहिष्णुता व सभ्यता सर्वांच्या ठिकाणी होती. हेही नसे थोडके !


काही यात्री वृद्ध व दुर्बल असून सुद्धा (विशेषतः काही स्त्रिया) प्रवासातील हालअपेष्टा त्यांनी केवळ धार्मिक श्रद्धेच्या बळावर सहन केल्या, याचे मला मोठे कौतुक वाटले. (आम्हीही धार्मिक बाबतीत अश्रद्ध असलो तरी आमच्याही निष्ठा, श्रद्धा आहेत. आटोकाट आहेत; परंतु त्या दुसऱ्या क्षेत्रात आहेत.) श्रद्धा ही वस्तू काय मोलाची आहे याचा प्रत्यय या सहलीत आला. मनुष्याच्या जगण्याला काहीतरी प्रयोजन लागते. ईश्वरावरील, धर्मावरील श्रद्धा ते पुरवू शकते याचे दर्शन झाले. एके काळी देशभक्ती या श्रद्धेने अनेकांनी आपल्या प्राणांची कुर्वंडी केली आणि मरणाला मारून ते अमर झाले. कुठल्यातरी श्रद्धेने, निष्ठेने झपाटलेल्या माणसांनीच आतापर्यंत समाजाची धारणा केली आहे. समाजाची छोटी मोठी सेवा ज्यांनी केली आहे त्यांचे मनी समाजसेवेची श्रद्धाच होती.

अंधश्रद्धा ही समाजाची धारणा न करता विकृती निर्माण करते. उलट डोळस श्रद्धा समाजांत जरूर ते परिवर्तन घडवून समाजाच्या धारणेला बळकटी आणते. या डोळस श्रद्धेच्या अभावीच तर आपल्या समाजाचे अनेक क्षेत्रांतील परिवर्तन खोळंबून राहिले आहे.

卐 समाप्त 卐

६२९
२६२२०

REFBK-0026220
REFBK-0026220


नर्मदा परिक्रम्मा
( प्र द क्षि णा )
नर्मदा नदी
राष्ट्रीय महामार्ग
राज्यमार्ग
लहान मार्ग
वडोदरा
राजपीपला
अलिराजपुर
जोबात
सरदारपुर
धार
इंदौर
उज्जैन
देवास
सोंकाच
मनावर
कुक्षी
बड़वानी
राजपुर
सेंधवा
खलघाट
महेश्वर
मंडलेश्वर
कासरावद
ओंकारेश्वर
सनावद
बड़वाह
खारगोन
भिकनगाव
खंडवा
हरसूद
हरदा
टिमरनी
सिवनी मालवा
होशंगाबाद
बुधनी
नसरुल्लागंज
रेहटी
भोपाल
सीहोर
इच्छावर
आष्टा
कन्नोड
खातेगाव
बागली
नेमावर
मोहरागंज
बरेली
उदयपुरा
सोहागपुर
पिपरिया
गाडरवाड़ा
करेली
नरसिंहपुर
पाटण
जबलपुर
भेड़ाघाट
सिहोरा
कटनी
निवास
मंडला
डिंडोरी
शहाडोल
अमरकंटक
लाखनादौन
शिवणी
कान्हा अभयारण्य
नंदुरबार
शहादा
तळोदा
अकोला
नेवाली
पलसुद
गोरेला